मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर मार्गशीर्ष – फाल्गुन शके १९४२

जानेवारी–मार्च २०२१ / खंड ४४, अंक ४

# 'अर्थसंवाद'च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित:।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२१/ खंड ४४ / अंक ४

## अनुक्रमणिका

१. **विनायक श्रीधर देशपांडे**
कोरोनाचे सावट आणि २०२१चा केंद्रीय अर्थसंकल्प........ २८९

२. **एस. एस. कळमकर, व्ही. जी. अतकरे**
महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यातील अरोली गावात
सामूहिक पशुधन चारा विपणन मॉडेलचा अभ्यास........... २९९

३. **प्रशांत हरमकर**
जागतिक व्यापार संघटनेची २५ वर्षे : साध्य आणि असाध्य .. ३०९

४. **करमसिंग राजपूत**
भारतीय कृषिक्षेत्र आणि तीन नवीन कृषिकायदे.............. ३२३

५. **मारोती तेगमपुरे**
केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणाचे 'चारित्र्य' .......... ३३८

६. **सुभाष कोंबडे**
महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणावरील सार्वजनिक खर्च
व शालेय शिक्षण प्रगती विश्लेषण.......................... ३४५

७. **संतोष दास्ताने :** पुस्तक परिचय
इंडियाज एक्सटर्नल कमर्शिअल बोरोविंग फीचर,
ट्रेन्डस्, पॉलीसी इश्यूज्.................................... ३५८

८. **शि. ना. माने :** अर्थ शब्दांची वाट पाहे...
डी. एन. ए............................................. ३६१

९. **जे. एफ. पाटील :** अर्थ शब्दांची वाट पाहे...
क्रौडिंग औट - असेट मॉनेटिझेशन - बॅड बँक ............ ३६३

१०. **लेख सूची** ............................................. ३६५

११. **लेखक सूची** ............................................. ३६७

११. **अर्थसंवाद तज्ञ परीक्षक सूची** ............................. ३७०

**प्रमुख संपादक**
**राहुल शं. म्होपरे**
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
**चंद्रकांत जाधव**
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०१८-२१)**
जनार्दन काकडे
राजू शिंदे
अजय दरेकर
मोहन सदामते

**संपादकीय पत्रव्यवहार**
**राहुल शं. म्होपरे**
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ २०१९-२०

- **अध्यक्ष**

  **अनिल बा. सूर्यवंशी (सोलापूर)**

- **कार्याध्यक्ष**

  **कैलास के. पाटील (परभणी)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**
  **रामकृष्ण टाले (नागपूर)**
  **अजय दरेकर (बारामती)**

- **सदस्य**

  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **स्नेहा देशपांडे (नागपुर)**
  **बळवंत कोरे (कराड)**
  **गणेश मांगडे (दापोली)**
  **माधव शिंदे (अहमदनगर)**
  **सुरेश ढाके (भुसावळ)**
  **शिवाजी काकडे (बीड)**
  **अरुण पिसे (धुळे)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **दयाळू राठोड (अकोला)**
  **मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)**

- **स्वीकृत सदस्य**

  **जयवंत इंगळे (विटा)**
  **गोरक्षनाथ सानप (संगमनेर)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **संजय जगदेव कोठारी (नांदगाव)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७


**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

  आजीव सदस्य : रु.३०००/- (एकरकमी)
  इमारत निधी : रु.२०००/-
  सदस्य सूची : रु. १००/-
  एकूण : रु. ५१००/-

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

  शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालये } रु.२०००/-(त्रैवार्षिक) रु.३०००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टिप: म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# कोरोनाचे सावट आणि २०२१चा केंद्रीय अर्थसंकल्प

**विनायक श्रीधर देशपांडे** †

भारताचा २०२१चा अर्थसंकल्प आपत्कालीन परिस्थितीत सादर करण्यात आला. कोविडच्या महामारीमुळे भयग्रस्त जनतेला दिलासा मिळण्याच्या दृष्टिने मा. अर्थमंत्री कुठल्या तरतुदी करणार याकडे सामान्य जनतेचे लक्ष होते. आरोग्य, व्यवसाय आणि विविध समाजातील विविध गट यावर कोरोनाचा प्रखर परिणाम झाला. कधी अंशतः तर कधी पूर्णतः लॉकडाऊन यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेलादेखील दोलायमान स्थितीशी सामना करावा लागला. पुरवठा शृंखलामधील त्रुटी उघडकीस येऊ लागल्या आणि सामाजिक/भौतिक अंतराचे पालन करणे अनिवार्य झाल्याने आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यास विलंब होऊन वृद्धिदर घसरण, वाढती राजकोषीय तूट, मुद्रा स्फिती अशा समस्यांनी अर्थव्यवस्था ग्रासली गेली. यंदाचा अर्थसंकल्प सादर करताना बेरोजगारी, कामगारांचे स्थलांतरण, वस्तुंच्या मागणीत झालेली घट, वेतनाची हानी, शासनाचा घसरता महसूल अशी अनेक आर्थिक आव्हाने समोर होती.

अर्थसंकल्प २०२१-२२ या वर्षाकरिता वित्तीय तरतुदी प्रमुख सहा घटकांवर आधारित असतील असे मा.वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी नमूद केले. १.आरोग्य आणि सुस्थिती २.भौतिक, वित्तीय भांडवल आणि आधारभूत संरचना ३.महत्त्वाकांक्षी भारतासाठी सर्वसमावेशक विकास ४.मानवी भांडवलाचे पुनर्मिलन ५.नवोपक्रम, संशोधन आणि विकास ६.किमान शासन महत्तम सुशासन.

मेक इन इंडियाला चालना मिळावी म्हणून सीमाशुल्कात वाढ, सार्वजनिक क्षेत्रातील दोन बँका आणि सामान्य विमा कंपनीचे निर्गुंतवणुकीकरण, निवडणुका होऊ घातलेल्या राज्यांमध्ये आधारभूत संरचनेला चालना या प्रमुख घोषणा अर्थसंकल्प सादर करताना करण्यात आल्या. राजकोषीय तूट सकल देशीय उत्पादित वस्तुंच्या ९.५% नोंदविण्यात आली तर २०२१-२२ या वर्षासाठी ही तूट ६.८% राहील असा अंदाज वर्तविण्यात आला. वैयक्तिक आयकर मर्यादा अबाधित ठेवण्यात आली. या दशकातील हा पहिलाच अर्थसंकल्प असून सकल देशीय उत्पादन उणे असताना सादर होणारे हे कदाचित पहिलेच अंदाजपत्रक असावे. शेअर बाजाराने अर्थसंकल्पाचे सादरीकरण होत असताना २३०० अंकांनी उसळी मारली. खाजगीकरण/मौद्रीकरण

† प्राध्यापक, व्यवसाय व्यवस्थापन विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
आजीव सभासद क्र. ४६९, भ्रमणध्वनी : ९८२२७३७७२५, ई-मेल : vinayak.desh1961@gmail.com

बाबतच्या वक्तव्याला तो एक धनात्मक प्रतिसादच मानावा लागेल.

**कोविड आणि भारतीय अर्थव्यवस्था**

कोविडचा परिणाम वैश्विक व्यापारावर गंभीररित्या होत असल्याने देशांतर्गत उत्पादन आणि मागणी घटण्यास सुरुवात झाली. कारखाने बंद पडल्याने रोजगार निर्मितीत घट होऊन सकल देशीय उत्पादन घसरले. प्रत्येक राष्ट्राची परिस्थिती भिन्न भिन्न असल्याने इतर राष्ट्रांनी केलेल्या उपाययोजनांचे अनुकरण आपल्याला करता येणे शक्य होत नाही. अर्थसंकल्प हे एक महत्त्वाकांक्षा दर्शविणारे दस्तऐवज मानता येईल. मात्र दरम्यान काही घडामोडी झाल्यास संकल्पाची पूर्तता होण्याबाबत शाश्वती देता येत नाही. कोविडशी सामना करताना आर्थिक पुनरुत्थानाचे महत्त्वपूर्ण आव्हान राष्ट्रापुढे आहे. वैद्यकीय सुधारणा झाल्यास आर्थिक सुधार घडून येईल, असा आशावाददेखील व्यक्त करण्यात येतो. यंदाचा अर्थसंकल्प भारताचा सातत्याने घसरत असलेल्या वृद्धिदराच्या संदर्भात आणि कोविडची पार्श्वभूमी लक्षात घेता वेगळ्या स्वरूपाचा राहणार असे भाकीत वर्तविण्यात येत होते. सामान्य जनतेच्या त्यांच्या हिताच्या दृष्टिने फारशा अपेक्षा या अर्थसंकल्पाकडून मुळातच नसल्याने निराशाजनक अर्थसंकल्प अशा आशयाच्या प्रतिक्रिया अर्थसंकल्पाच्या सादरीकरणानंतर आढळल्या नाहीत.

भारताच्या आर्थिक वृद्धिदराची २०१६-१७ पासून होणारी घसरण थांबलीच नाही. कोविडमुळे वृद्धिदर २०२०-२१ मध्ये ऋणात्मकदेखील झाला. पहिल्या तिमाहीत वृद्धिदर -२४%, दुसऱ्या तिमाहीत -७.५% अशा रीतीने वृद्धिदर नोंदविण्यात आला.

**तक्ता क्र. १ भारताचा आर्थिक वृद्धिदर**

| अ.क्र. | वर्ष | वृद्धिदर |
|---|---|---|
| १ | २०१६-१७ | ८.२% |
| २ | २०१७-१८ | ७.२% |
| ३ | २०१८-१९ | ६.१% |
| ४ | २०१९-२० | ४.२% |
| ५ | २०२०-२१ | -८ ते -१०% |

स्त्रोत : आर्थिक पाहणीचे विविध अंक (२०१६-१७ ते २०२०-२१)

वैश्विक वित्तीय अरिष्टानंतर भारताचा ४.२% वृद्धिदर सर्वात निम्न स्तरावर होता. सध्याची अर्थव्यवस्था ही नियमित अर्थव्यवस्था नसून कदाचित एक वर्षाहून अधिकचा काळ अर्थव्यवस्था रूळावर आणण्यास लागणार आहे. त्यामुळे काही काळ तरी वृद्धिदराच्या आकडेवारीला कदाचित फारसे गांभीर्याने घेतले जाणार नाही.

**अर्थसंकल्पाने दिलेले संकेत:**

● यंदाच्या अर्थसंकल्पाचा भर मागणी व्यवस्थापनेपेक्षा पुरवठा व्यवस्थापनावर अधिक दिसतो. 'पुरवठा आपल्या स्वत:च्या मागणीची निर्मिती करतो' या 'जे.बी.से' यांच्या नियमाचे पालन धोरणात्मक चौकटीच्या माध्यमाने करण्याचा प्रयत्न असावा.

● बाजारधिष्ठित अर्थव्यवस्थेला प्राधान्य देऊन वृद्धिदराला चालना मिळेल, या गृहीतावर आधारित अर्थसंकल्पाची रचना आढळून येते. सार्वजनिक उद्योगांच्या खाजगीकरणाच्या घोषणेने बाजार व्यवस्थेला झुकते माप आणि वृद्धीला प्राधान्य ही उद्दिष्टे अर्थसंकल्पाची आहेत. गतवर्षीच्या अर्थसंकल्पात निर्गुंतवणुकीचे लक्ष्य रु.२.१ लाख कोटीचे होते, यंदा हे लक्ष्य रु.१.७५ लाख कोटी एवढे निर्धारित करण्यात आले आहे. यांत सार्वजनिक क्षेत्रातील दोन बँका आणि एक इन्शुरन्स कंपनी यांचा समावेश आहे.

● आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्याच्या उद्देशाने सीमा शुल्कात वाढ करून संरक्षणवादी धोरणाचा स्वीकार करण्यात आला. परंतु जागतिकीकरणाला भारताचा विरोध असल्याचे जाणवत नाही.

● अपेक्षेप्रमाणे कुठल्याही लोकप्रिय घोषणा अर्थसंकल्पात नाहीत. मात्र निवडणुकांना सामोरे जाणाऱ्या राज्यांना अर्थसंकल्पाच्या माध्यमाने आर्थिक लाभ प्राप्त होऊ शकतो हे या अर्थसंकल्पाने अधोरेखित केले आहे. राष्ट्रीय महामार्ग, रस्तेबांधणी यासारख्या आधारभूत संरचना उभारण्यास राज्यांना मदत होते. वेगवेगळ्या राज्यात विभिन्न वेळा निवडणुका होणे ही राज्यांचा आर्थिक विकास साध्य करण्याच्या दृष्टिने चांगली बाब आहे. पश्चिम बंगाल रु.२५,००० कोटी, केरळ रु.६५,००० कोटी, तामिळनाडू रु.१.०३ लाख कोटी आणि आसाम रु.३४,००० कोटी अशा प्रकारे वित्तीय तरतुदी या राज्यांच्या आधारभूत संरचनेच्या विकासासाठी करण्यात आल्या आहेत.

● आधारभूत संरचना निर्माण करून आर्थिक वृद्धीला चालना मिळेल या अपेक्षेने यंदाच्या अर्थसंकल्पात शासकीय भांडवली खर्चात रु.५.५ लाख कोटीची तरतूद करण्यात आली आहे. २०२०-२१च्या रु.४.१२ लाख कोटीच्या अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा यात ३४.५ टक्क्याने वाढ करण्यात आली आहे. गुणकाच्या साहाय्याने या भांडवली गुंतवणुकीमुळे उत्पन्नात वाढ होऊ शकेल, अशी आशा बाळगता येईल.

● २०२१-२२च्या अर्थसंकल्पापूर्वी कोविड-१९ महामारीच्या आर्थिक परिणामांना प्रतिसाद देण्याच्या दृष्टिने आणि उद्योगांना चालना मिळावी म्हणून आर्थिक पॅकेजची घोषणादेखील वेळोवेळी करण्यात आली. अर्थसंकल्पाची ती एक लहान प्रतिकृतीच होती, असे मानण्यात येते. फेब्रुवारी २०२१चा अर्थसंकल्प म्हणजे २०२० मध्ये राबविण्यात आलेल्या धोरणांचे दृढीकरण (Consolidation) आणि त्यात सुधार घडवून आणण्याची एक प्रक्रियाच होती.

● अर्थव्यवस्था पूर्ववत स्थितीत आणण्यासाठी भारतात राजकोषीय धोरणाच्या तुलनेत मौद्रिक धोरणाला प्राधान्य देण्यात आल्याचे दिसते. राजकोषीय प्रतिसादात जबाबदारीची जाण मौद्रिक प्रतिसादापेक्षा अधिक असते. अर्थव्यवस्थेला चालना मिळावी म्हणून भारत आणि इतर विकसनशील राष्ट्रांमध्ये राजकोषीय आणि मौद्रिक उत्तेजनात्मक धोरणांचा अवलंब राजकोषीय तूट-अर्थसंकल्पीय अंदाज करण्यात आला.

२०१९-२० या वित्तीय वर्षासाठी राजकोषीय तुटीचा अंदाज रु.७.०४ लाख कोटीचा होता, प्रत्यक्षात तूट रु.९.३५ लाख कोटीपर्यंत वाढली. २०२०-२१ या वर्षासाठी अंदाजित राजकोषीय तूट रु.७.९६ लाख कोटी होती यांत वाढ होऊन सुधारित अंदाज रु.१८.४८ लाख कोटी दर्शविण्यात आला. यांत रु.१०.५२ लाख कोटीची वाढ झाली. कोविडच्या प्रादुर्भावामुळे महसुलात झालेली घट आणि वाढता खर्च हे घटक तूट वाढण्यास कारणीभूत ठरले. २०२१-२२ साली

**तक्ता क्र. २ : उत्तेजनात्मक उपाययोजना**

| उत्तेजन | भारत | विकसनशील राष्ट्रे |
|---|---|---|
| राजकोषीय उत्तेजन | जी.डी.पी.च्या २.२% | जी.डी.पी.च्या ४.४७% |
| मौद्रिक आणि पत उत्तेजन | जी.डी.पी.च्या १३% | जी.डी.पी.च्या ३.५% |

स्त्रोत: रुचीर शर्मा यांच्या अभ्यासाच्या आधारे

राजकोषीय तूट ही सकल देशीय उत्पादनाच्या जवळपास ६.८% राहील असा अंदाज वर्तविण्यात आला. पुढील वर्षात बाजारातून होणारी शासनाची कर्जाची उचल रु.१२ लाख कोटीपर्यंत जाईल. राजकोषीय एकत्रीकरणाची (Fiscal Consolidation) शासनाची योजना पुढे सुरूच ठेवण्यात येऊन २०२५-२६ पर्यंत ही तूट सकल देशीय उत्पादनाच्या ४.५ टक्क्यापर्यंत आणण्याचा शासनाचा मानस आहे.

**राजकोषीय आखणी :**

विविध मार्गाने महसूल संघटित करून उत्पादक कामात लावणे आणि महसुलाचे नवे स्त्रोत पडताळून बघणे हे २०२१-२२च्या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य आहे. संपत्तीचे मौद्रिकीकरण, निर्गुंतवणुकीकरण, शासनाने धारण केलेल्या संपत्तीची व्यूहरचना आखून विक्री करणे, प्रारंभिक सार्वजनिक अर्पण (Initial Public Offering) केंद्रीय सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण, सार्वजनिक-खाजगी भागीदारी उपक्रम या स्त्रोतांवर महसूल वाढविण्याच्या दृष्टीने भर दिसतो. वरवर बघता, शासनाचा कल गैर गाभा क्षेत्रातील उद्योगांचे हळूहळू खाजगीकरण करण्याकडे असून विविध स्त्रोतांकडून अधिकचा निधी संकलित कसा करता येईल या दिशेने प्रयत्न करण्याकडे आहे. सार्वजनिक क्षेत्राातील उद्योगांची ३००च्या आसपास असलेली संख्या साधारण एक डझनपर्यंतच येण्याची शक्यता आहे. 'रचना उभारणे, कर्जाऊ रक्कम उचलणे, मुद्रीकरण करणे आणि परतफेड' याचे स्पष्ट उच्चारण अर्थसंकल्पात आढळून येते.

अर्थसंकल्प २०२१-२२ ने भांडवली खर्चाला प्राधान्य देऊन सकल देशीय उत्पादनात वाढ करण्याची योजना आखली आहे. गुणकाच्या साहाय्याने उत्पन्नात वाढ होईल, अशी अपेक्षा आहे. आधारभूत संरचनेच्या विकासासाठी येत्या पाच वर्षासाठी रु.५ लाख कोटीची तरतूद करण्यात आली असून, कोविडची पार्श्वभूमी लक्षात घेता आरोग्य आणि सुस्थिती यासाठी पुढील सहा वर्षापर्यंत रु.६४,१८० कोटीची अनुमानित राशी ठेवण्यात आली आहे. ही वाढ पूर्वीच्या रु.२ लाख २३ हजार ८४६ कोटी रुपयावरून करण्यात आली. संशोधनाची जबाबदारी येणाऱ्या काळात अधिकाधिक खाजगी क्षेत्राकडे वळविण्याचे संकेतदेखील अर्थसंकल्पात दिसतात. येत्या पाच वर्षापर्यंत राष्ट्रीय संशोधन निधी रु.५०,००० कोटीचा राहील.

**कर महसूल :** २०१९-२०या वर्षासाठी प्रत्यक्ष कर महसूल रु.२.९३ लाख कोटीने कमी झाला. अर्थसंकल्पीय अंदाजित रकमेच्या तुलनेत ही रक्कम १७.७६ टक्क्याने कमी होती. २०२०-२०२१च्या सुधारित अंदाजात देखील अर्थसंकल्पीय अंदाजित रकमेच्या तुलनेत रु.२.९१ लाख रुपयाने म्हणजे साधारण १७.७९ टक्क्याने घट झाली. तक्ता क्र ३च्या आधारे घटता महसूल आणि वाढता खर्च याचा अंदाज येऊ शकेल. घसरते सकल देशीय उत्पादन, महसूल प्राप्तीची रोडावलेली स्थिती आणि वाढती राजकोषीय तूट ही खरी आर्थिक आव्हाने

अर्थव्यवस्थेपुढे उभी ठाकली आहेत.

कॉर्पोरेशन करापासून प्राप्त महसूल २०१९-२०मध्ये रु.२.०९ लाख कोटीने घट झाली (२७.२८) तर २०२०-२१ या वर्षात २.३५ लाख कोटीने निगम करापासून प्राप्त महसूल कमी झाला (३४.५१) मार्च २०20 पासून निगम क्षेत्राच्या कार्यशैलीत बदल झाल्याने या क्षेत्राची कामगिरी निराशाजनक राहिली. तसेच उत्पन्नापासून होणारी

**तक्ता क्र ३ : अर्थसंकल्पीय तरतुदी**

| विवरण | २०१९-२० प्रत्यक्ष | २०२०-२१ सुधारित अंदाज | २०२१-२२ अर्थसंकल्पीय अंदाज | वार्षिक बदल (टक्केवारी) २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|---|---|
| | प्राप्ती (रु.लाख कोटी) वार्षिक बदल | | | | |
| कर प्राप्ती | १३.५७ | १३.४५ | १५.४५ | -०.८८ | १४.८७ |
| करेत्तर प्राप्ती | ३.२७ | २.११ | २.४३ | -३५.४७ | १५.१७ |
| भांडवल प्राप्ती (कर्ज वगळून) | ०.६८ | ०.४६ | १.८८ | -३२.३५ | ३०८.७० |
| एकूण प्राप्ती | १७.५२ | १६.०२ | १९.७६ | -८.५६ | २३.३५ |
| | खर्च (रु.लाख कोटी) | | | | |
| महसूल खर्च | १७.३९ | २३.१८ | २१.१९ | ३३.२९ | -८.५६ |
| भांडवली खर्च | ३.३६ | ४.३९ | ५.५४ | ३०.६५ | २६.२० |
| एकूण खर्च | २०.७५ | २७.५७ | २६.७३ | ३२.८७ | -३.०५ |
| राजकोषीय तूट | ९.३५ | १८.४८ | १५.०७ | ९७.६५ | -१८.४५ |
| स.दे.उ. | २०१.९८ | १९८.८२ | २२२.८७ | -३.५४ | १४.४० |

करप्राप्ती २०१९-२० या वर्षात रु.०.७६ लाख कोटीने (१३.३६) आणि २०२०-२१ या वर्षात रु.१.७९ लाख कोटीने (२८.०६) कमी झाली. कोरोनाचा विपरित परिणाम उत्पन्नावर देखील मोठ्या प्रमाणावर झाल्याने कर प्राप्ती घटली.

अप्रत्यक्षकराच्या बाबतीत सीमा शुल्कापासून प्राप्त महसूल २०१९-२० ला रु.०.४७ लाख कोटीने कमी झाला (३०.१३). २०२०-२१या वर्षासाठी या रकमेत रु.०.२६ लाख कोटीची घट झाली (१८.८४). आयातीत झालेली घसरण याला कारणीभूत असल्याचे म्हटल्यास वावगे ठरू नये. उत्पादन शुल्काच्या प्राप्तीत मात्र २०२०-२१ या वर्षात रु.०.९४ लाख कोटीने (३५.२१) वाढ झाली, २०१९-२० मध्ये उत्पादन शुल्कापासून होणारी प्राप्ती रु.०.६० लाख कोटीने (२०.००) कमी झाली होती. पेट्रोल आणि डिझेलवर आकारण्यात येणारी लेव्ही अनन्य स्वरूपाची असल्याने महसूल प्राप्तीमधील कमतरता उत्पादन शुल्कातुन भरून काढण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किंमती हे याचेच द्योतक आहे.

घसरत्या सकल देशीय उत्पादनाचा परिणाम वस्तू आणि सेवा कराच्या प्राप्तीवरदेखील झाल्याचे अर्थसंकल्पाशी संबंधित दस्तऐवजाचे अवलोकन

केल्यास लक्षात येते. जी.एस.टी.पासून मिळणारे उत्पन्न २०१९-२० या वर्षासाठी रु.०.६४ लाख कोटी रुपयाने (९.६५) कमी झाले आणि २०२०-२१या वर्षासाठी यात रु.१.७६ लाख कोटी (२५.४७) ने घट झाली. वस्तू आणि सेवा कराच्या प्राप्तीत झालेली घट संपूर्णपणे कोविडमुळे झाली हे म्हणणे धाडसाचे होईल. परंतु महसूल प्राप्तीच्या इतर स्त्रोतांमध्ये आलेली कमतरता कोविडमुळेच झाली हे मान्य करता येईल.

**करेत्तर महसूल :** २०१९-२०या वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाजित रकमेच्या तुलनेने प्रत्यक्ष करेत्तर महसूल रु.०.१४ लाख कोटीने म्हणजेच ४.४७ टक्क्याने कमी झाला. २०२०-२१ या वर्षाच्या सुधारित अंदाजात रु.१.७४ लाख कोटीची (४५.१९) तूट दर्शविण्यात आली आहे. ही तूट लाभांश आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या नफ्यात झालेली घट यामुळे निर्माण झाली.

**भांडवल प्राप्ती :** भांडवली उत्पन्न अर्थसंकल्पीय अंदाजित रकमेच्या तुलनेने २०१९-२० या वर्षासाठी रु.०.५२ लाख कोटीने (४३.३३) कमी झाले. तसेच २०२०-२१च्या सुधारित अंदाजातदेखील रु.१.७९ लाख कोटीची (७९.५६) तूट दर्शविण्यात आली आहे. व्यूहनीती आखून निर्गुंतवणुकीच्या प्रक्रियेला विलंब झाल्याने ही दरी निर्माण झाली असावी.

**खर्च :** २०१९-२० या वर्षातील प्रत्यक्ष महसुली खर्च अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत रु.०.४९ लाख कोटीने (२.७९) कमी झाला. प्रत्यक्ष करण्यात आलेला भांडवली खर्च २०१९-२०या वर्षासाठी जवळपास अंदाजित रकमेइतकाच होता. अलक्षणीय अशी रु.०.०३ लाख कोटी (०.८८) इतक्याच रकमेने भांडवली खर्च घटला. २०२०-२१या वर्षासाठी एकूण सुधारित खर्च अंदाजित रकमेच्या तुलनेत रु.४.२३ लाख कोटीने (१८.१२) वाढविण्यात आला आहे.

### शैक्षणिक क्षेत्र आणि अर्थसंकल्प

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या तरतुदी लक्षात घेणे उद्‌बोधक ठरेल. २०२०-२१या वर्षासाठी शालेय शिक्षण आणि साक्षरता तसेच उच्च शिक्षणासाठी रु.९९,३१२ कोटीची तरतूद करण्यात आली होती. मात्र २०२१-२२ या वर्षासाठी शैक्षणिक क्षेत्राच्या खर्चाचा अंदाजित खर्च रु.९३,२२४ कोटी पर्यंतचा करण्यात आला आहे. गतवर्षाच्या तुलनेत शैक्षणिक क्षेत्रासाठी आवंटीत रक्कम ६.५३ टक्क्याने कमी करण्यात आली. शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागासाठी रु.५४,८७४ कोटी तर उच्च शिक्षण विभागासाठी रु.३८,३५० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. सकल देशीय उत्पादनाच्या ६% रक्कम शिक्षणावर खर्च करण्याचे उद्दिष्ट आजतागायत पूर्ण होऊ शकले नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या संदर्भात शिक्षण क्षेत्रावरील खर्चात वाढ होणे अपेक्षित होते.

स्वयंसेवी संस्था आणि खाजगी शाळांच्या सहभागाने १०० नव्या सैनिकी शाळा आणि लेह येथे केंद्रीय विद्यापीठ स्थापन करण्याचा मानस शासनाचा आहे. उच्च शिक्षण आयोगाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिने आवश्यक कायदेशीर कार्यवाही यंदाच्या वर्षी पूर्ण करण्यात येईल, अशी घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली. प्रमाणीकरण, मान्यता, विनियमन आणि निधीकरण ही कामे आयोगाच्या छत्र छायेखाली राहतील.

संपूर्ण देशातील १५,००० शाळांची निवड करून त्या त्या प्रदेशांमधील इतर शाळांनी अनुकरण करण्याच्या दृष्टिने गुणवत्तापूर्ण शाळांचे आदर्श उदाहरण या निवडक शाळा इतर शाळांसमोर ठेवतील. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी आणि ध्येयपूर्ती करण्याच्या उद्देशाने या शाळा नेतृत्व प्रदान करून

इतर शाळांना साहाय्यभूत ठरतील.

शालेय शिक्षकांसाठी प्रमाणिकृत व्यवस्था उभारण्याच्या दृष्टिने राष्ट्रीय व्यावसायिक मानके विकसित करण्यात येतील. देशातील सध्याच्या सार्वजनिक आणि खाजगी शाळांमधील ९२ लाख शिक्षकांवर याचा प्रभाव पडेल, असे मानण्यात येते.

देशांतील नऊ शहरांमधील संशोधन संस्थांची पारख करून, त्यांना महाविद्यालये आणि विद्यापीठे यांच्याशी जोडण्यात येऊन त्यांच्यात तालमेल राखून आणि त्यांची अंतर्गत स्वायत्तता अबाधित ठेवून औपचारिक रचना उभारण्यात येईल. या संस्थाच्या माध्यमाने समस्यांची सोडवणूक आपसातील समन्वयाने होऊ शकेल. याकरिता 'ग्लु ग्रान्ट'ची स्थापना करण्यात येईल, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नमूद केले.

आदिवासी भागात ७५० एकलव्य आदर्श निवासी शाळा स्थापन होणार आहेत. यासाठी प्रत्येक शाळेच्या बांधकाम आणि इतर कार्यासाठी रु.३८ कोटीची तर डोंगरी आणि अवघड भागात शाळा स्थापन करण्यासाठी रु.४८ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर स्कॉलरशीप योजना, सहा वर्षासाठी (२०२५-२६पर्यंत) केंद्राच्या मदतीने सुरू करण्यात येईल याकरिता रु.३५,२१९ कोटीची तरतूद करण्यात आली असून ४ कोटी विद्यार्थी या योजनेमुळे लाभान्वित होतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पदवी आणि पदविका धारण करणाऱ्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी शिक्षुता (Apprenticeship) प्रारंभ करण्याच्या उद्देशाने संधी उपलब्ध व्हावी म्हणून रु.३,००० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

शाळांचे प्रमुख आणि शिक्षक यांची समग्र प्रगती व्हावी म्हणून राष्ट्रीय स्तरावर पुढाकार (National Initiative for School Heads and Teachers for Holistic Advancement-NISHTA) या अंतर्गत २०२१-२२ या वर्षात ५६लाख शालेय शिक्षक डिजिटली प्रशिक्षित होतील. युनायटेड अरब एमिरीटस सोबत भागीदारी करून श्रमिक दलाच्या कौशल्य स्तराचे तलचिन्हांकन (Benchmark) करण्याचा मानस अर्थसंकल्पात व्यक्त करण्यात आला.

राष्ट्रीय संशोधनासाठी (National Research Foundation- NRF) पुढील ५ वर्षापर्यंत रु. ५०,००० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. खरे तर मागील अर्थसंकल्पात दरवर्षी रु.२०,००० कोटीची तरतूद याकरिता करण्याची घोषणा करण्यात आली होती. यंदाची तरतूद रु.१०,००० कोटीपर्यंतची राहील. संशोधन आणि नवप्रवर्तन यासाठी सकल देशीय उत्पादनाच्या किमान १% रकमेची तरतूद व्हावी, अशी अपेक्षा होती. २००८ साली संशोधन आणि नवप्रवर्तनासाठी करण्यात आलेली तरतूद ०.८४% होती यात घट होऊन २०१४ साली ती ०.६४% झाली. ही रक्कम राज्यांतील अविकसित भागालादेखील कशी प्राप्त होईल, याचा विचार व्हावा.

**अर्थसंकल्प २०२१ आणि कृषीक्षेत्र**

गतवर्षीच्या सुधारित अंदाजाच्या तुलनेत कृषी, सहकार आणि शेतकरी या विभागासाठी यंदाच्या सुधारित अंदाजात फक्त ५ टक्क्याने वाढ करण्यात आली. परंतु अर्थसंकल्पीय अंदाजात २०२०च्या अर्थसंकल्पाच्या तुलनेत ८ टक्क्याची घट आढळते. २०२१-२२ या वर्षासाठी एकूण आवंटन रु.१.२३ लाख कोटी असून २०२०-२१ या वर्षासाठी सुधारित अंदाज रु.१.१६ लाख कोटी तर अर्थसंकल्पीय अंदाज रु.१.३४ लाख कोटी होते.

न्यूनतम आधार किंमत हा विषय वादग्रस्त राहिला, आंदोलनकर्ते न्यूनतम किमतींना कायद्याच्या चौकटीत आणण्याची मागणी करीत होते. शासनाने न्यूनतम आधार किंमत पर्व असेच सुरू राहील, असे मौखिक आश्वासन देण्याचा देखील प्रयत्न केला. विपणन मध्यस्थी योजना आणि किंमत आधार योजना, प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण योजना (PM-AASHA) या दोन्ही योजनांमध्ये न्यूनतम मूल्याच्या अंमलबजावणीची शाश्वती अभिप्रेत आहे; परंतु गेल्या दोन वर्षात या योजनेसाठी आवंटीत (Allotted) रकमेत सातत्याने घट होत असल्याचे दिसते. २०२१-२२ या वर्षासाठी आवंटीत रक्कम रु.१५०० कोटी असून यात गेल्या वर्षीच्या तुलनेत २५ टक्क्याने घट झाली. पी.एम.आशा या योजनेच्या रकमेत २०१९-२० च्या रु.१५०० कोटीपासून या अर्थसंकल्पात (२०२१-२२) घट होऊन रु.४०० कोटींची तरतूद करण्यात आली. शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ए.पी.एम.सी.च्या आधारभूत रचनेत सुधार करण्याच्या दृष्टीने रु.९०० कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली. प्रत्यक्ष रोख हस्तांतरण या योजनेच्या रकमेत कोरोना व्हायरस डिसीज (COVID-19) ची परिस्थिती लक्षात घेता यात वाढ होईल, अशी अपेक्षा होती. या योजनेअंतर्गत रु.६००० प्रतिवर्ष शेतकऱ्यांच्या बँकेच्या खात्यात रु.२००० प्रत्येकी यानुसार तीन टप्प्यात जमा होतात. यात कुठलाही बदल करण्यात आला नाही. २०२१-२२ या वर्षासाठी एकूण आवंटन रु.६५,००० कोटी इतके करण्यात आले. गतवर्षीच्या सुधारित अंदाजाच्या रकमे इतकेच हे कायम राहिले. परंतु २०२०-२१च्या अर्थसंकल्पीय अंदाजित रकमेच्या तुलनेत यात १३ टक्क्याने घट झाली. कृषी क्षेत्राचे सकल देशीय उत्पादनातील योगदान १५% म्हणजे जवळपास ३ लाख कोटी आहे हे ध्यानात ठेवून कृषिक्षेत्राला त्याचा योग्य हिस्सा मिळावा, ही माफक अपेक्षा आहे.

**अर्थसंकल्पातील इतर तरतुदी:**

- निष्क्रिय मालमत्ता उत्पादक नसल्याने त्याचे मुद्रीकरण करण्याचा निर्णय या अर्थसंकल्पात घेण्यात आला. खाजगीकरणाचाच हा एक प्रकार मानता येईल. या निमित्ताने शासनाच्या निष्क्रिय मालमत्तेचे मापन होऊन त्याची योग्य रीतीने विल्हेवाट होऊ शकेल. शासनाच्या अखत्यारित असलेल्या निष्क्रिय जमिनीचे मुद्रीकरण केल्यास प्राप्त रकमेचा उपयोग विधायक कार्यासाठी करता येईल. मात्र या जमिनी लोकांनी/उद्योजकांनी घेतल्यानंतर त्याचा वापर उत्पादक कामासाठी होतो अथवा नाही यासाठी विनियमन करणे गरजेचे आहे. अन्यथा, जमिनीत गुंतवणूक करून वाढत्या किंमतीचा लाभ घेणे एवढाच मर्यादित उद्देश राहील. डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा (Monetization of Assets) 'संपत्तीचे मौद्रिकरण' हा अभ्यास या संदर्भात उपयुक्त ठरावा.

- भारतामध्ये जुनी वाहने जवळपास १ कोटीहून अधिक आहेत, या वाहनांचीदेखील विल्हेवाट लावण्याची योजना अर्थसंकल्पात नमूद करण्यात आली आहे. १५ ते २० वर्षे जुनी वाहने पर्यावरणाला घातक ठरू शकतात आणि इंधनाचा वापरदेखील मोठ्या प्रमाणावर होतो यावर नियंत्रण यावे म्हणून हा निर्णयदेखील स्वागतार्ह आहे. या वाहनांच्या सुट्या भागांचे पुनश्चक्रण (Recycling) देखील करता येऊ शकेल. भारतीयांना आता आपल्या भावनांना आवर घालावा लागेल, जुनी वाहने जोपासणे ही काही लोकांची आवड असते, वस्तुंबाबतदेखील आपण संवेदनशील असतो. येणाऱ्या काळात अधिक

व्यावहारिक होऊन आपल्या जुन्या वाहनांची विल्हेवाट लावत नवीन तंत्रज्ञानाचा लाभ प्राप्त करण्यास सज्ज व्हावे लागेल.

● करांच्या बाबतीत विवादात्मक प्रकरणांच्या फाईली ६ वर्षांपर्यंत तपासता येऊ शकत होत्या. आता मात्र अशा विवादात्मक फाईल्स ३ वर्षांपर्यंतच बघता येतील. प्रकरणे जर रु.५० लाखांपेक्षा अधिकच्या असतील तर अशा प्रकरणांच्या फाईली १० वर्षांपर्यंत तपासता येतील, अशी तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

● भारतात नव्या विकास वित्त संस्था स्थापन करण्याचा मानस यंदाच्या अर्थसंकल्पात व्यक्त करण्यात आला. रु.२०,००० कोटीच्या भांडवल आधारे ही संस्था प्रस्थापित होईल आणि येत्या तीन वर्षात कर्जाऊ रकमेचे उद्दिष्ट रु. ५ लाख कोटी निर्धारित करण्यात आले आहे. व्यावसायिकपणे या संस्थेचे व्यवस्थापन करण्यात येऊन ही संस्था आधारभूत संरचना उभारण्यासाठी वित्तपुरवठा करेल. खाजगी क्षेत्राला देखील अशा संस्था स्थापन करण्याची परवानगी देण्यात येईल.

● २०२१-२२ या वर्षासाठी लष्करी खर्च रु. ४,७८,१९६ कोटीपर्यंत वाढविण्यात आला गतवर्षीच्या तुलनेत ही वाढ (रु.४,७१,३७८ कोटी) १.४ टक्क्याने झाली. एकूण आवंटीत रकमेपैकी भांडवली खर्चासाठी रु.१.३५ लाखाची तरतूद करण्यात आली आहे. यात नवी शस्त्र खरेदी, लढाऊ विमाने, जहाज यांचा समावेश आहे. २०२०-२१ च्या सुधारित अंदाजाच्या तुलनेत (रु.३३,२१३ कोटी) यंदा एकूण भांडवली खर्चासाठी रु. ३६,४८१ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

● गतवर्षी भारताचे कर्ज रु.१४७ लाख कोटी होते, यंदा शासन रु.१२ लाख कोटी अधिकचे कर्ज उचलणार आहे. यंदा सकल देशीय उत्पादन रु.१९४ लाख कोटी राहील, असा अंदाज आहे. बहुतांश उदयोन्मुख राष्ट्रांचे कर्ज त्यांच्या सकल देशीय उत्पादनाच्या ४० ते ५० टक्के आहे. त्यांच्या तुलनेत आपल्या कर्जाची रक्कम सकल देशीय उत्पादनाच्या ७५ ते ८० टक्क्यापर्यंत आहे.

**समारोप :**

अर्थव्यवस्थेवर कोविडमुळे गंडांतर आले असताना हा अर्थसंकल्प सादर झाला. साधारण रु.२०० लाख कोटीची आपली अर्थव्यवस्था आहे, येत्या वित्तीय वर्षात तूट जवळपास २० लाख कोटींची असणार, वृद्धिदर ४.२% आणि बेरोजगारीने गाठलेला उच्चांक (डिसेंबर२०२०-९.१%) यावरून अर्थव्यवस्थादेखील गंभीर अरिष्टाशी सामना करीत आहे हे स्पष्ट होईल. सप्टेंबर २०१९ मध्ये निगम कर ३० टक्क्याहून २२ टक्क्यांवर आला, याचा परिणाम म्हणजे रु.१.४५ लाख कोटीचा फटका शासनाच्या मिळकतीवर झाला.

कोरोना व्हायरसशी लढा देताना रोजगार निर्मितीला चालना, ग्रामीण विकास आणि अर्थव्यवस्थेची गाडी रूळावर आणून जागतिक स्तरावरील जलद आर्थिक विकास साधणारा देश हे स्थान प्राप्त करणे ही उद्दिष्टे यंदाच्या अर्थसंकल्पाची होती. आत्मनिर्भर भारत यावर भर असल्याने आयात शुल्कात वाढ करण्यात आली. संरक्षणवादी धोरणे देशाचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदतगार ठरू शकतील का? यावर आत्मनिर्भर भारताची यशस्विता अवलंबून राहील.

**संदर्भ सूची**

१. Budget Circular 2021-2022. Ministry of Finance, Department of Economic Affairs New Delhi. (www.dea.gov.in)

२. Budget 2021-22, speech of Nirmala Sitharaman Ministry of Finance. February 1,2021.( indiabudget.gov.in)

३. Chava Sreehari, 'Union Budget 2021-03-22: A Costnomic View' The Management Accountant, March 2021 Vol.56 No.03. (Page No. 75-78)

४. Economic Survey (Various Issues) Volume I &II. Government of India Ministry of Finance, Department of Economic Affairs, Economic Division.

५. Union Budget 2021-2022. The Hindu 1st February 2021.

◆


## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

**(फॉर्म ४, नियम ८ नुसार)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना - ४३१२०४ |
| २. | नियतकाल | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव | : | मारोती वि. तेगमपुरे |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना - ४३१२०४ |
| ४. | मुद्रण स्थळ | : | भारती मुद्रणालय, ८३२ ई, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर ४१६ ००१ फोन : (०२३१) २६५४३२९ |
| ५. | प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. ३ प्रमाणे |
| ६. | संपादकाचे नाव | : | राहुल शंकरराव म्होपरे |
| ७. | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 'सर' निवास, री. स. नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर, पिन : ४१६ ००४ |
| ८. | मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा : सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम.एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र. ६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूलजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. ३२३ समोर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१ |

मी मारोती वि. तेगमपुरे असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**मारोती वि. तेगमपुरे**
मुद्रक व प्रकाशक

# महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यातील अरोली गावात सामूहिक पशुधन चारा विपणन मॉडेलचा अभ्यास

**एस.एस. कळमकर** †
**व्ही.जी. अतकरे** ††

**प्रस्तावना :**

जगामध्ये भारत देश पशुधन संख्येबाबत इतर देशांच्या तुलनेत संपन्न आहे. जगात गोवंश आणि म्हशींच्या संख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर आहे. परंतु या प्राण्यांची दुधाची उत्पादकता कमी आहे जी कुपोषणामुळे असू शकते. गुणवत्तेच्या चाऱ्याची कमतरता व त्यामधील पोषण मूल्यांची कमतरता ही पशुधन उत्पादकता सुधारण्यात अडचणीची ठरत आहे (कळमकर, २०२०). भौगोलिक क्षेत्राच्या २.४% क्षेत्रावर जगातील १५% पशुधन संख्या व जगातील १७.७९% लोकसंख्या भारतात आहे. जगाच्या जलसंपत्तीच्या केवळ ४.२% संसाधनांसह भारतातील नैसर्गिक संसाधने बऱ्यापैकी ताणतणावाखाली आहेत (कळमकर व इतर., २०१९, २०२० अ आणि २०२० बी). मानवी लोकसंख्येच्या वाढत्या दबावामुळे, शेतीयोग्य जमीन प्रामुख्याने अन्न व नगदी पिकांसाठी वापरली जाते, त्यामुळे चारा उत्पादनासाठी चांगल्या प्रतिची शेतीयोग्य जमीन कमी प्रमाणात वापरली जाते. एकूण खाद्य आणि चारा यांची कमतरता असूनही, चारा उत्पादनासाठी उपलब्ध असलेली जमीन कमी होत आहे. मुक्त चारा पिकांच्या लागवडीसाठी जमिनीचे वाटप मर्यादित आहे आणि एकूण पीक क्षेत्राच्या ५ टक्क्यांपेक्षा जास्त क्षेत्र क्वचितच ओलांडली आहे ज्यामुळे हिरव्या आणि कोरड्या चाऱ्याची तीव्र कमतरता भासत आहे. पशुधनासाठी पुरेसे खाद्य व चारा उपलब्ध असणे पशुधन उत्पादकता सुधारण्यासाठी आवश्यक आहे. राष्ट्रीय ग्रामीण परिवर्तन संस्था (NITI Aayog)च्या तीन वर्षांच्या कृती आराखड्यामध्ये मध्ये उच्च मूल्य असलेल्या वस्तूंमध्ये बदल करण्यावर भर दिला आहे. त्यांनी असे सूचित केले आहे की, पशुसंवर्धन विकासाचे महत्त्वाचे आव्हान चारा उपलब्धतेशी संबंधित आहे.

सन २०१९ मध्ये महाराष्ट्र हे देशातील सातव्या क्रमांकाचे दूध उत्पादन करणारे राज्य ठरले आहे. तथापि, दर दिवशी सरासरी ३९६ ग्रॅम सरासरीच्या

† संचालक आणि प्राध्यापक, कृषी-आर्थिक संशोधन केंद्र, सरदार पटेल विद्यापीठ, वल्लभ विद्यानगर, आनंद, गुजरात
आजीव सभासद क्र. १६५८, भ्रमणध्वनी : ०९८२२४३७४५१, ई-मेल : dearshri@gmail.com
†† प्राध्यापक, पशुसंवर्धन आणि दुग्ध विज्ञान विभाग, कृषी महाविद्यालय, नागपूर (महाराष्ट्र)
आजीव सभासद क्र. : १८४१, भ्रमणध्वनी : ८२७५२८८३०१, ई-मेल : vilasatkarep@gmail.com

तुलनेत दरडोई दुधाची उपलब्धता राज्यात सर्वात कमी (दररोज २६६ ग्रॅम) होती. अहमदनगर, नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांचा समावेश असलेल्या पश्चिम विभागामध्ये राज्यातील एकूण गोजातीय संख्येच्या तुलनेत सर्वात जास्त गोसंख्या नाशिक व पुणे या जिल्ह्यामध्ये आहे. यामध्ये प्रामुख्याने संकरित गायी व म्हशींचा समावेश आहे. तर विदर्भ आणि मराठवाडा भागातील पूर्वेकडील भागामध्ये एकत्रितपणे राज्याच्या एकूण पशुधन लोकसंख्येपैकी २४.९२ टक्के आहे . मराठवाडा आणि विदर्भ विभागांमध्ये वारंवार दुष्काळ, लालसर माती, कोरड्या पडलेल्या विहिरी, कोरडे हातपंप, कमी उत्पन्न देणारे पशुधन आणि त्या तुलनेत दुग्धव्यवसाय राज्याचे पश्चिमेकडील भागात यशस्वी होत असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र बऱ्याच वर्षांपासून दुष्काळ आणि पाण्याच्या कमतरतेशी झुंज देत आहे आणि यामुळे हिरव्या आणि कोरड्या चाऱ्याचा तुटवडा निर्माण झाला आहे. यावर उपाय म्हणून, दरवर्षी पर्जन्यमान तूट असलेल्या भागात चारा शिबिरांचे आयोजन करून सरकार दुग्धव्यवसायास पाठबळ देते आहे. ऊस उत्पादकांकडून उसाची खरेदी, टंचाईग्रस्त भागातील पशुधन मालकांना अनुदान दराने धान्य देण्याची व्यवस्था केली जाते. चारा टंचाईचा सामना करण्यासाठी उत्पादित केलेल्या जिल्ह्याबाहेर चारा विक्रीवर बंदी घालणे सरकारला भाग पाडले जाते, तसेच शेजारील राज्यांतील पशुपालकांना महाराष्ट्रात जनावरे चरण्यास मनाई आहे. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने २०१२ पशुधन गणनेनुसार पशुधन विचारात घेऊन खाद्य व चाऱ्याची आवश्यकता आणि उपलब्धता याचा अंदाज लावला आणि हिरवा चारा ५९% आणि कोरड्या चाऱ्याची ३१% कमतरता असल्याचे दिसून आले. ही सद्यपरिस्थिती लक्षात घेता चारा पिकाचे उत्पादन व बाजारपेठ उत्पादित करण्यासाठी शेतकऱ्यांच्या गटाने केलेले कोणतेही प्रयत्न निश्चितच त्या भागातील दुग्धव्यवसायाचे पुनरुज्जीवन करण्यास मदतच करतात. चाऱ्याची उपलब्धता व आवश्यकता तसेच पिकाच्या विविधीकरणाद्वारे उत्पन्नात वाढलेली तूट भरून काढण्याच्या संधीचा फायदा घेण्यासाठी नागपूर जिल्ह्यातील मौदा तहसीलच्या आरोली गावात डॉ. उल्हास नीमकर यांनी चारा विपननाचे मॉडेल राबविण्याचा निर्णय घेतला. या लेखामध्ये या गटाच्या यशस्वी मॉडेलच्या वाटचालीचा तपशील सादर करण्यात येत आहे.

**२. सांख्यिकीय माहिती आणि विश्लेषण पद्धती:**

सदरचा केस स्टडी हा प्राथमिक आणि माध्यमिक दोन्ही स्तरांवर आधारित आहे. दुय्यम माहिती प्रकाशित स्त्रोतांकडून गोळा केली गेली. प्राथमिक माहिती नागपूर जिल्ह्यातील मौदा तहसील अंतर्गत येत असलेल्या आरोली गावात स्थापन झालेल्या 'विश्वास किसान गटा'च्या कार्यालयांमधील संस्थापक सदस्यांकडून तसेच निवडक शेतकऱ्यांच्या शेतात वैयक्तिक भेटीद्वारे गोळा केली गेली.

**३. अरोली गावाचा संक्षिप्त संख्यात्मक तपशील:**

अरोली, हे एक जुने पुरोगामी गाव आहे, जे नागपूरपासून ६५ कि.मी. अंतरावर आहे. जिथे शेती हीच उपजीविकेचे मुख्य साधन आहे. या खेड्यात १०४१ कुटुंबे आणि ४५२२ लोकसंख्या आहे, त्यापैकी जवळजवळ एक चतुर्थांश लोकसंख्या दुर्बल घटकांची आहे (तक्ता क्र.१). या गावास पूर्वी केळी आणि आल्याच्या लागवडीसाठी ओळखले जात असे. उत्पादित माल मुंबई, दिल्ली, जबलपूर आणि नागपूर

या मेट्रो शहरांतील ग्राहकांना पाठवण्यासाठी या गावात वाहतुकीची सोय नव्हती. कालांतराने खेड्यांमधील शेतकऱ्यांनी धान, सोयाबीन आणि भाजीपाला पिकाची लागवड सुरू केली. अरोलीला नैसर्गिक संसाधने, कालवे आणि ओलिताकरिता विहिरींचे पुरेसे पाणी उपलब्ध आहे. गावातील सुमारे ८१.२% भौगोलिक क्षेत्र निव्वळ पेरणी क्षेत्र म्हणून विभागले गेले असून त्यापैकी ८१.५% जमीन मुख्यत: कालवा व भूजलद्वारे सिंचनाखाली आहे. गायींच्या पशुधनावर गायीचे वर्चस्व राहिले आणि त्यापाठोपाठ बकरी व म्हशींची संख्या बऱ्यापैकी आहे (तक्ता क्र.२).

**तक्ता क्र. १: अरोली गाव प्रोफाइल (२०११)**

| क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १. | घरे (एकूण क्रमांक ) | १०४१ |
| २. | गाव (एकूण लोकसंख्या) | ४५२२ |
| ३. | अनुसूचित जाती लोकसंख्या (एकूण लोकसंख्या%) | १५ |
| ४. | अनुसूचित जमाती लोकसंख्या (एकूण लोकसंख्या%) | ७.७ |
| ५. | नेट क्षेत्र पेरणी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (हेक्टरमध्ये %) | ७४१,२ |
| ६. | भौगोलिक क्षेत्र म्हणून राष्ट्रीय सुरक्षा | ८१.२ |
| ७. | राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार निव्वळ सिंचनाखालील क्षेत्र | ८१.५% |
| ८. | क्षेत्र कालवे पाणी पुरवठा | ७६.५% |
| ९. | क्षेत्र वेल्स / ट्यूब विहिरीपाणी पुरवठा | २३.५ |

स्रोत : जनगणना २०११

**तक्ता क्र. २: पशुधनाचा तपशील (२०१५-१६)**

| क्र | तपशील | एकूण संख्या | एकूण(टक्के) |
|---|---|---|---|
| १ | गुरे | ७६२ | ६४.९ |
| २ | म्हैस | १०८ | ९.२ |
| ३ | शेळी | २८० | २३.८ |
| ४ | मेंढी | ० | ०.० |
| ५ | कुत्रे | २५ | २.१ |
| ६ | इतर | ० | ०.० |
| | एकूण | ११७५ | १००.० |

**स्रोत :** https: / / farmer.gov.in / livestockcensus.aspx

**४ स्त्रोत उपलब्धता :**

सिंचनाची उपलब्धता, मोठ्या शहरांची निकटता आणि चांगल्या प्रकारची सुपीक माती यांसारख्या अनुकूल बाबी असूनही, अरोली खेड्यातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली होती. तसेच शेतीविषयी आवड कमी होत चालली होती आणि तरुणांना हा व्यवसाय म्हणून घेण्यास उत्सुकता नव्हती. या विचित्र परिस्थितीतून शेतकऱ्यांना नेहमीच उत्तेजन देण्याची भावना बाळगणारी या मातीतली निवडक माणसे एकत्र जमली आणि उपलब्ध स्त्रोतांचे आणि शक्य असलेल्या घटकांचे विश्लेषण करून परिस्थितीवर मात करण्यासाठी संभाव्य उपाय शोधण्याचा निर्णय घेतला. याकरिता डॉ. उल्हास निमकर (सेवानिवृत्त वरिष्ठ व्यवस्थापक, युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, मुंबई) यांनी खासकरून मुंबई येथून नागपूरला स्थलांतर केले. डॉ. जगदीश कुरलकर (सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन) यांनी ऑक्टोबर २०१७ पासून शेतकरी सभांचे आयोजन करण्यास सुरुवात केली. या वाईट परिस्थितीवर मात करण्यासाठी त्यांना संवेदनशील करणे, त्यांच्या दुर्दशाच्या तथ्यांविषयी सखोल विश्लेषणानंतर, शेतकऱ्यांना स्वाट (SWOT) विश्लेषणासह समजावून सांगितले. खेड्यात सुपीक जमीन आणि मुबलक पाणी, तसेच नागपूर व भंडारा जिल्ह्याची असलेली कनेक्टिव्हिटी यासारख्या नैसर्गिक संसाधनांसारखे सामर्थ्य आहे. शेतीकडे दुर्लक्ष करणे म्हणजे तोटा करणे, कृती करण्यास भाग पाडणारे तरुण, कीटकनाशके व कीटकनाशकांचा उत्तमरित्या वापर, शेतकऱ्याकडे सुपीक जमिनीची असलेली उपलब्धता आणि प्रचंड बाजारपेठ तर गुरेढोरे मालकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, आर्थिक असंतुलन आणि कृषी उत्पादनांची विक्री करण्यासाठी दलालांवर अवलंबून असण्याची मानसिकता. या सर्व बाबींवर स्थानिक शेतकऱ्यांशी ऑक्टोबर, २०१६ पासून विविध सभांमध्ये नेमकेपणाने चर्चा करण्यात आली. सुरुवातीला २ शेतकऱ्यांनी पहिल्या बैठकीला हजेरी लावली आणि त्यानंतर यामध्ये ८५ पर्यंत वाढ झाली. शेतकऱ्यांशी झालेल्या बैठकीच्या मालिकेनंतर असा निष्कर्ष काढला गेला की

अ) पारंपारिक पिकांमधून कमी निविष्ठा लागणाऱ्या, तसेच कमी व्यवस्थापन असणाऱ्या जास्त उतपन्न देणाऱ्या पिकाकडे लक्ष देणे.

ब) जे पीक निवडले जाईल त्यासाठी बाजारपेठेच्या परिस्थितीचे विश्लेषण होईपर्यंत निवडलेले पीक घेता येणार नाही.

क) शक्यतो विक्रेते व खरेदीदार यांच्यात परस्पर करार केला जाईल व त्यानुसार पीकाची निवड केली जाईल.

ड) पीक लागवड करण्यापूर्वी मोठ्या प्रमाणात उत्पादित मालाच्या मागणीत जोपर्यंत वाढ होत नाही तोपर्यंत बाजार पेठेवर नियंत्रण मिळविणे कठीण आहे किंवा उच्चप्रतिचा ब्रँड सिद्ध करणे महत्त्वाचे आहे. यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने सामुदायिक शेतीखाली सुरुवातीला कमी प्रमाणात जमीन लागवडीसाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**५.चारा उत्पादन व विपणनः**

उपरोक्त मॉडेल वर काम करण्यासाठी नियमितपणे डॉ. उल्हास निमकर यांनी केलेल्या प्रारंभिक चर्चेनंतर व घेतलेल्या बैठकांच्या नंतर शेतकऱ्याचे आर्थिक हित, स्थानिक तसेच हवामानविषयक परिस्थिती व बाजारपेठेतील संभाव्यता गृहीत धरून सदर प्रस्तावास सर्वांनी सहमती दर्शविली. शेतीमधील उत्पादनाची निवड थेट मानवी वापरासाठी करता येणार नाही, असे सुद्धा ठरले. कारण अशा प्रकारची कृषी उत्पादने बाजारात प्रतिस्पर्धा करण्यासाठी उपलब्ध आहेत.

जेव्हा विपणनाची बाब येते तेव्हा सर्व बाबी शेतकऱ्याच्या नियंत्रणाबाहेर जातात. डॉ. उल्हास निमकर यांनी उपलब्ध स्त्रोतांच्या बाबतीत सर्व शेतकऱ्यासोबत साधकबाधक विश्लेषण केले आणि पशुखाद्याकरिता चारा उत्पादनाची सूचना दिली. कारण सद्यस्थितीत चाऱ्याची प्रचंड टंचाई परिस्थिती आहे व दुधासाठी हिरवा चारा आवश्यक आहे. नागपूर शहरामध्ये आणि आसपासच्या पशुपालकांकडे जनावरांना देण्याकरिता हिरवा चारा नाही. तसेच हिरवा चारा पिकविण्यासाठी शेत जमीन नाही आणि त्यांना चारा देण्यासाठी मुख्यत्वेकरून आउटसोर्सिंगवर अवलंबून राहावे लागते. अशा कोणत्याही चारा पिकाची लागवड अरोलीच्या शेतकऱ्यांनी केली आणि दररोज जनावरांच्या मालकांना त्यांच्या दारात पुरवठा केल्यास दोन्ही टोकांची गरज भागविणे हे आर्थिक उत्पन्नाचा चांगला स्त्रोत ठरू शकेल. ही कल्पना एकमताने मान्य करण्यात आली. डॉ. उल्हास निमकर, डॉ. जगदीश कुरळकर, श्री. प्रकाश आपेचर, श्री. धनराज कुबडे, श्री. शिवनाथ बनसोड यांनी नागपूर परिसरातील दुग्धव्यवसायातील शेतकऱ्याशी नियमितपणे बैठक घेण्यास सुरुवात केली आणि हे दिसून आले की, दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांनीही चारा वाढविण्याच्या अनोख्या संकल्पनेचे कौतुक केले. चारा पिकाच्या लागवडीची शक्यता, त्यांची बाजारपेठ आणि संभाव्यता लक्षात घेतल्यानंतर खरीप २०१६च्या हंगामात चारा पिकाची लागवड करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. वर्धा जिल्ह्यातील नवापूर गावात डॉ. सतीश राजू आणि डॉ. पाठक यांच्या पथकाने आणि विदर्भ आणि मराठावाडा दुग्धविकास प्रकल्प अंतर्गत विकसित केलेल्या 'चारा कॅफेटेरिया'ला भेट दिली असता डॉ.निमकर यांना संकरित नेपियर चारा पिकाच्या लागवडीची आवड निर्माण झाली व त्यांनी त्यांच्या मूळ गावात शेतकऱ्यांच्या फायद्याकरिता चारापीक आधारित शेती विकसित करण्याचा निर्णय घेतला.

११ जानेवारी २०१६, रोजी दिवसभर बैठकीस पंचायत समिती, मौदा व जिल्हा मुख्यालयातील ८५ शेतकरी व १ शासकीय अधिकारी उपस्थित होते. खेड्यातील शेतकऱ्यामध्ये संवेदनशीलतेची पातळी जाणून घेण्यासाठी ही परीक्षा होती. दरम्यान, या चारा लागवडीच्या कार्यक्रमास सामील व्हावे या उद्देशाने शेतीच्या मातीची चाचणी घेण्यासाठी अरोली शेतकरी गटाने त्यांच्या अनुदानावर माती परीक्षण प्रयोगशाळेची उपकरणे खरेदी केली. या सर्व शेतकऱ्यांनी विविध चारा वाण पाहण्यासाठी १२ एप्रिल २०१६ रोजी नवापूर चारा कॅफेटेरियात व्यक्तिगतपणे भेट दिली आणि कमी निविष्टा खर्च, पुरेसे भरीव, हवामानाच्या परिस्थितीला अनुकूल आणि जास्त उत्पादन देणारे उत्तम वाण निवडण्यासाठी तज्ज्ञांच्या तांत्रिक मार्गदर्शनानुसार निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांना त्यांच्या वाईट परिस्थितीतून वर आणण्यासाठी शाश्वत मिळकतीचा स्त्रोत निर्माण करणे महत्त्वाचे आहे या बाबीवर भर देण्यात आला. नवापूर भेटीनंतर अरोली परिसंवादात शेतकऱ्याच्या नैतिकतेस चालना मिळविणे आणि ती प्रत्यक्षात राबविणे महत्त्वाचे टप्पे होते. या प्रकल्पात शेतकऱ्याच्या ठरवलेल्या जमिनी त्यांच्या सामान्य पारंपारिक लागवडीखेरीज गुंतविण्याचा निर्णय घेतला.

चारा लागवडीसंदर्भात ब्लूप्रिंट तयार होताना आणि हे काम सामाजिक भावनेतून करण्यासंदर्भात कृतज्ञ शेतकरी डॉ.उल्हास निमकर आणि त्यांच्या गटाने नागपूर भागातील तसेच अरोली येथील शेतकरी व दूध उत्पादकांची संयुक्त बैठक घेण्याचे प्रस्तावित केले होते. त्यानुसार, १ एप्रिल २०१६ रोजी नागपूर (शेतकरी भवन) येथे डॉ. सतीश राजू, डॉ. ए. एम.

पाठक, डॉ. शिंदे, डॉ. मानकर, पशु संवर्धन विभागांचे तज्ञ, चारा संशोधक आणि श्री नितीन देशमुख, मदर डेअरी यांनी या बैठकीस उपस्थित राहून मार्गदर्शन केले. नागपूर येथे झालेल्या संयुक्त बैठकीत दोन्ही बाजूंनी शेतकरी तज्ज्ञांकडून दर, पुरवठा व देयके (तक्ता क्र.३) या विषयावर संवाद साधून त्यांचे परीक्षण केले गेले.

**तक्ता क्र.३: अरोली शेतकरी गट आणि पशुपालकांदरम्यान करार, अटी**

| क्र | तपशील | |
|---|---|---|
| १ | ताजा हिरवा चारा पुरवठा | दररोज मागणीनुसार |
| २ | चारा (कुट्टी स्वरूपात) | २०किलो आकारस्थानाचेमध्ये बॅग |
| ३ | पुरवठा | आवश्यक गंतव्य स्थळापर्यंत |
| ४ | पूर्वमान्य दर- चारा कुट्टी पिशवीमधे भरलेला | रु. ३.५० / किलो |
| ५ | पूर्वमान्य दर- कुट्टी न केलेला चारा | रु. ३.०० / किलो |
| ६ | चारा रक्कमेचा भरणा करण्याचा कालावधी | पुरवठा केल्यानंतर २ दिवसांनी |

**स्रोत :** विश्वास गट.

(अ) दररोज मागणीनुसार ताजा हिरवा चारा पुरवठा.

(आ) पुरवठा गंतव्य स्थानावर वर्षभर, २० किलो याप्रमाणे पोत्यात चारा उपलब्ध करून देणे.

(इ) चाऱ्याच्या आवश्यकतेत कोणताही बदल फक्त ठरवून दिलेल्या दिवसानंतरच लागू होईल.

(ई) पूर्व सहमत दरासाठी रुपयांवरून वाटाघाटी झाली. १० रुपये प्रतिकिलो फाऊंडेशन वर्ष असून ते एक वर्षानंतर सुधारित केले जाईल (जे पुन्हा एकदा २०१६ मध्ये सुधारित बॅगसाठी प्रतिकिलो ५ रुपये प्रतिकिलो आणि वाहतुकीच्या किंमती वगळता संपूर्ण झाडासाठी रु. / - प्रतिकिलो) अंतर), हा खास सवलत दर सध्याचे दुग्ध उत्पादक शेतकरी आमचे संस्थापक ग्राहक आहेत त्यांच्याकरिता असेल.

(उ) खरेदी केलेलेल्या चाऱ्याची रक्कम दुग्धउत्पादक शेतकऱ्याकडे दोन दिवसांपेक्षा जास्त राहत असल्यास वाढीव रक्कम टाळण्यासाठी अरोली गटाला २ दिवसांच्या पुरवठ्यानंतर पैसे द्यावे लागतील.

एकत्रित चर्चा संपूर्ण गटाच्या कामकाजावर अवलंबून असल्याने, वार्षिक पुरवठा सुरळीत करण्यासाठी लागणाऱ्या जागेची उपलब्धता करण्याचा निर्णय घेण्यात आला, म्हणून २५० एकर जागेवर तसेच ४५ शेतकऱ्यांच्या गुंतवणुकीचा प्रस्ताव होता. हे लक्षात घेण्यासारखे आहे की कोणत्याही स्तरावरील सुस्तपणा किंवा आळशी वृत्ती टाळण्यासाठी शेतकऱ्यांना कोणत्याही शासकीय योजनांकडून कोणत्याही मोहक ऑफर किंवा मदत न देता स्वतंत्रपणे गुंतवणूक करण्यास सांगितले गेले होते. उपक्रम अपेक्षित आकार घेत असल्याने "ATMA" अंतर्गत अरोलीतील शेतकऱ्याची नोंदणी करण्याचे ठरविले गेले त्यानुसार ४६ शेतकरी तीन गटात विभाजित करण्यात आलेत. तक्ता क्र.१ मध्ये सादर केल्यानुसार एटीएमए अंतर्गत नोंदणीकृत होते. उत्पादन व विपणन व्यवस्थापन करण्यासाठी डॉ. उल्हास निमकर यांनी या उपक्रमांसाठी एकूण तीन गट तयार केले आहेत.

पहिल्या गटाला जमीन निवड, जमीन धारकांचे आकार, स्टेम कटिंग्ज / बेण्याची निवड आणि संबंधित

**तक्ता क्र.४: अरोली शेतकरी समूह तपशील**

| क्र. | गट | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | वैज्ञानिक सहकारी शेती विकास संघ विश्वास | १४ |
| २ | विश्वास कृषी उत्पन्न वितरण व पुरवठा संस्था | १५ |
| ३ | विश्वास कृषी उत्पन्न व्यवस्थापन व विपणन संस्था | ०६ |

**स्रोत :** विश्वास गट

बाबींची जबाबदारी दिली जात आहे.

द्वितीय गट संकरित नेपियर गवत कापण्याचे वेळापत्रक तयार करणे, कार्यान्वयन व आवश्यकतेनुसार पुरवठा पाहतो.

तृतीय गट कुट्टी केलेले संकरित नेपियर गवत विपणन व त्यासंबंधित बाबींचा विचार करतो. हा गट नेपियर गवत आणि पूर्व-मान्य दरासह तसेच पुरवठ्यासह आवश्यक प्रमाणात आवश्यक बाजारपेठ शोधतो.

त्यानंतर डॉ. राजू आणि डॉ. पाठक यांच्याशी सल्लामसलत झाली आणि पावसाळा सुरू होताच रोपण सुरू करावे; तसेच बहुवार्षिक हायब्रिड नेपियरची पेरणी करण्याचे ठरविण्यात आले. बायएफ, उरुळीकांचन येथून लागवड करण्याकरिता लागणाऱ्या साहित्याचा पुरवठादारदेखील ठरविला गेला. मागणी पूर्ण करण्यासाठी बीएनएच -१० या हायब्रीड नेपियरच्या एकूण एक लाख स्टम्पची खरेदी करणे आवश्यक होते, त्यापैकी पहिल्या टप्प्यातील २२५०० स्टंप व दुसऱ्या टप्प्यात समान संख्या आणि काढणीचे वेळापत्रक कायम राखण्याकरिता बाएफकडे आदेश देण्यात आले. बाएफ, संबलपूर यांच्याकडेसुद्धा नेपियरच्या थोंबकरिता संपर्क करण्यात आला. दुर्दैवाने थोंब कमी दर्जाचे असल्याने करण्यात आलेला पुरवठा नाकारण्यात आला. याकरिता वेळोवेळी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात आले. ११ सप्टेंबर २०१७ रोजी डॉ. पाठक यांच्या भेटी दरम्यान असे आढळून आले की, बहुतेक भूखंड कापणी व पुरवठ्यासाठी तयार होते, त्यासाठी कटिंगची तारीखही ठरविण्यात आली होती म्हणजेच सप्टेंबर, २०१७ (विजया दशमी). सुरुवातीच्या पहिल्याच दिवशी, शेतकऱ्यांनी पशुपालकांच्या दारात हिरवा चारा नागपुरात व शहराभोवती २० किलो पोत्यात पिकअप व्हॅनमधून पुरवठा सुरू केला. स्थैर्य प्राप्त होण्यास एक वर्ष एवढा कालावधी लागला आणि आतापर्यंतचा नियमित पुरवठा पाहता २०१९ मध्ये पुरवठा दररोज १५ टन झाला आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, या गटाचे कार्य पाहिल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने पुढे येऊन वृक्षारोपण खर्च, चाफ कटर मशीन आणि सायलेजच्या पिशव्या खरेदी खर्चास आर्थिक सहाय्य करून आमच्या गटास मदत केली. इतकेच नव्हे; तर वर्ष २०१८ आणि २०१९ मध्ये 'विश्वास समूहा'ने संपूर्ण विदर्भ आणि जालना जिल्ह्यामधील पशुसंवर्धन विभागास ७५ लाख रुपये एवढ्या रकमेच्या चाऱ्याचा पुरवठा केला. सुरुवातीला ५५ एकर असलेल्या या चारा लागवडीसाठी लागणारी जमीन आता २०० एकराहून अधिक झाली आहे, कोणत्याही रोख पिकांपेक्षा हे चारा पीक लागवड एक उत्तम अर्थार्जनाच साधन आहे. ताज्या हिरव्या चाऱ्याचे पुरवठ्यासाठी आता अतिरिक्त चारा उत्पादन व्यवस्थापित करण्यासाठी विश्वास समूहाने सायलेज उत्पादन सुरू केले आहे. गेल्या तीन वर्षात 'विश्वास ग्रुप'ची उलाढाल रु.२०१७-१८ मध्ये १.७५ ते रु. २०१८-१९ मध्ये २ कोटी आणि रु.२०१९-२० मध्ये

३ कोटी (तक्ता क्र.५)

**तक्ता क्र.५: चारा पीक विपणन तपशील**

| क्र. | | २०१५-१६ | २०१८-१९ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण शेतकरी मोठ्या संख्येने | ० | ४५ | ४५ |
| २ | लागवड अंतर्गत जमीन बारमाही नॅपीयर (एकर) | ० | ५५ | २०० |
| ३ | एकूण रक्कम लाख गुंतवणूक | ० | ६.० | ६.० |
| ४ | दररोज चाफड चारा (टन / दिवस) पुरवठा | ० | ७.५ | १५.० |
| ५ | टर्न ओव्हर (लाखात) | ० | १७५ | ३०० |

**स्रोत :** विश्वास ग्रुप.

### ६.सामूहिक दूध उत्पादन व विक्री:

सुरुवातीला नागपूर जिल्ह्याच्या आसपासच्या पशुपालकांना चारा पिकाची लागवड करण्याचा एकत्रितपणे डॉ. उल्हास चंद्रभान निमकर व त्यांच्या गटाने निर्णय घेतला. एकत्रित दुग्धउत्पादन व विपणन करण्याकरिता विश्वास गट आता चारा लागवडीबरोबरच सामुदायिक दुग्ध (देशी गायी) उपक्रम राबवित आहे. या सामुदायिक कार्यामुळे आमचे शेतकरी केवळ आर्थिकदृष्ट्या स्थिरच राहिले नाहीत तर ग्रामीण मजूर आणि स्थानिक परिवहन व्यवसाय करणाऱ्या युवकांना रोजगार मिळाला आहे. अरोली गावच्या आर्थिक व्यवहारात समृद्धी पूर्ण बदल होत आहेत. विश्वास समूहाचे शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व चारा उपक्रमांव्यतिरिक्त इतर संबंधित कार्यात सहभाग घेत आहेत. या गटाने जातीवंत स्वदेशी राठी गायींसह सामुदायिक दुग्धउत्पादनाची योजना सुरू केली. याकरिता सुरुवातीला सहभागी असलेल्या ४५ पशुपालकांची निवड केली आहे आणि या व्यतिरिक्त नागपूर येथे स्थायिक झालेल्या इच्छुक व्यक्तींनी कम्युनिटी डेअरीमध्ये सामील होण्यासाठी प्रत्येकी १ लाख रुपयाचे योगदान दिले आहे. सन २०१८ पासून या सामुदायिक प्रकल्पात सामील होण्यासाठी एकूण १०० शेतकरी सहभागी झाले आहेत व विश्वास संघ गो संवर्धन व दुग्ध शाळा प्रकल्प (विश्वास कलेक्टिव कॅटल प्रमोशन अँड दूध कलेक्शन प्रोजेक्ट) या नावाने आत्मा, नागपूरमध्ये नोंदणी केली. ऑगस्ट २०२० पर्यंत पायाभूत सुविधा तयार झाल्या आणि ऑक्टोबर २०१९ मध्ये ६२ शुद्ध रक्ताच्या राठी गायी ( द्विहेतुक प्रजाती) समाविष्ट केल्या गेल्या. राजस्थानमधून आणलेल्या गायींनी दुधाचे उत्पादन सुरू केले आहे. दूध स्थानिक ग्रामस्थांना, मदर डेअरी तसेच नागपूर येथील रहिवाशांना किफायतशीर दराने विकले जात आहे. डिसेंबर २०१९ पासून, या समूहाने नागपूर येथे स्वत:ची बाजारपेठ उभारण्यास सुरुवात केली आणि विश्वासच्या सदस्यांद्वारे व्यावसायिकपणे हाताळल्या जाणाऱ्या 'विश्वास दूध' या ब्रँड नावाने दूध विकले जात आहे. चारा उत्पादन, तोडणी व विपणन व्यवस्थापित करण्यासाठी सदस्य गटातील तीन गटांव्यतिरिक्त, चतुर्थ गट दुधाचे उत्पादन व विपणन सांभाळत आहे. गटातील सदस्यांपैकी एका सदस्याने गोदामे व चारा साठवण स्टोअरेज / डचबारन तयार केलेल्या गटाला जमीन भाडेपट्ट्यावर देण्यास मान्य केले आहे. सर्व जनावरांचे संगोपन एका शेडखाली एकत्रितपणे केले जात आहे आणि उत्पादित

दूध प्रारंभी स्थानिक ग्रामस्थ व मदर डेअरीला विकले गेले.१५ डिसेंबर २०२० विश्वास गटाने नागपूर येथे स्वत: दूध  वितरण सुरू केले आणि दूध व्यवसाय विश्वास गटाचे सदस्य हाताळत असून त्यांनी उत्पादित दुधास एक ब्रँड नाव 'विश्वास दूध' असे दिले असून याच नावाने दूध विकले जात आहे. दुधाची बाजारपेठेच्या दरापेक्षा कमी दराने विक्री केली जात आहे आणि खरेदीदारांचा विश्वास व विश्वास वाढविण्यासाठी दर्जेदार मापदंडांची काटेकोरपणे काळजी घेतली जात आहे (तक्ता क्र.६).

**तक्ता क्र.६. सामूहिक उत्पादन आणि दूध विपणन तपशील**

| क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | शेतकरी सदस्य एकूण संख्या | १०० |
| २ | रक्कम प्रत्येक सदस्य योगदान (रुपये लाख) | १.०० |
| ३ | एकूण रक्कम सर्व सदस्यांनी गुंतवणूक (लाख) | १०० |
| ४ | राठी गायी एकूण संख्या (दुहेरी हेतू जातीच्या) ओळख | ६३ |
| ५ | दूध दर (प्रतिलिटर ) | ७०.० |

**७. भविष्यातील  ध्येयधोरण:**

भविष्यामध्ये दूध उत्पादन तसेच चारा पीक विक्री सोबतच, विश्वास गट शुद्ध राठी गायीच्या जातीची जनावरे प्रजनन करण्यावर देणार आहे. तसेच या युनिटला येणाऱ्या पुढील वर्षात अधिक सक्षम बनवण्यासाठी बायोगॅस, सीएनजी (कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस), जीवामृत (नैसर्गिक सेंद्रिय वनस्पती वाढ बूस्टर) आणि जैव-खताचे उत्पादन करून अरोली हे गाव आत्मनिर्भर करण्याचा संकल्प या गटाने केला आहे.

**८. निष्कर्ष आणि धोरणाचे स्पष्टीकरण:**

महाराष्ट्र बऱ्याच वर्षांपासून दुष्काळ आणि पाण्याच्या कमतरतेशी झगडत आहे आणि यामुळे हिरव्या आणि कोरड्या चाऱ्याचा तुटवडा निर्माण झाला आहे. मराठवाडा आणि विदर्भ विभागांमध्ये वारंवार दुष्काळ, भेगायुक्त जमिनी, उधळ गेलेल्या विहिरी, कोरडे पडलेले हातपंप, कमी उत्पन्न देणारे पशुधन या बाबींशी झुंज देत आहे. तुलनेत दुगधव्यवसाय हा राज्याच्या पश्चिम भागात  विकसित झाला आहे. यावर उपाय म्हणून, दरवर्षी पर्जन्यमान तूट असलेल्या भागात चारा छावण्याचे आयोजन करून पशुपालकांना सहकार्य करते. चारा टंचाईचा सामना करण्यासाठी उत्पादित केलेल्या जिल्ह्याबाहेर चारा विक्रीवर बंदी घालणे सरकारला भाग पाडले जाते. तसेच शेजारील राज्यांतील पशुपालकांना महाराष्ट्रात जनावरे चरण्यास मनाई आहे. वरील परिस्थिती लक्षात घेता चारा पिकाचे उत्पादन व बाजारपेठ उत्पादित करण्यासाठी शेतकरी गटाने केलेले कोणतेही प्रयत्न निश्चितच त्या भागातील दुग्ध क्षेत्राचे पुनरुज्जीवन करण्यास मदत करतात. असाच एक प्रयत्न नागपूर जिल्ह्यातील मौदा तहसीलच्या अरोली गावात स्थापन झालेल्या 'विश्वास किसान ग्रुप'ने केला आहे. या लेखाच्या माध्यमातून सदर गटाच्या कामकाजाचा तपशील सादर करण्यात आला असून ग्रामीण भागातील लोकांचे कल्याण आणि गरिबी कमी करण्यात दुग्धव्यवसाय अधिक विधायक भूमिका बजावू शकते. ही वस्तुस्थिती वाढत्या प्रमाणात दिसून येत आहे आहे. गुजरातच्या खेडा जिल्ह्यात सामुदायिक चारा शेतांची नोंद झाली. परंतु इतरत्र अद्यापपर्यंत सामूहिक

चारा विपणन पद्धतीची नोंद नाही. हे सामूहिक दूध उत्पादन आणि त्याचे विपणन यांचे एक चांगले उदाहरण आहे जे योग्य ठिकाणी प्रतिकृती बनविली जाऊ शकते. राज्य सरकार विभागाने अशा प्रकारच्या केस स्टडीचा प्रसार केला पाहिजे आणि अशा गटांना अनुदानाच्या स्वरूपात दर्जेदार चारा बियाणे साहित्य पुरविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**संदर्भ सूची :**


१. एनआयटीआय आयोग (२०१७). इंडिया-थ्री इयर ॲक्शन एजेंडा २०१-१८-१-१८ ते २०१-२०-२०२०, एनआयटीआयोग, संसद मार्ग, भारत सरकार, नवी दिल्ली.

२. कळमकर, एस.एस; अहिर किंजल; भीया एसआर आणि शर्मा एच. (२०१९ अ) भारताच्या निवडक राज्यांमध्ये राष्ट्रीय दुग्ध योजना I अंतर्गत चारा बियाणे उत्पादन व विक्री उपक्रमांचे प्रभाव मूल्यांकन आणि मूल्यांकन. एईआरसी अहवाल क्रमांक १६६, कृषी-आर्थिक संशोधन केंद्र, सरदार पटेल विद्यापीठ, वल्लभ विद्यानगर, आनंद, गुजरात.

३. शर्मा एच., कळमकर एस.एस. आणि परिहार टी. (२०२०). राजस्थानमध्ये पशुधन आहार व चारा यांचे मूल्यांकन एईआरसी अहवाल क्रमांक १ १९४, कृषी-आर्थिक संशोधन केंद्र, सरदार पटेल विद्यापीठ, वल्लभ विद्यानगर, आनंद, गुजरात.

४. कळमकर एस.एस., शर्मा एच. आणि मकवाना एम. (२०२० ए). गुजरातमध्ये पशुधन आहार व चारा यांचे मूल्यांकन. भारतातील कृषी परिस्थिती खंड LXXVII (४), ३६-४१.

५. कळमकर, एस.एस., शर्मा एच. आणि मकवाना एम. (२०२० बी). गुजरातमध्ये पशुधन आहार व चारा यांचे मूल्यांकन, एईआरसी अहवाल क्रमांक १३, कृषी-आर्थिक संशोधन केंद्र, सरदार पटेल विद्यापीठ, वल्लभ विद्यानगर, आनंद, गुजरात.

६. कळमकर एस.एस. आणि शर्मा एच. (२०२०) (संपादित) दुग्धव्यवसाय व भारतातील दुग्ध उत्पादकांची आर्थिक-स्थिती सुधारण्याची क्षमता अलाइड पब्लिशर्स, नवी दिल्ली.

७. कळमकर, एस. एस. आणि शर्मा एच. (२०१९) दुग्ध उत्पादकांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी दुग्धव्यवसाय आणि संभाव्यतेचे मूल्यांकन आणि भारतातील जिल्हा पातळीवरील सर्व केंद्र व राज्य योजनांचे एकत्रीकरण. एकत्रित अहवाल, एईआरसी अहवाल क्रमांक १६६, कृषी-आर्थिक संशोधन केंद्र, सरदार पटेल विद्यापीठ, वल्लभ विद्यानगर, गुजरात.

८. जनगणना (२०११) भारत सरकारचे कुलसचिव आणि जनगणना आयुक्त यांचे कार्यालय, गृह मंत्रालय, भारत सरकार.

९. शर्मा एच., एस. एस. कलामकर आणि टीबी परिहार (२०२०अ). राजस्थानमध्ये पशुधन आहार व चारा यांचे मूल्यांकन भारतातील कृषी परिस्थिती वॉल्यूम LXXVII (५), ३३-४०.



(विशेष आभार : डॉ. उल्हास चंद्रभान निमकर, 'विश्वास शेतकरी गट', आरोळी गाव, तहसील मौदा, जिल्हा नागपूर आणि डॉ. सतीश राजू, अतिरिक्त प्रकल्प संचालक, विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प, नागपूर)


**संकेतस्थळ यादी :**


१. https://ahd.maharashtra.gov.in/livestock- census

२. https://farmer.gov.in/livestock census.aspx

३. https://www.nddb.coop/information/stats


◆

# जागतिक व्यापार संघटनेची २५ वर्षे : साध्य आणि असाध्य

**प्रशांत हरमकर** †

**प्रास्ताविक**

जागतिक व्यापार संघटनेला (World Trade Organization) १ जानेवारी २०२० ला २५ वर्षे पूर्ण झालेली आहे. जागतिक व्यापार संघटना म्हणजे जागतिक आर्थिक शासनाचा (Global Economic Governance) महत्त्वपूर्ण भाग आहे. जागतिक व्यापार संघटना ही आंतरराष्ट्रीय संघटना असून तिच्या नियमांतर्गत सदस्य देशांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार चालतो. जागतिक व्यापार संघटनेचे एकूण १६४ सदस्य देश आहेत. त्यांच्यामध्ये प्रत्यक्ष व्यापार चालतो. व्यापारावर नियंत्रण ठेवण्याचे काम जागतिक व्यापार संघटना करते. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये पारदर्शकता वाढवून व्यापार संरक्षणाला टाळण्याचा प्रयत्न तिच्याद्वारे केला जातो. जर सदस्य देशांमध्ये व्यापाराबाबत विवाद निर्माण झाला तर त्याची सोडवणूक करण्याकरिता प्रभावशाली विवाद निवारण यंत्रणेची (Dispute Settlement Body) मांडणी केली गेली आहे. विवाद निवारण यंत्रणेने गेल्या २० वर्षामध्ये ५०० व्यापार विवाद यशस्वीपणे सोडविले आहे.

गॅट करारामध्ये सुधारणा करून जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झालेली आहे. जागतिक आर्थिक आदेश (Global Economic Order) हा जागतिक व्यापार संघटनेचा आधारस्तंभ आहे. यामधूनच मुक्त, समावेशी आणि सहकार्याद्वारे जागतिक व्यापार संघटनेची उभारणी झाली आहे. जागतिक व्यापार संघटनेचा जवळचा संबंध जागतिक अर्थव्यवस्थेशी आहे. गेल्या अर्धशतकापासून जागतिक अर्थव्यवस्था मुक्त बाजार आणि आर्थिक एकीकरणाकडे झुकलेली आहे. गेल्या दशकामध्ये आधिक्याने औद्योगिकीकरण विकसनशील देशांमध्ये घडून आलेले आहे. यामधून जलद आर्थिक वृद्धी घडून आलेली आहे. वाहतूक, दळणवळण व माहिती तंत्रज्ञान यामधून आर्थिक लहर निर्माण झालेली आहे. यातून भक्कमपणे पुनर्आकार आंतरराष्ट्रीय संबंधांना प्राप्त झाला आहे. जगाच्या विभागणीतून गॅट निर्माण झाला तर वचनबद्धतेसह आधिक्याने संधी निर्माण करण्याकरिता जागतिक व्यापार संघटनेची निर्मिती झालेली आहे. १९९५ मध्ये ३३ सदस्य देशासह जागतिक व्यापार संघटनेची

† विभाग प्रमुख, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, या. द. व. देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती.
आजीव सभासद क्र. १३७९, भ्रमणध्वनी - ९४२०६३३१२८, ई-मेल : haramkarprashant380@gmail.com

स्थापना झाली होती. पुढे चीन आणि रशिया यामध्ये सदस्य देश झाले. त्याचा लाभ त्यांना मिळाला आहे. याचा अर्थ असा की, जागतिक व्यापार व्यवस्था आता एकाच व्यापार व्यवस्थेचा भाग झालेली आहे.

**विभाग -'अ'**

**जागतिक व्यापार संघटनेचे यश :**

जागतिक व्यापार संघटनेचा २५ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. तेव्हा जगाला संबोधून जागतिक व्यापार संघटनेचे संचालक रॉबर्ट एझिव्हेडो यांनी भाषण केले. या वेळी जागतिक व्यापार संघटनेच्या प्रमुख बाबीवर त्यांनी प्रकाश टाकला. जागतिक व्यापार संघटनेच्या प्रगतीच्या दृष्टिकोनातून त्यांचे भाषण महत्त्वाचे आहे. त्यांनी म्हटले की, देशांच्या सीमा-बाह्य (Cross-border) व्यवसायामध्ये वृद्धी घडून आलेली आहे. जागतिक व्यापारामध्ये डॉलरचे मूल्य १९९५ पासून चौपट झाले आहे. जागतिक व्यापाराचे वास्तविक आकारमान २.७ पटीने (Time) विस्तारले आहे. जागतिक पातळीवर जीडीपीमध्ये दुहेरी अंकाने वाढ झालेली आहे. अनेक देशांनी प्रशुल्कामध्ये कपात करून प्रशुल्के (Tariff) १०.५ प्रतिशत वरून ६.४ प्रतिशतपर्यंत आणले आहे. आर्थिक सुधारणा आणि बाजार खुले करून राष्ट्रीय उत्पन्न वाढीला चालना जागतिक व्यापार संघटनेने दिलेली आहे.

जागतिक व्यापार संघटनेच्या अटीअंतर्गत दळणवळणाचा (Communication) विस्तार घडून आलेला आहे. यामधून जागतिक मूल्य साखळीमध्ये (Global value chain) वाढ झालेली आहे. विविध स्थानावर सहाय्यक सेवा आणि घटक समर्थपणे वळविल्या जात आहे. यामुळे व्यवसायाचा विस्तार प्रांत आणि देशांबाहेर झालेला आहे. व्यापारातील जागतिक मूल्य साखळीमुळे निर्माणी वस्तूचे (Manufacturing goods) उत्पादन वाढून निर्माणी वस्तूचा जागतिक व्यापार ७० प्रतिशतपर्यंत पोहचला आहे.

विकसनशील देशांच्या दृष्टिकोनातून रोजगार निर्मिती व आर्थिक वृद्धीकरिता जागतिक मूल्य साखळी महत्त्वाचा घटक आहे. यामुळे आर्थिक वृद्धीचा वेग वाढून उपभोक्त्याच्या क्रयशक्तीत वाढ झाली आहे. गेल्या २५ वर्षात सर्वच सदस्य देशांमध्ये दारिद्र्यात घट दिसून आली आहे. जागतिक पातळीवर दारिद्र्य १० प्रतिशतपेक्षा कमी आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे उदारीकरण आणि कृषी निर्यात अर्थसहाय्याच्या कपातीमुळे जागतिक व्यापार प्रतिवर्ष १ लाख कोटी (Trillion) डॉलरने वाढत आहे.

जागतिक व्यापार संघटनेचे सदस्य देश नवीन व्यापार नियमांतर्गत व्यापार सुधारणा व आधुनिकीकरण करीत आहे. बाली पॅकेजबाबत सदस्य देशांनी २०१३ मध्ये यशस्वी वाटाघाटी केल्या होत्या. बाली पॅकेजमध्ये कृषीक्षेत्र, अन्नसुरक्षितता, न्यून विकसित देशाचे अर्थसहाय्य आणि व्यापार सुधारणा यावर सहमती घडून आली आहे. नैरोबी येथे डिसेंबर २०१५ मध्ये मंत्रीस्तरीय परिषद झाली. या मंत्रिस्तरीय परिषदेमध्ये कृषी निर्यात अर्थसहाय्यांना दूर करण्यात आले व माहिती तंत्रज्ञान कराराचा विस्तार करण्यात आला होता. यामधून लोकांच्या जीविकेमध्ये सुधारणा होण्याची संभाव्यता वाढली आहे. बुनास एरिस येथे २०१७ मध्ये अकरावी मंत्रीस्तरीय परिषद झाली. या मंत्रीपरिषदेमध्ये ट्रिप्स (TRIPS) कराराबाबत वाटाघाटी होऊन ट्रिप्स करार अंमलात आणण्यात आला. यामुळे औषधांच्या बाजार प्रवेशामध्ये सुधारणा झाल्या आहे. व्यापार सुविधा करार आणि ट्रिप्स करार दबाव आणून अंमलात आणण्यात आला होता. याकरिता २/३ बहुमताने मंजुरात घ्यावी लागली होती. सदस्य देशांचे

जागतिक व्यापार संघटनेशी असलेल्या बांधिलकीमुळे हे दोन्ही करार अंमलात आणणे शक्य झाले आहे.

जागतिक व्यापार संघटनेने आंतरराष्ट्रीय समुदायाला सन्मान प्राप्त करून दिला आहे. नेदरलँडसारख्या लहान देशाने अर्थव्यवस्था खुली करून जवळपास १/४ उत्पन्न त्यांचे जागतिक व्यापार संघटनेवर अवलंबून आहे. तर जर्मनीचे ५ प्रतिशत उत्पन्न जागतिक व्यापार संघटनेच्या व्यापार व्यवस्थेवर अवलंबून आहे. या संघटनेमध्ये अत्यंत गरीब देशांपासून अत्यंत श्रीमंत देशांपर्यंत सदस्य आहे. व्हेनेझुऐला सारख्या बंद अर्थव्यवस्थेपासून सिंगापूरसारख्या खुल्या, उदार अर्थव्यवस्था जागतिक व्यापार संघटनेच्या सभासद आहे. जागतिक पातळीवर विविध हितासह एकत्रित येऊन जागतिक व्यापार संघटनेची संस्थात्मक संरचनेची उभारणी झाली आहे.

**विकसनशील देशांचा सहभाग :**

जागतिक आर्थिक वृद्धी व विकासाचा आधार जागतिक व्यापार संघटना आहे. १९९५ पासून २०१५ पर्यंत विकसनशील देशांचा जागतिक पातळीवर निर्माणी वस्तूचा (Manufacturing goods) व्यापार २७ प्रतिशतवरून ४३ प्रतिशतपर्यंत वाढला आहे. यामुळे विकसनशील देशांचा वाटा जागतिक समग्र देशीय उत्पादामध्ये (Global Gross Domestic Product) ४१ प्रतिशतवरून ५३ प्रतिशतपर्यंत वाढला आहे. उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून चीन, भारत आणि ब्राझिल जागतिक अर्थव्यवस्थेच्या महत्त्वाच्या वाहक (Drivers) ठरत आहे. एवढेच नाही तर आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेचे ते नेतृत्व करीत आहे. जागतिक व्यापारामध्ये विकसनशील देशांनी उसळी मारून आर्थिक लक्ष्यप्राप्ती केली आहे. जागतिक अर्थव्यवस्थेशी त्यांनी एकीकरण घडवून आणले आहे. विकसनशील देशांनी प्राप्त केलेले हे यश जागतिक व्यापार संघटनेच्या अभूतपूर्व, खुल्या, विश्वासार्ह आणि सुरक्षित व्यापार व्यवस्थेवर अवलंबून आहे.

जागतिक व्यापार संघटनेचा विस्तार हा तिच्या वाढत जाणाऱ्या सदस्य संख्येवर अवलंबून आहे. ३३ सदस्य देशासह गॅटची निर्मिती झाली. आज जागतिक व्यापार संघटनेचे १६४ सदस्य देश आहेत. १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेची निर्मिती झाल्यानंतर २००१ मध्ये चीन सदस्य झाला. २००५ मध्ये सौदी अरेबिया तर २०१२ मध्ये रशियाला सदस्यत्व देण्यात आले. यामुळे आता सर्वच जागतिक प्रमुख अर्थव्यवस्था एकाच आर्थिक व्यवस्थेचा (Single Economic System) भाग झालेल्या आहे. प्रामुख्याने ९९ प्रतिशत जागतिक व्यापार हा जागतिक व्यापार संघटनेतंर्गत चालतो. गॅटमध्ये औद्योगिक देश वरचढ होते, तर जागतिक व्यापार संघटनेमध्ये विकसनशील देशांची भूमिका महत्त्वाची आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या कार्यक्रमपत्रिकेला आकार देण्याचे व करारामध्ये वाटाघाटी करण्याचे कार्य प्रामुख्याने विकसनशील देशांनी केले आहे. जागतिक व्यापार संघटना जलद गतीने वृद्धिंगत होत असताना तिने यशस्वीरित्या विकसनशील देशांचे जग निर्माण केले आहे. यामुळेच खुल्या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये विकसनशील देशांना महत्त्वाचे स्थान निर्माण करता आले आहे.

जागतिक व्यापार संघटनेच्या व्यवस्थेमध्ये विवाद निवारण यंत्रणा आहे. या विवाद निवारण यंत्रणेने गेल्या २५ वर्षामध्ये ५०० पेक्षा जास्त विवाद निवारणाची सोडवणूक केली आहे. जो गॅटच्या ५० वर्षातील विवाद निवारणापेक्षा त्याची संख्या जास्त आहे. या व्यवस्थेचा जलद गतीने उपयोग विकसनशील देशांनी केला आहे. याचे प्रतिबिंब म्हणजे जागतिक व्यापारातील विकसनशील देशांचा वाटा वृद्धिंगत होत

आहे. एवढेच नाही; तर जागतिक व्यापार संघटनेच्या नियमाधिष्टीत व्यापार व्यवस्थेच्या आधारावरच विकसनशील देशांनी व्यापार-वाहक वृद्धी (Trade-Driven Growth) व विकास घडवून आणला आहे.

दोहा फेरीमध्ये अत्यंत मंदगतीने वाटाघाटी होऊन प्रगती घडून आलेली आहे. सदस्य देशांची वर्तणूक जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांना अनुसरून आहे. यामधूनच गुंतागुंतीचे वाद प्रश्न देखील निर्माण झाले आहे. असे असले तरी व्यापार व्यवस्थेमध्ये खोलवर अखंडत्व आहे. विवाद निवारण व्यवस्थेच्या करारासह व्यापार विवादाची संख्या वृद्धिंगत होत आहे. जागतिक व्यापारामध्ये खुलेपणा आणि अखंडत्व निर्माण केले गेले आहे हे जागतिक व्यापार संघटनेचे यश आहे. जागतिक पातळीवर सहकार्य घडवून आणणारी ही दूरगामी व्यवस्था आहे.

**प्रशुल्क कपात :**

जागतिक व्यापार संघटनेचे यश किमान व्यापार निर्बंधावर अवलंबून आहे. सरासरी उपयोजित प्रशुल्कामध्ये (Average Applied Tariff) निम्यापेक्षा जास्त कपात गेल्या २५ वर्षामध्ये करण्यात आली आहे. प्रशुल्क दरामध्ये सरासरीने १५ प्रतिशतवरून ८ प्रतिशतपर्यंत कपात करण्यात आलेली आहे. भारतामध्ये सरासरी प्रशुल्क कपात ३८.६ प्रतिशतवरून १३.५ प्रतिशतपर्यंत गेल्या दोन दशकामध्ये केली गेली आहे. मोरोक्को ३३.५ प्रतिशतवरून १२.५ प्रतिशत, इंडोनेशिया २५.६ प्रतिशतवरून ७.१ प्रतिशतपर्यंत सरासरी प्रशुल्क दरामध्ये कपात केली आहे. आज जवळपास ६० प्रतिशत व्यापार प्रशुल्क मुक्त (Tariff Free) आहे. सर्वप्रथम १९९६ मध्ये वाटाघाटी करून माहिती तंत्रज्ञान करार (Information Technology Agreement - ITA), वित्तीय सेवा आणि दूरध्वनी संप्रेक्षण करार (Financial Services and Telecommunication Agreement) करून आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सेवा व्यापारांना स्थान दिलेले आहे. शासकीय संपदा खरेदी करारांतर्गत (Government Procurment Agreement - GPA) सार्वजनिक संपदा खरेदी बाजार (Public Procurment Market) खुले करण्यात आले आहे.

बाली पॅकेजच्या स्वरूपात जागतिक व्यापार संघटनेने २०१३ मध्ये पुढाकार घेऊन महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्या आहे. यामध्ये जोडून न्यून विकसित देशांसाठी व्यापार संधीमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहे. कृषी क्षेत्रातील वादप्रश्नांना संबोधित करून त्याचे मापन करण्यात आले आहे. नेहमीच्या मार्गाला तोडून (Pathbreaking) व्यापार सुविधा कराराला (Trade Facilation Agreement) बाली पॅकेजमध्ये प्रस्तुत करण्यात आले आहे. यामधून सुलभता आणि गतिशीलता जागतिक उपभोक्ता प्रक्रियेमध्ये आणली गेली आहे. यामुळे सरासरी व्यापार व्ययामध्ये १४ प्रतिशतपर्यंत घसरण झालेली आहे. मोठ्या प्रमाणात जागतिक पातळीवर प्रशुल्क काढून टाकण्यात आले आहे. यामुळे जुलै २०१५ पर्यंत १५ पेक्षा जास्त सदस्य देश करारापर्यंत पोहचू शकले आहे. दुसऱ्यांदा माहिती तंत्रज्ञान कराराचा विस्तार घडवून २०० तंत्रज्ञान वस्तू उत्पादनावरील प्रशुल्क काढून टाकण्यात आले आहे. यामध्ये सेमी कंडक्टर, दूरध्वनी संवाद उपग्रह, एम.आर.आय. यंत्रे (Semi-Conductor, Telecommunication Satellites, MRI Machines) इत्यादीचा समावेश आहे. याचा एकूण जागतिक व्यापारामध्ये वाटा ७ प्रतिशत असून जागतिक व्यापारातील मूल्य १.३ लाख कोटी (Trillion) डॉलर प्रतिवर्ष आहे.

जागतिक व्यापारामध्ये नेतृत्व करण्याचे श्रेय संपूर्णपणे बहुपक्षीय व्यापार व्यवस्थेकडे जाऊ शकत नाही. निश्चितच यामध्ये द्विपक्षीय, प्रादेशिक आणि महा-प्रादेशिक कराराचा (Mega-regional) सहभाग आहे. तत्त्व, नियम व प्रक्रिया आणि बहुपक्षीय व्यापार व्यवस्थेची बैठक गॅटकडून वारश्यात जागतिक व्यापार संघटनेला मिळाली आहे. काही क्षेत्रामध्ये जागतिक व्यापार संघटनेचे नियम मार्गदर्शक ठरले आहे. उदा. सेवा क्षेत्र. सेवा क्षेत्राची बांधणी जागतिक व्यापार संघटनेच्या वचनबद्धता व दृष्टिकोन अंतर्गत केली आहे. नवीन पार्श्वभूमीवर प्रादेशिक करारांना जोडले आहे. जसे स्पर्धात्मक धोरण आहे. या धोरणाचे नियम गॅटकडून वारशामध्ये प्राप्त झाले आहे. यामध्ये अभेदयता आणि खुलेपणा आहे. बरेचदा, प्रादेशिक प्रशुल्क पसंती कराराचा (Regional Tariff Preference) प्रभाव अतिशयोक्तीपूर्ण असतो. प्रादेशिक करार मोठ्या प्रमाणात निर्माण झालेले आहेत. जागतिक व्यापार संघटनेमध्ये असे एकूण २६४ करार नमूद केले आहेत. ८४ प्रतिशत जागतिक निर्माणी वस्तूचा व्यापार अभेदय (Non-discrimination) आणि प्रमुख अनुकूल राष्ट्राचा (Most-favoured nations) आधार आहे. थोडा बहुत जागतिक व्यापार पूर्वीपासूनच शून्य प्रशुल्क दरावर होता. प्रादेशिक करार संरक्षित क्षेत्रामध्ये दुर्लक्षिला गेला आहे. कृषी क्षेत्रामधील व्यापार एकपक्षीय, द्विपक्षीय आणि प्रादेशिक उदारीकरणाच्या मापनाशी जुळलेला आहे. जागतिक व्यापार व्यवस्था पूर्वीपासूनच स्थिर, सबळ आणि खुली राहिली.

**जागतिक व्यापार संघटनेचे अपयश :**

जागतिक व्यापार संघटना पर्याप्त भूव्यूहरचनात्मक प्रतिस्पर्धेकरिता (Geostrategic Rivalary) निर्माण झालेली नव्हती. जागतिक व्यापार संघटनेचे मूलभूत उद्दिष्ट आर्थिक धोरणाद्वारे नागरिकांचे प्रतिव्यक्ती उत्पन्न वाढविणे होते. यानुसार सर्व सदस्य देशांना वाढत्या श्रम विभागणीतून लाभ मिळतील, अशी अपेक्षा होती. करारांबाबत सर्व सभासद देशांना विश्वास होता. बहुपक्षीय वाटाघाटीमध्ये कृतिकर्त्यांनी (Actor) दुर्बलतेवर लक्ष केंद्रित करणे सुरू केले होते. याचा संबंध प्रतिस्पर्धक देशाच्या आर्थिक सामर्थ्याशी होता. यामधून सदस्य देशांना धक्के बसायला लागले व त्याच्या व्यथा त्यांना सहन कराव्या लागल्या होत्या.

अस्तित्वातील आर्थिक आणि राजकीय शक्तीचा संबंध वितरणाशी असतो. यामधून नवीन संपदा निर्माण झाली का? तिचे योग्य वितरण झाले का? याचा विचार करावा लागतो. प्रत्यक्षात जागतिक व्यापार संघटनेचे प्रारूप कोसळले आहे. अभेद्य व परस्पर सहकार्याचे तत्त्व अपयशी ठरले आहे. आर्थिक शक्ती म्हणून गणना होणाऱ्या देशांनी प्रशुल्के, विनिमय दर आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीचा शस्त्र म्हणून वापर केला आहे.

**अ) चीनची प्रतिस्पर्धा :**

जागतिक व्यापाराला प्रोत्साहन उदारीकरणातून मिळत असते. यातून आर्थिक केंद्रीकरणाला उत्तेजन मिळते. लहान व गरीब देशांना बहुपक्षीय व्यापार व्यवस्थेचे लाभ प्राप्त झाले आहे का? चीनसारख्या देशांना लोकशाही बाजार अर्थव्यवस्थेचे अनुकरण न करता लाभ प्राप्त करता येईल का? हे प्रश्न अत्यंत जटिल आहेत.

अमेरिका आणि युरोपियन समुदायाला जागतिक व्यापार संघटनेचा चीन सदस्य असणे फारसे पसंत नव्हते. या शतकाच्या सुरुवातीपासून चीन आर्थिक शक्ती म्हणून पुढे येत आहे. चीनची अर्थव्यवस्था संपूर्णपणे भिन्न अशी प्रतिस्पर्धक सामाजिक प्रारूपाची आहे. २००८ च्या जागतिक आर्थिक आणि वित्तीय

अरिष्टापासून चीनने पाश्चिमात्य आर्थिक व्यवस्थेच्या प्रारूपांना नाकारले आहे. यामुळे चीनची राज्य भांडवलशाही (State capitalism) आणि पाश्चात्य आर्थिक प्रारूपे यामध्ये असंगतता निर्माण झाली आहे.

राजकीय आणि आर्थिक सामर्थ्यातील भिन्नता हीच केवळ समस्या नाही तर व्यापार सभासद देश परस्पराकरिता संधी निर्माण करीत नाही. संधी निर्माण करण्याच्या वर्तणुकीमध्ये भय आहे. चीन नोव्हेंबर २००१ मध्ये जागतिक व्यापार संघटनेचा सदस्य झाला तेव्हा त्याने संधी निर्माण करण्याबाबत उच्चतम सकारात्मकता दर्शविली होती. मात्र आज चीनने संधी निर्माण करण्याबाबत संपूर्णपणे नाकारले आहे.

**ब) वाढता राष्ट्रवाद :**

बहुपक्षीय व्यापार व्यवस्थेतील नवीन आर्थिक राष्ट्रवाद (New Economic Nationalism) अरिष्ट घडवून आणणारा आहे. हा राष्ट्रवाद थेट अमेरिका, चीन, रशिया व भारताच्या सत्ताधारी राज्यकर्त्यांवर परिणाम घडवून आणणारा आहे. वर्चस्ववादी आर्थिक राष्ट्रवादामुळे जागतिक व्यापार संघटनेमध्ये अकार्यक्षमता निर्माण झाली आहे. यामधून बहुपक्षीय व्यापार व्यवस्थेला धोका निर्माण झाला आहे. चर्चा आणि विवाद निवारणापासून आंतरराष्ट्रीय समुदायाला हिरावून घेतले आहे. यामुळे जागतिक व्यापार संघटनेला अर्धांगवायू झाला आहे.

बहुपक्षीय व्यापार व्यवस्थेने सर्वच देशांना सन्मान प्राप्त करून दिला आहे. मात्र या मार्गावरून दूर जाऊन जागतिक पातळीवर सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. संपत्तीच्या वितरणाचा महत्त्वाचा वादप्रश्न आहे. शिवाय जागतिक व्यापार संघटनेच्या नियमामधून गुंतागुंतीची आर्थिक व राजकीय स्थिती निर्माण झालेली आहे.

जागतिक व्यापार संघटनेमध्ये अवरोध निर्माण झालेला आहे. राष्ट्रवादावर जास्त विश्वास व भर दिला जात आहे. आर्थिक वर्चस्व प्राप्तीसाठी राजकीय व्यवस्थेची आंतरराष्ट्रीय स्पर्धा केल्या जात आहे. प्रबळ अर्थव्यवस्थाच्या दृष्टिकोनातून अमेरिका आणि चीन हे महत्त्वाचे देश आहेत. पण या दोन्ही देशांमध्ये वर्चस्वधारी स्पर्धा आहे. यामुळे बहुपक्षीय व्यापार व्यवस्थेतील सामर्थ्य नष्ट होण्याची संभाव्यता आहे.

**क) अमेरिका-चीन व्यापार युद्ध व संरक्षण कृती :**

अमेरिकेचे माजी राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापार संरक्षणात्मक मापके लागू केली होती. याबाबतचे पहिले पाऊल मार्च २०१८ मध्ये उचलण्यात आले होते. अमेरिकेने स्टिल व ॲल्युमिनियमच्या आयातीवर आधिक्याने प्रशुल्क लावले होते. ही असमता कृती होती. अमेरिकेसारख्या मोठ्या अर्थव्यवस्थेने संरक्षणात्मक कृतीचा अवलंब केला होता. अमेरिकेने दृश्य स्वरूपात व्यापारयुद्ध छेडले होते. विशेषत: हे व्यापार युद्ध चीनसोबत होते. 'जशास तसे' या व्यूहनीतीचा वापर करून द्विपक्षीय व्यापारामध्ये प्रशुल्क १०० अब्ज डॉलरवर जाऊन पोहचले होते. यामुळे समता व्यापाराला धक्के बसत होते.

बहुपक्षीय व्यापारामधून अमेरिका बाहेर पडू इच्छित आहे. यामधूनच अमेरिका-चीन व्यापार युद्ध घडून आले आहे. या व्यापार युद्धाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम घडून आला आहे. जागतिक व्यापार संघटनेतर्गत बहुपक्षीय व्यापार घडून येतो. मात्र जागतिक व्यापार संघटनेच्या व्यापार नियमाची पायमल्ली करून संरक्षणात्मक धोरणामध्ये पुढाकार अमेरिकेने घेतला आहे. याचे कारण वाढते व्यापार असंतुलन आहे. निर्यातीपेक्षा वाढत्या आयातीमुळे अमेरिकन निर्माणी उद्योगाचा ऱ्हास घडून आला आहे. उद्योगाच्या ऱ्हासामुळे रोजगार नष्ट झाले. परिणामत: अमेरिकन व्यापार प्रशासनाने व्यापार

सहभागी देशांना लक्ष्य करून प्रशुल्के वाढवली आहे.

चीन जागतिक व्यापार संघटनेचा सदस्य झाल्यानंतर चीनचा बाजार प्रवेश वाढून अमेरिकन बाजारामध्ये वर्चस्व निर्माण झाले आहे. अमेरिका-चीन यांची १९८५ मध्ये व्यापार तूट सीमांत पातळीवर होती. १९९० च्या दशकापर्यंत व्यापार तूट १० अब्ज डॉलरपर्यंत वाढली होती. २००० मध्ये व्यापार तूट वाढून २०० अब्ज डॉलर झाली होती. २०१२ मध्ये व्यापार तूट वाढून ३१५ अब्ज डॉलर झाली तर २०१७ मध्ये व्यापार तूट ३७६ अब्ज डॉलरवर पोहचली होती. चीन जागतिक व्यापार संघटनेचा सदस्य झाल्यानंतर (२०००-२०१७) चीनच्या निर्याती १२५ अब्ज डॉलर वरून ५०५ डॉलरपर्यंत अमेरिकेसोबत वाढत गेल्या होत्या. तर चीनच्या अमेरिकेसोबतच्या आयाती १९ अब्ज डॉलरवरून १३० अब्ज डॉलरपर्यंत वाढल्या होत्या.

अमेरिकेची एकूण व्यापार तूट ७७५ अब्ज डॉलर होती. त्यापैकी निम्मी केवळ चीनची ३७५ अब्ज डॉलर आहे. यामुळे चीनच्या आयातीवर प्रशुल्के वाढवून प्रतिबंध लावण्यात आले आहे. यामधून अमेरिकेला व्यापार संतुलन प्राप्त करायचे आहे. अमेरिकेने संरक्षणाची भूमिका घेतली आहे. आर्थिक स्वावलंबनावर भर देऊन व्यापारयुद्ध सुरू केले आहे. यामध्ये प्रमुख लक्ष्य स्टिल आणि अल्युमिनियमच्या आयाती आहे. अमेरिकेला स्टिल आणि अल्युमिनियमची आयात युरोपियन सुदाय, दक्षिण कोरिया, भारत व सर्वात जास्त चीनकडून होते. या सर्व देशांच्या स्टिल व ॲल्युमिनियम आयातीवर उच्चतम प्रशुल्क आकारले आहे. अमेरिका बहुपक्षीय व्यापार प्रणालीमधून बाहेर पडतो आहे, अशी त्याची भूमिका दिसत आहे.

**ड) इतर कारणे :**

जागतिक व्यापार संघटनेची घसरण होण्याचे कारण म्हणजे सदस्य देशांनी बहुपक्षीय व्यापार कराराऐवजी द्विपक्षीय व्यापार करारांना (Bilateral Preferance) पसंती दर्शविली आहे. गेल्या दशकामध्ये द्विपक्षीय कराराच्या संख्येमध्ये तीव्र गतीने वाढ झालेली आहे. यामुळे जागतिक व्यापार संघटनेचे बहुपक्षीय व्यापार कराराचे उद्दिष्ट फोल ठरत आहे. प्रत्येक देश स्वत:चे सामर्थ्य वाढविण्यावर भर देत आहे. विशेषत: अमेरिका, युरोपियन समुदाय व चीन इत्यादी देशाचे देशीय बाजार (Domestic Market) मोठे असल्यामुळे ते द्विपक्षीय व्यापार करारांना जास्त पसंती देत आहे.

जागतिक व्यापार संघटनेच्या विश्वासार्हतेबाबत धोका निर्माण झाला आहे. अमेरिकेने जागतिक व्यापार संघटनेच्या विश्वस्त मंडळावर (Appelate Body) न्यायाधीश नेमणुकीवर बंदी घातली आहे. त्यामुळे विवाद निवारण यंत्रणेचे निवारणाचे कार्य ठप्प पडले आहे. व्यापार विवादाच्या संदर्भात युरोपियन समुदाय व कॅनडा यांनी प्रतिमान पॅनल (Model Panel) ची स्थापना विवाद निवारण यंत्रणेच्या बाहेर जाऊन केलेली आहे. अशाप्रकारे इतर देश परस्परामध्ये व्यापार विवाद निर्माण झाला तर प्रतिमान पॅनल स्थापन करून विवादाचा निपटारा करतील, असे दिसून येत आहे.

**विभाग 'ब'**

**संस्थात्मक पातळीवरची आव्हाने आणि लक्ष्य प्राप्ती :**

जागतिक व्यापार संघटनेचे निर्णय सर्वानुमते होत नसले तरी मतदान, विचार विनिमय यंत्रणेशिवाय सर्वांनुमत घडून येऊ शकत नाही. गॅट करारामध्ये जागतिक व्यापार संघटनेच्या तुलनेत आधिक्याने गुंतागुंत व वादप्रश्न होते. त्या तुलनेत जागतिक व्यापार

संघटनेमध्ये गुंतागुंत व वादप्रश्नाचे प्रमाण कमी आहे. मात्र विविध परिप्रेक्ष्य, संबंध, हित व वादप्रश्नाबाबत १६४ सदस्य देशांचे संतुलन साधणे सोपी गोष्ट नाही. सर्वच देशांच्या संरचना, बाह्यस्वरूप आणि प्रक्रियेला भिन्न मर्यादा आहे. तसेच सर्व देशाचे समान हित साध्य करणे व तडजोड स्वीकारण्यालादेखील मर्यादा आहे.

गुंतागुंतीच्या वादप्रश्नावर उपाय शोधला जाणे आवश्यक आहे. विविध अडथळ्यांवर मात करून सामान्य परिस्थिती निर्माण करणे आवश्यक आहे. सदस्य देशांना प्रादेशिक संलग्नीकरण, सामान्य वाटाघाटी, विकासातील वाटा मिळणे आवश्यक आहे. सल्लामसलतीच्या बैठकीमुळे सदस्य देशांची सौदाशक्ती वाढली आहे. शिवाय पारदर्शकता आणि सर्वसमावेशकता वाढविणे आवश्यक आहे. सदस्य देशांकरिता व्यापार वृद्धिंगत होत जाणे हे त्यांच्या आर्थिक हिताकरिता फार महत्त्वाचे आहे. व्यापार व्यवस्थेची शक्ती रुंदावण्याकरिता दबाव निर्माण केला जात आहे. वाटाघाटी या तळाच्या वर जाऊन (Bottom up) होण्याची आवश्यकता आहे. यामध्ये पुढाकार २०१३च्या व्यापार सुविधा करारातील तरतुदींनी घेतला आहे. हा करार जागतिक व्यापार घटनेची अंतर्गत क्षमता वाढविणारा आहे. यामध्ये समावेशकता, पारदर्शकता आणि सदस्य वाहकता (Member driven) वाटाघाटीबाबत आहे. कराराबाबत चर्चा व रचनेशी सदस्य देश कृतिशीलपणे जुळलेले आहे. याकडून जागतिक व्यापार संघटनेच्या वाटाघाटीची प्रक्रिया होते.

जागतिक व्यापार यंत्रणेचे उद्दिष्ट अधिकतम पारदर्शकता, संवाद आणि सर्वसमावेशकता आहे. याकरिता जागतिक व्यापार संघटनेमध्ये सर्वानुमत घडून येण्याची आवश्यकता आहे. जागतिक व्यापार संघटना अनेक वादप्रश्नाचा सामना करीत असताना तिचे जागतिक स्वरूप फार महत्त्वाचे ठरते. जागतिक व्यापार संघटनेचा वृद्धिंगत होत जाणारा आकार व विविधता दुर्लक्षित केला जाऊ शकत नाही. लक्ष्यप्राप्ती करण्याकरिता व्यापार सुविधा घडवून आणणे आवश्यक आहे.

**विकसनशील देशांचे सक्षमीकरण :**

जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्यत्वाचा विचार करणे म्हणजे खऱ्या अर्थाने जागतिक व्यापार व्यवस्था निर्माण करणे होय. खात्रीशीरपणे सर्वच सदस्य देशांना सदस्यत्वाचा लाभ प्राप्त झालेला आहे. विकसनशील देश आणि विशेषत: न्यून विकसित देश यांना व्यापार वाटाघाटीद्वारे संधी खुल्या झाल्या आहे. मात्र संधीमध्ये संपूर्णपणे पुढाकार घेऊ शकले नाही. यामध्ये प्रामुख्याने तंत्रज्ञान आणि निर्यात क्षमतेमध्ये उणिवा आहेत. संस्थात्मक पातळीवर बदल करून विकसनशील देशांना पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. याकरिता उरूग्वे फेरीचा उपयोग होऊ शकतो. आधुनिक प्रशिक्षण व तांत्रिक सहाय्यक कार्यक्रम, गॅटमधील लक्ष्यप्राप्ती व संसाधनाबाबत तरतुदी केल्यास विकसनशील देशांना सहाय्यक ठरू शकतात. याद्वारे तंत्रज्ञानात्मक सामर्थ्य वाढविल्या जाऊ शकते. यामुळे जागतिक व्यापार संघटनेच्या सामर्थ्यामध्ये वाढ होऊन विकसनशील देशांचा सहभाग दिवसेंदिवस वाढत जाईल. याकरिता सक्षम कायदेशीर व्यवस्था व देशाची उत्पादन क्षमता वाढण्याची आवश्यकता आहे.

जागतिक व्यापार संघटनेच्या निर्मितीनंतर फार मोठे बदल जागतिक पातळीवर घडून आले. यामधून सदस्य देशांच्या जाणिवा वृद्धिंगत होत गेलेल्या दिसून आल्या. अनेक सदस्य देश तांत्रिक व संसाधनात्मक आव्हानाचा सामना करीत होते. या दरम्यान उरूग्वे फेरीच्या महत्त्वाकांक्षी निर्णयाची अंमलबजावणी केली

गेली. जागतिक व्यापार संघटनेने तांत्रिक सहाय्यक व प्रशिक्षण जलद गतीने वाढविले होते. जागतिक व्यापार संघटनेमध्ये सहा स्थायी प्रमंडळे होती त्याचे उद्दिष्ट न्यून विकसित देशाचे एकीकरण जागतिक अर्थव्यवस्थेशी करायचे होते.

दोहा फेरीसह जागतिक व्यापार संघटनेचे तांत्रिक सहाय्य व क्षमता बांधणी (Capability Building) चा परिणाम म्हणजे आधिक्याने गतिशीलता वाढविणे आहे. तांत्रिक सहाय्याचे अभिवचन म्हणजे वाटाघाटी करून कायदेशीर बांधणी करणे आहे. प्रमाणके आणि व्यापार विकास सुविधा (The Standard and Trade Development Facility - STDF), विविध आंतरराष्ट्रीय संघटनाचा सहयोग यामधून विकसनशील देशांची क्षमता बांधणी झालेली आहे.

जागतिक व्यापार संघटनेचे तांत्रिक सहाय्य विकसनशील देशांना साधन स्वरूपात मदत करणारे आहे. सदस्य देशांचा बहुपक्षीय व्यापार प्रणालीमधील सहभाग प्रभावशाली आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या तरतुदी अंतर्गत संधींना पुढाकार, तांत्रिक सहाय्य, पुरेसा निधी व सुरक्षितता देण्याची आवश्यकता आहे.

विकसनशील देशांची जलद गतीने भूमिका जागतिक व्यापार संघटनेमध्ये विकसित पावत आहे. यामध्ये अनेक न्यून विकसित देशदेखील समाविष्ट आहेत. गेल्या दोन दशकामध्ये विकसनशील देशांचा वृद्धिंगत होणारा व्यापार व सहभाग प्रभावी ठरत आहे. दोहा विकास कार्यक्रमपत्रिकेतंर्गत वाटाघाटी होऊन बाजार प्रवेश अटीवर प्रकाश टाकला तर विकसनशील देशांसाठी व्यापार नियम अनुकूल आणि समान आहे. २०१३ च्या बाली पॅकेज अंतर्गत व्यापार सुधारणामध्ये पुढाकार घेण्यात आला आहे. यामध्ये विकसनशील देशांकरिता लाभ प्रस्तुत करण्यात आले. मूळ सदस्य देशांनी पारदर्शकतेला पसंती दर्शविली आहे. प्रशुल्काबाबत अंमलबजावणी केली तर त्याचा लाभ न्यून विकसित देशांना होऊ शकतो. न्यून विकसित देशाकरिता कोटा मुक्त बाजार प्रवेश, सेवा व सेवांच्या पुरवठ्याकडून बाजार प्रवेशाला मान्यता याकरिता आग्रहाऐवजी क्रियान्वयन होण्याची आवश्यकता आहे.

**कृषी अनुदान कपातीला प्रोत्साहन :**

उरूग्वे फेरीमध्येच कृषी क्षेत्रातील निर्यात अनुदानाचा वादप्रश्न प्रामुख्याने वाटाघाटीमध्ये होता. जागतिक व्यापार संघटनेचा कृषी करार सदस्य देशासाठी अडथळा आहे. कृषी उत्पादनासाठी विकसित देश निर्यात अनुदानाचा उपयोग करतात. निर्यात अनुदाने कपात वचनबद्धतेअंतर्गत येतात. निर्यात अनुदानाच्या कपातीकरिता वेळापत्रक दिलेले आहे. या वेळापत्रकामध्येच संख्यात्मक व अंदाजपत्रकीय मर्यादाची मांडणी केलेली आहे. हे वेळापत्रक विकसित व विकसनशील देशांना लागू होते. मात्र प्रत्यक्षात विकसित देशांनी निर्यात अनुदानामध्ये कपात घडवून न आणता त्याचा उपयोग संरक्षण विरोधी (Anti-circumvention) तरतूद म्हणून केला आहे.

दोहा फेरी वाटाघाटीचे प्रमुख तत्त्व निर्यात अनुदाने व संबंधित मापके वगळले जाण्याचे आहे. निर्यात अनुदानामध्ये आंतरराष्ट्रीय अन्न मदत, निर्यात कर्ज, निर्यात कर्ज हमी, विमा कार्यक्रम व कृषी वस्तू निर्यात आणि राज्य व्यापार उदयमी यामध्ये समाविष्ट आहे. बाली मंत्रीस्तरीय परिषदेमध्ये निग्रहाने सांगितले की, निर्यात अनुदानाचे उद्दिष्ट निर्यात स्पर्धा आणि सबळपणे निर्बंधाचा उपयोग निर्यातीकरिता करायचा आहे. यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

उरूग्वे फेरी अंतर्गत सदस्य देशांनी देशीय अर्थसहाय्य मापकेबाबत (Domestic Support Measures) सहमती घडवून आणली होती. कृषी

अर्थसहाय्ये ही तांत्रिक अट होती. संस्थात्मक मर्यादेवर त्यांचा भर होता. यामधून व्यापार विरूपणे (Trade Distortion) घडून आली. सदस्य देश मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य देत होते. मौद्रिक अटी अंतर्गत अर्थसहाय्यामध्ये कपात घडवून आणायची होती. युरोपियन समुदायाने १९९५ ते २०१२ दरम्यान ८२ प्रतिशत, जपान ५२ प्रतिशत, तर अमेरिकेने २००० ते २०१२ दरम्यान ६० प्रतिशत व्यापार विरूपित अर्थसहाय्यामध्ये कपात घडवून आणली होती. देशीय धोरणामध्ये बदल करून धोका निर्माण करणाऱ्या कृषी अर्थसहाय्यामध्ये कपात घडवून आणणे आवश्यक होते. यामध्ये शेतमालाच्या उच्च किंमतीची भूमिका महत्त्वाची आहे. व्यापारेत्तर (Non-trade) विरूपनांना सदस्य देश कृषी अनुदाने देत होते. यावर निर्बंध लावण्यात आले.

दोहा फेरीचे उद्दिष्ट व्यापार विरूपित अर्थसहाय्यामध्ये कपात करणे होते. अर्थसहाय्य न्यूनतम पातळीला आणायचे होते. बाली मंत्रीस्तरीय परिषदेमध्ये ग्रामीण जीविका (Rurul Livelihood) आणि भूमी उपयोजन कार्यक्रम जोडला होता. याच्याशी विकसनशील देशांचे हित जुळलेले आहे. यांतर्गत अन्नधान्य साठवणुकीकरिता तात्पुरते संरक्षण म्हणून अर्थसहाय्य दिले जाऊ शकते. यामुळे अन्नसुरक्षिततेकरिता धान्यसाठा करणे व धान्य पिकांना महत्त्व दिले जाऊ शकते. धान्य पिकांकरिता ते महत्त्वाचे साधन आहे. जागतिक व्यापार संघटनेचे सदस्य देश कायदेशीररित्या कृषी करार निर्बंधांना आव्हान देऊ शकत नाही. काही प्रमाणात मर्यादा भंग करण्यावर सहमती असली तरी त्यामधून संपूर्णपणे सुटका करून घेऊ शकत नाही. मात्र काही प्रमाणात यामधून सोडवणूक करून घेतली आहे. सार्वजनिक धान्य साठवणूक कार्यक्रमा (Public Stock Holding Programme) बाबत सदस्य देशांमध्ये वाटाघाटी सुरू आहे. अनेक सदस्य देशांना त्यांच्या कृषी धोरणाबाबत देशांतर्गत चर्चा घडवून आणायची आहे. हा देशांच्या अंतर्गत धोरणाचा भाग राहणार आहे.

**विभाग -'क'**

**भविष्याचा वेध आणि उपाय :**

जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्य देशांना बहुपक्षीय व्यापार व्यवस्थेचा गाभा सुरक्षित ठेवायचा आहे. याकरिता कृतिशील काळजी घेण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून भविष्यामध्ये जागतिक व्यापार संघटना कोसळणार नाही. जागतिक व्यापार संघटनेचे माजी संचालक व युरोपियन समुदायाचे सध्याचे व्यापार कमिशनर पास्कल लॅमे यांनी म्हटले की, जागतिक व्यापार संघटनेमध्ये गती निर्माण करण्याची आवश्यकता आहे. याकरिता अमेरिकेवर दबाव निर्माण करावा लागेल. संपूर्ण व्यवस्थेलाच अर्धांगवायू झालेला आहे. यामुळे सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता आहे. मात्र अमेरिकेच्या सहकार्याशिवाय या जटिल समस्येवर मात करणे शक्य नाही. सोबतच जागतिक आर्थिक पटलावर चीनचा उदय झालेला आहे. अशावेळी दोन भिन्न व्यवस्था असणाऱ्या देशांना जागतिक व्यापार संघटनेला संबोधित करायचे व हाताळायचे आहे.

परस्पर देशांमधील व्यापाराची आर्थिक व्यवस्था सुसंगत नाही. यामुळे जागतिक व्यापार संघटनेला आधिक्याने पुढारलेले असावे लागेल. याकरिता गॅट १९९४ मध्ये लागू केलेल्या नियमाची पुनर्मांडणी करावी लागेल. लोकशाही बाजार व्यवस्थेच्या गाभ्यासह आर्थिक एकीकरण, व्यापार धोरणामध्ये अधिकार मुक्तीसंख्या (Renounces degree of freedom) व विवाद निवारण मंडळाचे सार्वभौमत्व जपण्याची आवश्यकता आहे. याकरिता संघ व्यवस्था (Club

System) निर्माण करण्याची आवश्यकता आहे. द्विपक्षीय व्यापार कराराची लोकप्रियता लक्षात घेता द्विपक्षीय व्यापार करारांच्या अंमलबजावणीला सहाय्य करण्याची आवश्यकता आहे. मात्र त्याच वेळी बहुपक्षीय व्यापार व्यवस्था प्रतिस्थापित होणार नाही याची काळजीदेखील घ्यावी लागणार आहे. याकरिता वाटाघाटी करून सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

**१) पारदर्शकता व दायित्व वाढविणे :**

जागतिक व्यापार व्यवस्था अधिक खुली व एकीकरण झालेली आहे. जागतिक व्यापार संघटनेने नवीन जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत. यापैकी एक म्हणजे जागतिक व्यापार संघटनामध्ये पारदर्शकता वाढविण्यावर भर दिलेला आहे. दुसरे जागतिक व्यापार संघटनेला सदस्य देशाबाबत कठोर दायित्व पार पाडायचे आहे. याकरिता जागतिक व्यापार संघटनेला व्यापार धोरणामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. सोबतच देशांच्या व्यापार धोरणाचा आढावा घेऊन बाजार खुले करताना माहितीची देवाणघेवाण करणे, आपसातील समजूतदारपणा वाढवून संवाद वाढविण्याची आवश्यकता आहे. प्रमुख बदल घडवून आणत असताना मुक्त व्यापार आणि व्यापार व्यवस्थेचा लाभ विकसनशील देशांना मिळणे आवश्यक आहे. नवीन व्यापार सुविधा करारातंर्गत प्रशिक्षण व तांत्रिक सहाय्यक विकसनशील देशांच्या कृतिकरिता मदत ठरू शकते. यामार्फत संपूर्णपणे पुढाकार व्यापार सुविधा कराराला घ्यायचा आहे. आधिक्याने त्याचे कार्य सहभागी देशासह व्यापार क्षमतेची बांधणी करणे आहे. याकडून एकीकरण चौकट वाढविणे (Enhanced Integrated Framework - EIF) प्रमाणके आणि व्यापार विकास सुविधा (The Standards and Trade Development Facility - STDF) आणि व्यापार पुढाकारासाठी मदत (The Aid for Trade Initiative) करार आहेत. इतर वादप्रश्नासह आंतरराष्ट्रीय संस्थांच्या संगनमतासह जागतिक व्यापार संघटना वृद्धिंगत होत आहे. जागतिक व्यापार संघटनेची तांत्रिक प्रमाणके, आरोग्य धोरणे, पर्यावरण नियंत्रणे व विवाद निवारण वादप्रश्नासह जागतिक आर्थिक शासनामध्ये मध्यवर्ती भूमिका आहे.

**२) त्यागाची भूमिका :**

जागतिक व्यापार संघटनेच्या यशाची खूण म्हणजे विस्तारत असलेला जागतिक व्यापार आहे. गेल्या २५ वर्षामध्ये जागतिक व्यापाराचा आकार बदलत गेला आहे. जागतिक व्यापार संघटना संकटपूर्ण स्थितीचा सामना करीत आहे. अत्यंत जास्त अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. दीर्घकाळापासून दोहा फेरीला परत-परत उशीर केला जात आहे. दोहा फेरीच्या कालावधीची मर्यादा चुकवल्या जात आहे. याचे कारण म्हणजे सदस्य देशांमध्ये द्विपक्षीय व प्रादेशिक व्यापाराच्या पर्यायाचा वापर वाढला आहे. मात्र पुढाकार, आधुनिकीकरण व काळसुसंगतता निर्माण करण्याची क्षमता जागतिक व्यापार संघटनेमध्ये असेल तर आव्हाने सहज पेलणे शक्य आहे. यथार्थपणे देश या व्यापार व्यवस्थेचा आधार आहे. सदस्य देशांनी वादप्रश्नांना संबोधित केले आहे. यामधून त्यांना यश प्राप्त झाले आहे. मात्र व्यवस्था यशस्वी करण्यासाठी त्यागाची व मागे हटण्याची भूमिका पार पाडण्याची आवश्यकता आहे.

**३) कार्याचे परिशीलन :**

जागतिक व्यापारामध्ये खुलेपणा वाढत असताना बहुध्रुवीयता (Multiplier) जागतिक अर्थव्यवस्थेशी अत्याधिक प्रमाणात जुळलेली आहे. जागतिक व्यापार संघटनेमुळे त्याला थोडे जास्तच महत्त्व प्राप्त झाले आहे. जागतिक व्यापार संघटनेने जागतिक व्यापार

व्यवस्थेला नियमाधिष्ठित शासक (Rules Governing), चौकट आणि व्यापार अडथळ्याची सोडवणूक करण्याकरिता मूलभूत यंत्रणा निर्माण केली आहे. ही केवळ जागतिक व्यापार व्यवस्था नसून सर्व देशांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारी व्यवस्था आहे. जागतिक व्यापार संघटनेमध्ये अत्यंत बलाढ्य देश समाविष्ट असून वाढत जाणाऱ्या जागतिक व्यापारातील वादप्रश्नांना सहकार्य करू शकतात. अडथळ्यावर मात करू शकतात. मूलभूत तत्त्व अभेद्यतेचे आहे. जागतिक व्यापार संघटनेचा भर समावेशन आणि सहकार्यावर आहे. व्यापारामध्ये बहुपक्षीयवाद पुढील २५ वर्षांनंतर कसा राहील, याची चिकित्सा होणे गरजेचे आहे. यामधून धडा घेऊन भविष्यामध्ये जागतिक व्यापार संघटनेचे कार्य कसे सुरू राहील याबाबतच्या तरतुदींचा शोध घेणे आवश्यक आहे.

जागतिक व्यापार संघटनेने गेल्या २५ वर्षांमध्ये बरीच लक्ष्यप्राप्ती केली आहे. कदाचित त्याची ओळख संरक्षणकर्ता म्हणून करावी लागेल. जागतिक व्यापारामध्ये निर्बंध न्यूनतम पातळीवर आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार खुले करण्याच्या नियमनांना सन्मान प्राप्त करून दिला आहे. वाढती एकीकृतता (Integrated) आणि नियमाधिष्ठता (Rule-Based) यामुळे व्यापार व्यवस्थेला वैश्विक स्वरूप प्राप्त झाले आहे. आधिक्याने सदस्य देश विवाद निवारण यंत्रणेचा वापर करीत आहेत. जागतिक व्यापार संघटनेने व्यापार कायदा विकसित केला आहे. केवळ राष्ट्रीय धोरणच नाही तर आंतरराष्ट्रीय व्यापार संबंध अनुकूल राहण्यावर भर दिलेला आहे. शिवाय पारदर्शकता आणि नियंत्रण या व्यवस्थेमध्ये आहे. कठोरशक्ती नियमनांना मृदुशक्ती नियमन जागतिक व्यापार संघटनेमध्ये उत्तेजन देत असते. आर्थिक अरिष्ट व अनिश्चिततेच्या (२००८) कालावधीमध्येसुद्धा जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्य देशामध्ये बांधिलकी, सहकार्य, नियमनाचा सन्मान व विवादाची सोडवणूक करण्यात येत होती.

**४) वाटाघाटीसाठी सकारात्मक दृष्टिकोन :**

जागतिक आर्थिक संबंध वृद्धिंगत होत असताना अपरिहार्यपणे नवीन आव्हाने निर्माण झाली आहे. पूर्वीच्या वादप्रश्नाची सोडवणूक अगोदरच्याच व्यापार फेऱ्यामध्ये व्हायला पाहिजे होती. मात्र ती झाली नाही. कृषी क्षेत्र मोठ्या प्रमाणात पूर्वीच्या वाटाघाटीमध्ये टाळल्या गेले. कृषी क्षेत्रातील वाटाघाटींना बगल देण्यात आली. नाट्यमयरित्या प्रशुल्क आणि कोटा पद्धती न्यूनतम पातळीवर आणण्यात आली. सीमांतर्गत वादप्रश्न सोडविण्यासाठी आरोग्य प्रमाणके आणि पर्यावरण कायदे (Health Standards and Environment Laws) आहेत. याचा प्रत्यक्ष परिणाम व्यापारावर होतो. ही व्यापारेत्तर (Non-Trade) कारणासाठीची रचना आहे. व्यापार विनिमयातील सवलतीद्वारे त्याची सोडवणूक होऊ शकत नाही. धोरणात्मक क्षेत्राला पार करून जाण्यासाठी सहकार्य आणि सर्वानुमतीची आवश्यकता आहे. आंतरराष्ट्रीय संघटना आणि देश जागतिक व्यापार संघटनेशी जुळलेले आहे. कारण विकसनशील देशांसाठी व्यापार वृद्धी घडून येण्याकरिता व्यापार हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. व्यापार धोरणावर नियंत्रण, तांत्रिक सहाय्य, क्षमता बांधणी, विविध मंडळे यावर चर्चा घडून येणे व वाटाघाटी होणे अत्यंत गरजेचे आहे.

जागतिक व्यापार संघटनेमध्ये विकसनशील देश अत्यंत महत्त्वाचे खेळाडू आहे. त्यांची जागतिक व्यापारातील भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. यामध्ये जलद गतीने वृद्धिंगत होत असलेल्या चीन, भारत व ब्राझिल यांची जागतिक व्यापार संघटनेमधील भूमिका

अकल्पनीय आहे. लहान देश या व्यवस्थेचा आधार घेऊन वृद्धी घडवून आणू पाहत आहे. जागतिक व्यापार संघटना हा केवळ शासनाचा विषय राहिला नसून तो अशासकीय कृतिकर्ते (Non-State Actor) यांचा विषय झाला आहे. यामध्ये व्यावसायिक, विविध संघटना, पर्यावरणवादी, विकासवादी अशासकीय संघटनाशी त्यांचा संबंध आहे. बहुपक्षीय व्यापार व्यवस्था कारणे आणि परिणामामुळे प्रभावित होत असते. गॅटच्या तुलनेत जागतिक व्यापार संघटना दृश्य स्वरूपात आहे. अपरिहार्यपणे देशादेशातील वादप्रश्नाच्या गुंतागुंतीमुळे त्यांच्यामधील राजकारण वाढले आहे.

**समारोप :**

जागतिक व्यापार संघटनेचे यश सदस्य देशांच्या सहकार्य करण्याच्या इच्छेवर अवलंबून आहे. जागतिक व्यापार संघटनेची निर्मिती व प्राप्त झालेले पर्याप्त यश यामधून जागतिक व्यापार संघटना विकसित होत गेली आहे. यामध्ये आधिक्याने सदस्य देशांनी व्यापार खुला करण्यामध्ये पुढाकार घेतला आहे. यामधून सदस्य देशांच्या अर्थव्यवस्थेमध्ये वृद्धी व विकास घडून आले आहे. यावरून आपण असे म्हणू शकतो की, जागतिक व्यापार संघटनेच्या नियमाचे हे सामर्थ्य आहे. यामध्ये प्रबळता आहे. सदस्य देशांचे सार्वभौमत्व व राष्ट्रहित हे सामूहिक हितावर अवलंबून आहे. आजची जागतिक अर्थव्यवस्था वृद्धिंगत होत असताना ती मुक्त, आंतरअवलंबित्व आणि बहुकेंद्रीय आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार सहकार्य आणि एकीकरणावर अवलंबून असतो. जागतिक व्यापार व्यवस्था अभेद्य राहिली आहे. सदस्य देशांच्या सहकार्यावरच जागतिक व्यापार संघटनेचे यश अवलंबून आहे.

गेल्या दोन वर्षापासून आंतरराष्ट्रीय व्यापारावर सदस्य देशांनी व्यापार निर्बंध मोठ्या प्रमाणात लादले आहे. यामुळे आज जागतिक व्यापार संघटना व्यापार निर्बंधाचा सामना करीत आहे. यातून व्यापाराबाबत परस्पर देशांमध्ये असंयोग वाढला आहे. विवाद निवारण यंत्रणेचे धक्के सदस्य देशांना बसले आहेत. जागतिक व्यापारामध्ये अनिश्चितता वाढली आहे. यामुळे शाश्वतता वाढण्याची आणि वाटाघाटी यशस्वी होण्याची आवश्यकता आहे. शिवाय कृषी अर्थसहाय्ये व प्रशुल्के या बाबत यशस्वी वाटाघाटी होण्याची आवश्यकता आहे. जागतिक व्यापारामधून रोजगार, आर्थिक वृद्धी व विकास घडून येण्याकरिता जागतिक व्यापार संघटनेला सुलभता, सुरक्षितता व वर्धिष्णुता व्यापार चौकटीमध्ये निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची :**


1) Abraham Biju Paul , Ray Partha (2020) : Trade war and Global Economic Architecture - An emerging economy perspective, Economic and Political Weekly, Apri -25, Vol. LV, No. 17.
2) Bureau (2013) : WTO Seal $1 trillion Landmark trade deal in Bali, The Economic Times, Dec. 8-14.
3) Dhar Biswajit (2018) : Trade War of United State, Economic & Political Weekly, Vol-LIII, No. 37, Sept. 15.
4) Felbermayr Gabriel (2019) : 25 Years of the WTO - Causes of decay and reform proposal for the future, Kiel Fouse Series, December.
5) Ingco D Merlinda and Nash D. Joan (Editor) (2005) : Agriculture and the WTO - Creating a Trading System for Development, Atlantic Publisher, New Delhi.
6) Kunth Ravi D. (2014) : What happen at the Bali WTO meet and Why, Economic and Political Weekly. Vol. - XLIX, No. 2, January 11.

7) Kanth Ravid (2017) : Multilateral Failure of WTO, Ministrial at Buenos Aries, Economic and Political Weekly, Dec. 30, Vol - LII, No. 52.
8) Narlikar Amrita (2005) : The World Trade Organisation - A very short introduction, Oxford University Press.
9) Sharma Sachinkumar, Lahiri Teesta Neogi Suvayan and Akhtar Raihun (2020) : Revising Domestic Support to Agriculture at the WTO : Ensuring a level playing field center for WTO Studies, Indian Institute of Foreign Trade, Working Paper.
10) World Trade Organisation (2010) : Annual Report 2005, 10th Anniversary 1995-2005, WTO Publication, Geneva, Switzerland.
11) World Trade Organisation (2015) : The WTO at twenty - Challenges and achievements, WTO, Geneva, Switzerland.
12) World Trade Organisation (2019) : WTO Ministrial Conference - Key Outcome, Cambridge University Press.
13) World Trade Organisation (2020) : The WTO's 25 Years of Achievements And Challenges, WTO Publication, 1st Jan.
१४) हरमकर प्रशांत (संपादक) (२०१८) : व्यापार उदारीकरण आणि रोजगाराचा वादप्रश्न, रोजगाराचा वादप्रश्न विचार आणि वास्तव, कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी, अमरावती.
१५) हरमकर प्रशांत (२०२०) : जागतिक व्यापार संघटनेची २५ वर्ष : यश आणि अपयश, डिसेंबर २४.

◆

''साधनसामुग्रीची दुर्मिळता नाही आणि म्हणून प्रत्येक गरज भागवली जाते आहे, अशी परिस्थिती जेव्हा निर्माण होईल तेव्हा ह्या जगातून अर्थशास्त्र अदृश्य होऊन जाईल; पण असे जग दृष्टीपंथात नाही व पुढेही येणार नाही...''

**मॅक्ना**

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना व अर्थसंवाद लेखकांना कळविण्यात येते की, कार्यकारिणीच्या ठरावानुसार दि. १ एप्रिल २०२० पासून अर्थसंवाद हा '**तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक**' करण्यात आलेला आहे. त्यामुळे यापुढील काळात अर्थसंवादचे लेख हे तज्ज्ञांकडून परिक्षण करुन घेऊन, गरजेनुरूप त्यामध्ये लेखकांकडून योग्य त्या सुधारणा करुन घेऊनच अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध केले जातील. युजीसीचे बदलते धोरण आणि गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने सदर हितावह बदल अर्थसंवादमध्ये करण्यात आलेला आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# भारतीय कृषिक्षेत्र आणि तीन नवीन कृषिकायदे

**करमसिंग राजपूत** †

**प्रास्ताविक**

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून संपूर्ण जगात ओळखला जातो. आजही भारतातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे ५५ ते ६०% जनता शेती क्षेत्रावरच अवलंबून असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यापूर्वीपासूनच शेती क्षेत्रावर अवलंबून असलेल्या प्रचंड लोकसंख्येमुळे भारताची ओळख संपूर्ण जगात कृषिप्रधान देश म्हणून निर्माण झाल्याचे दिसून येते. भारत कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जात असला तरी येथील शासकीय धोरणे मात्र सुरुवातीपासूनच कृषिप्रधान (कृषीला प्राधान्यक्रमावर ठेवून न घेतल्याचे) नसल्याचे दिसून येते.

ब्रिटिश शासनाच्या काळात सर्वप्रथम शेती समस्यांची मांडणी महात्मा जोतिराव फुले यांनी केल्याचे दिसून येते. त्यांनी 'गुलामगिरी' (१८७३ ), 'शेतकऱ्याचा आसूड' (१८८३ ), 'इशारा' (१८८५) इत्यादी महत्त्वाचे ग्रंथ लिहून त्याद्वारे भारतातील शेती व शेतकऱ्यांच्या समस्या तत्कालीन ब्रिटिश शासनासमोर प्रखरपणे मांडल्या. स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री स्व. डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांनीसुद्धा भारतीय शेतीची दुरवस्था ओळखून सुमारे ५०-६० वर्षांपूर्वीच म्हटले होते की, 'कृषी संस्कृती ही सर्व संस्कृतींची जननी आहे. तिचा विकास करणे जरुरी आहे. कृषी हा मानवी जीवनाच्या विकासाचा आद्य उद्योग आहे. कृषिशिवाय मानवी जीवनाच्या विकासाचा सिद्धांतच निरर्थक आहे. म्हणून शासनाने शेती विकासाकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे.' भारतीय शेतकऱ्यांबाबत डॉ. भाऊसाहेब देशमुख असे म्हणाले होते की, 'भारतीय शेतकरी आणि शेती यांच्याबद्दल मला नितांत आदर आहे. मी शेतकऱ्याला सर्वश्रेष्ठ धन निर्माता समजतो. त्याचे कष्ट, प्रामाणिकपणा, त्याच्यात वास करीत असलेली करुणा आणि त्याचे राष्ट्रप्रेम अजोड आहे. मी ते अनेकदा अनुभवले आहे.' तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी सुद्धा आपल्या 'इनामदार' या नाटकातून शेतकऱ्यांची कशी पिळवणूक होते हे दर्शविले आहे. या तीन व अन्य महामानवांनी वेळोवेळी दर्शविलेली शेतीची दुरवस्था विचारात घेऊन त्या त्या वेळच्या शासनांनी कृषिपूरक धोरणे राबविली नाहीत. परिणामी, भारतीय शेती प्रचंड संकटात सापडून लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या

† अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जि. यवतमाळ
आजीव सदस्य क्र. १४६७, भ्रमणध्वनी : ९९२२५४८०८४, ई-मेल : rajputkaramsing@gmail.com

केल्याचे आपणास माहीत आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या (NCRB-National Crime Record Bureau) आकडेवारीनुसार भारतात सन १९९५ ते २०२० या काळात सुमारे ३,५०,००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दिसून येते. यावरून वर्तमानकाळात शेतीवरील संकट किती गंभीर झालेले आहे, हे आपल्या लक्षात येते.

भारतात सन १९९५ पासून सातत्याने वाढत जाणाऱ्या शेतकरी आत्महत्यांची गंभीर दखल घेऊन काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी (UPA-United Progressive Alliance) सरकारने प्रसिद्ध कृषिशास्त्रज्ञ व भारतातील हरितक्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली दि. १८ नोव्हेंबर २००४ रोजी 'राष्ट्रीय शेतकरी आयोगाची'(National Commission on Farmer) स्थापना केली. या आयोगाने संपूर्ण देशभर दौरे करून भारतातील शेती व शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या व भारतातील शेती क्षेत्रातील अडचणी दूर करून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी अनुक्रमे डिसेंबर २००४, ऑगस्ट २००५, डिसेंबर २००५, एप्रिल २००६ व शेवटचा ऑक्टोबर २००६ असे एकूण ५ अहवाल (Reports) शासनाला सादर केले. या ५ अहवालांमध्ये स्वामीनाथन आयोगाने भारतीय शेती व शेतकऱ्यांची एकूण परिस्थिती सुधारण्यासाठी अत्यंत मौल्यवान शिफारशी केलेल्या आहेत. परंतु दुर्दैवाने काँग्रेस प्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने डॉ. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी पूर्णांशाने स्वीकारल्या नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या कायम राहिल्या. त्यातल्या अनेक शिफारशींपैकी एक अत्यंत महत्त्वाची शिफारस होती ती म्हणजे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी शेतमालाचा एकूण उत्पादन खर्च (C2)+५०% जास्त एवढा किमान हमी भाव (MSP-Minimum Support Price) द्यावा. ही शिफारस तत्कालीन सरकारने स्वीकारली नाही. त्यामुळे पुन्हा शेतकरी आत्महत्या वाढायला लागल्या. दरम्यान ७ एप्रिल ते १२ मे २०१४ या काळात १६व्या लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक झाली. या निवडणुकीचा १६ मे २०१४ रोजी निकाल घोषित झाला व भारतीय जनता पार्टी प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात २६ मे २०१४ रोजी सत्तेवर आले. मा. नरेंद्र मोदी सरकार केंद्रात सत्तेत येण्याच्या अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण होते ते म्हणजे त्यांनी देशभरातील शेतकऱ्यांना स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचे दिलेले आश्वासन हे होय. मा. नरेंद्र मोदी यांनी सन २०१४ च्या लोकसभा निवडणूक प्रचारात स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचे आश्वासन देताना त्यातील एका महत्त्वाच्या शिफारशीवर विशेषत्वाने भर दिला होता. ती शिफारस म्हणजे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला एकूण उत्पादन खर्च (C2) + ५० % जास्त एवढा किमान हमीभाव देणे ही होय. देशभरातील शेतकऱ्यांनी मा. नरेंद्र मोदींच्या या आश्वासनावर विश्वास ठेवून त्यांना भरभरून मतदान केल्याने भारतीय जनता पार्टी प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ५४३ पैकी तब्बल ३३६ (BJP-282) जागा मिळाल्या. सन २००९ च्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला केवळ १३८ (BJP-116) जागा मिळाल्या होत्या. तर सन २००९ मध्ये २४७ जागा (काँग्रेस २०६) मिळविणाऱ्या काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडीला सन २०१४ च्या निवडणुकीत केवळ ५९ (काँग्रेस-केवळ ४४) जागा मिळाल्या. आपल्या प्रश्नांचा विचार करणारे मा. नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेवर आल्याने देशभरातील शेतकऱ्यांना

आनंद झाला. परंतु त्यांचा हा आनंद अल्पजीवी ठरला. भारतीय जनता पार्टी प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यावर जेव्हा शेतमालाला श्री. नरेंद्र मोदी यांनी दिलेले आश्वासनाप्रमाणे C2 + ५० % जास्त एवढा किमान हमीभाव मिळाला नाही तेव्हा या संदर्भात केंद्र सरकार विरोधात सर्वोच्च न्यायालयात एक जनहित याचिका सादर करण्यात आली. त्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारणा केली असता २०१५ मध्ये तत्कालीन अर्थमंत्री श्री. अरुण जेटली यांनी केंद्र सरकारच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करून त्याद्वारे असे म्हटले गेले की, डॉ. स्वामीनाथन आयोगाद्वारे शिफारस केल्याप्रमाणे शेतकऱ्यांना शेतमालाला C2 + ५० % जास्त असा किमान हमीभाव देताच येत नाही. कारण असे केल्यास पूर्ण बाजार व्यवस्थेवर त्याचा विपरित परिणाम होईल असे सरकारद्वारे स्पष्ट करण्यात आले.

देशभरातील शेतमालाचा उत्पादनखर्च विचारात घेऊन 'कृषी खर्च व किंमत आयोग' (CACP- Commission for Agriculture Costs and Prices) काही प्रमुख खरीप व रब्बी पिकांच्या किमान हमी किमती देण्यासंबंधी केंद्र सरकारला शिफारस करतो. कृषी खर्च व किंमत आयोग ( यापुढे सीएसीपी) जो शेतमालाचा खर्च विचारात घेऊन किमान हमीभाव देण्यासंबंधी शिफारस करतो तो खर्च पुढीलप्रमाणे काढण्यात येतो.

(१) **A2 फार्म्युला** : या फार्म्युल्यानुसार शेतकरी शेतमालाचे उत्पादन घेण्यासाठी जो प्रत्यक्ष नगदी खर्च करतो. जसे-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, मजुरीवरील खर्च, इंधन खर्च, सिंचनावरील खर्च इत्यादी खर्चांचा समावेश होतो. सीएसीपी याच पद्धतीने खर्च काढून किमान हमीभाव देण्यासंबंधी शिफारस करते.

(२) **A2+FL फार्म्युला** : या फार्म्युल्यानुसार २ मधील सर्व खर्च तसेच शेतकऱ्याच्या कुटुंबातील सदस्यांनी शेतीत केलेल्या परिश्रमाचा मोबदला विचारात घेण्यात येतो. मात्र या पद्धतीने सीएसीपी किमान हमीभावाची शिफारस करीत नाही.

(३) **C2 फार्म्युला** : या फार्म्युल्यानुसार शेतमालाच्या उत्पादनखर्चात A2 मधील सर्व नगदी खर्च तसेच शेतकरी व त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी शेतीत केलेल्या परिश्रमाचा मोबदला (FL), शेतकऱ्याच्या शेतजमिनीचे भाडे आणि शेतकऱ्याने स्वतःचे भांडवल वापरले असल्यास त्यावरील व्याज इत्यादी खर्चांचा समावेश होतो. मात्र या पद्धतीने सीएसीपी शेतकऱ्यांच्या शेतमाल खरेदीसाठी किमान हमीभावाची शिफारस करीत नाही.

डॉ. स्वामीनाथन आयोगाने शेतमालाचा हमीभाव निश्चित करताना C2+५०% जास्त याप्रमाणे शेतकऱ्यांच्या शेतमालाला किमान हमीभाव द्यावा अशी शिफारस केलेली आहे. त्यामुळे वारंवार शेतकऱ्यांकडून स्वामीनाथन आयोगाच्या या शिफारशीनुसार किमान हमीभाव देण्याची मागणी होते. एकीकडे केंद्र सरकारच्यावतीने स्वामीनाथन आयोगाने सुचविलेल्या शिफारशीप्रमाणे शेतकऱ्यांच्या शेतमालाला किमान हमीभाव देता येत नाहीत, असे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात सादर करायचे व दुसरीकडे सन २०२२ पर्यंत देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न मात्र दुप्पट करण्याची घोषणा करायची व त्या पार्श्वभूमीवर भारतीय शेतीत आमूलाग्र बदल अत्यावश्यक असल्याचे सांगून नवीन कृषी कायदे आणायचे यातून केंद्र सरकारची चलाखी दिसून येते. सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करावयाचे झाल्यास नवीन कृषी कायदे कसे फायदेशीर

व ऐतिहासिक आहेत हे सातत्याने केंद्र सरकारकडून देशातील जनतेवर बिंबवले जात आहे. या पार्श्वभूमीवर हे नवीन कृषी कायदे नेमके कसे आहेत? या कायद्यांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न खरोखरच दुप्पट होईल की पुन्हा शेतकरी संकटात सापडेल? शेतमालाची किमान हमीभावाची योजना मोडकळीस येईल काय? तसेच नवीन कृषी कायद्यांमुळे शेतकरी आपली वडिलोपार्जित जमीन गमावून बसेल काय? इत्यादी प्रश्न जनसामान्यांच्या मनात निर्माण होत आहेत. या सर्व प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्याचा प्रामाणिक प्रयत्न प्रस्तुत लेखकाने केलेला आहे.

भारत सरकारने पारित केलेले तीन नवीन कृषी कायदे

१. शेतकरी उत्पादने, व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) अधिनियम २०२०.
२. शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) किंमत हमी आणि कृषी सेवा करार अधिनियम २०२०.
३. अत्यावश्यक वस्तू (संशोधन/दुरुस्ती) अधिनियम २०२०.

वरील तीन नवीन कृषी कायद्याची पार्श्वभूमी

साधारणपणे मार्च महिन्यापासून जगभरासह भारतालाही कोरोना - १९ च्या महामारीच्या संकटाने त्रस्त करायला सुरुवात केली. त्यामुळे कोरोना महामारीचा प्रसार रोखण्यासाठी भारत सरकारने सर्वप्रथम दि.२२ मार्च २०२० रोजी संपूर्ण देशभर जनता कर्फ्यूची घोषणा केली. लोकांनीही त्यास मनापासून प्रतिसाद दिला. त्यानंतर मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी ज्याप्रमाणे ८ नोव्हेंबर २०१६ रोजी रात्री ८.०० वाजता अचानक दूरदर्शनवर येऊन चलनातील ५०० रु. व १००० रु. किमतीच्या नोटा चलनातून रद्द केल्याची (नोटबंदीची) घोषणा केली व संपूर्ण जनजीवन विस्कळीत करून टाकले. त्याचप्रमाणे दिनांक २४ मार्च २०२० रोजी रात्री ८.०० वाजता केवळ ४ तासांची मुदत देऊन संपूर्ण देशात टाळेबंदीची (लॉकडाऊन) घोषणा करून पुन्हा संपूर्ण देशाचे जनजीवन विस्कळित करून टाकले. कोरोना महामारीचा प्रसार रोखण्यासाठी ही टाळेबंदी आवश्यकच होती. परंतु मुदत कमी मिळाल्यामुळे कोट्यावधी लोकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या हेही आपण अनुभवले. टाळेबंदीच्या काळात अर्थव्यवस्थेतील अनेक घटकांना / क्षेत्रांना फटका बसल्यामुळे त्यातून सावरण्यासाठी टाळेबंदीनंतर सुमारे दीड महिन्याने दि. १२ मे २०२० रोजी केंद्र सरकारने देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या १०% म्हणजे सुमारे २० लाख कोटी रुपयांचे मदत पॅकेज जाहीर केले. हे मदत पॅकेज जाहीर करताना मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी म्हणाले होते की, हे पॅकेज देशातील त्या सर्व शेतकरी व मजुरांसाठी आहे ज्यांनी महामारीच्या काळातही २४ तास देशवासीयांसाठी काम केले आहे. त्यानंतर देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पुढील पाच दिवस या पॅकेजचे विस्ताराने विश्लेषण केले. त्यांनी आपल्या विश्लेषणात सांगितले की, या पॅकेजमध्ये शेती क्षेत्रासाठी महत्त्वाची पावले उचलण्यात आलेली आहेत. उदा. पायाभूत सुविधा कोषाची स्थापना, जनावरांचे लसीकरण तसेच खाद्यवस्तूंची निर्मिती करणाऱ्या लघु उद्योगांसाठी मदत इत्यादी. याच पॅकेजच्या विश्लेषणा दरम्यान त्यांनी शेतीक्षेत्रातील तीन महत्त्वपूर्ण सुधारणांचीही घोषणा केली होती. या तीन सुधारणा म्हणजेच आजचे तीन नवीन कृषिकायदे होत. कृषी उत्पादनांच्या बाजारावरील सरकारी नियंत्रण हटविणे हाच उद्देश या तीन नवीन कृषी सुधारणांचा आहे, असेही त्यांनी म्हटले होते.

संपूर्ण देशातील लॉकडाऊनमुळे व कोरोना

महामारीच्या संकटामुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी सरकारने या नवीन कृषी सुधारणांची घोषणा करून पुन्हा त्यांना संकटात टाकल्याची भावना देशातील बहुतांश शेतकऱ्यांची झाली. केंद्र सरकारने देशात टाळेबंदी असताना कोणतीही चर्चा न करता दि.५ जून २०२० रोजी या तीन नवीन कृषी कायद्यासंबंधी वटहुकूम काढले. त्यासाठी संसदेच्या हिवाळी अधिवेशनापर्यंतही सरकार थांबू शकले नाही. घाईघाईत चर्चा न करता वरील कायद्यासंबंधी वटहुकूम काढण्यात आले. दि.१४ सप्टेंबर २०२० रोजी ही तीनही विधेयके लोकसभेत मंजुरीसाठी ठेवण्यात आलीत. लोकसभेत सरकारचे बहुमत असल्यामुळे ते विना अडथळा त्वरित मंजूर झाले. मात्र हे विधेयक मंजूर झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे दि.१७ सप्टेंबर २०२० रोजी भाजपाचा अतिशय जुना सहयोगी मित्र पक्ष अकाली दलाच्या नेत्या व केंद्रीय खाद्य पुरवठा मंत्री हरसिमरत कौर / बादल यांनी या कायद्यांविरोधात आपल्या पदाचा राजीनामा दिला. खऱ्या अर्थाने येथूनच या कायद्यांविरोधातील शेतकऱ्यांचा संघर्ष वाढण्यास सुरुवात झाली. दि.१९-२० सप्टेंबर २०२० रोजी ही विधेयके राज्यसभेत मंजुरीसाठी ठेवण्यात आलीत. तेथे विरोधकांनी या कायद्यांबाबत मत विभाजनाची मागणी केली. परंतु त्यांची मागणी फेटाळून आवाजी मतदानाने ही विधेयके अभूतपूर्व गोंधळाच्या परिस्थितीत विरोधकांची मते विचारात न घेता राज्यसभेतही मंजूर करून घेण्यात आली. त्यानंतर दि.२७ सप्टेंबर २०२० रोजी ह्या तीनही विधेयकांवर महामहीम राष्ट्रपतींची स्वाक्षरी होऊन त्यांचे कायद्यात रूपांतर झाले. त्यांची अंमलबजावणी मात्र पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दि. ५ जून २०२० पासून (वटहुकूम निघाल्याच्या तारखेपासून) करण्याचे ठरले.

**काय आहे या तीन नवीन कृषी कायद्यामध्ये?**

१. शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) अधिनियम २०२०: या कायद्याचा प्रमुख उद्देश कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC- Agricultural Produce Market Committee) च्या बाहेर शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची विक्री करण्याचे स्वातंत्र्य देणे हा होय. या नवीन कायद्यामुळे शेतकरी आपला शेतमाल एपीएमसीच्या बाहेर खाजगी व्यापाऱ्यांना जास्त किंमतीला विकून अधिक फायदा मिळवतील, असा सरकारचा दावा आहे. थोडक्यात, या कायद्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती व्यवस्थेला समांतर अशी पर्यायी व्यवस्था निर्माण झाली आहे.

**हा कायदा मंजूर करण्यामागे सरकारची भूमिका/ उद्देश**

१. शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाची योग्य किंमत मिळावी.
२. पीक विक्रीचा व्यवहार उघड व खरा - खरा व्हावा.
३. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जाचक अटींतून शेतकऱ्यांची सुटका व्हावी.
४. शेतकऱ्याला त्याचा शेतमाल त्याला हवे असणाऱ्याला विकता यावा.
५. शेतमाल बाजारांची दुसरी पर्यायी व्यवस्था निर्माण व्हावी.
६. शेतमाल खरेदीमध्ये स्पर्धा निर्माण व्हावी.
७. शेतकऱ्यांची मिळकत वाढावी.
८. शेतमालाचे व्यवहार होताना कृषी उत्पन्न बाजार समिती व राज्य सरकारे यांचा अडसर दूर व्हावा.
९. कोणतीही अडवणूक न होता शेतकऱ्यांना आपला शेतमाल कृषी उत्पन्न बाजार समिती सोडून आपल्या राज्यात सर्व ठिकाणी तसेच दुसऱ्या

राज्यात विकता यावा.

१०. शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची संगणकाद्वारे थेट विक्री करता यावी.

१९६०-७० च्या दशकात खासगी व्यापाऱ्यांकडून होणारे शेतकऱ्यांचे शोषण थांबविण्यासाठी व त्यांना त्यांच्या शेतमालास योग्य किंमत मिळण्यासाठी विविध राज्य सरकारांनी 'कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) कायदा' मंजूर केला होता. या कायद्यानुसार असे निश्चित करण्यात आले होते की, शेतकऱ्यांचा शेतमाल केवळ सरकारी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातच खुल्या बोली पद्धतीने विकला जाईल. व्यापारी व अडते / दलाल यांना परवाना (लायसन्स) देण्याचे काम बाजार समिती करते व या संपूर्ण व्यवस्थेचे नियमनही ती करते. बाजार समितीच्या आवारातच शेतकऱ्यांना विविध सुविधा पुरविल्या जातात. जसे-शेतमालाचे श्रेणीकरण (ग्रेडिंग), मापाई-तोलाई, शेतकऱ्यांच्या बैलांना बांधण्याची व चारापाण्याची व्यवस्था इत्यादी. सरकारला सार्वजनिक वितरण प्रणालीसाठी (PDS-Public Distribution Scheme) आवश्यक असणाऱ्या धान्याची खरेदी भारतीय खाद्यनिगम (FCI-Food Corporation of India) सरकारी बाजार समिती परिसरातच किमान समर्थन मूल्याद्वारे (MSP-Minimum Support Price) करीत असते. आता नवीन कायद्याद्वारे शेतकऱ्यांना बाजार समितीच्या परिसराबाहेरसुद्धा आपल्या शेतमाल विक्रीचे स्वातंत्र्य मिळणार आहे. तसेच शेतमाल खरेदी करण्यासाठी खासगी व्यापाऱ्यांना पूर्वीप्रमाणे बाजार समितीकडून परवाना (लायसन्स) प्राप्त करण्याची आवश्यकता नाही. केवळ पॅनकार्डच्या आधारावर व्यापाऱ्याला शेतमाल खरेदी करता येईल, अशी या कायद्यात तरतूद आहे. या नवीन कायद्यानुसार शेतकरी आपल्या शेताच्या बांधावर, खरेदी करणाऱ्या कंपनीच्या परिसरात, व्यापाऱ्यांच्या गोडाऊनच्या फाटकावर इत्यादी ठिकाणी शेतमालाची विक्री करू शकतो. तसेच तो ई-ट्रेडिंगद्वारे ऑनलाइनसुद्धा मालाची विक्री कुठेही करू शकतो. त्याचप्रमाणे या नवीन कायद्यानुसार शेतकऱ्याला आपला माल देशभरात कुठेही विकण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. विशेष म्हणजे सरकारी बाजार समिती बाहेर शेतमाल विक्रीवर कोणत्याही प्रकारच्या कराची आकारणी होणार नाही; तसेच अडत किंवा दलाली कापली जाणार नाही, अशी या कायद्यात तरतूद आहे. सध्या शेतकऱ्यांना बाजार समितीत शेतमाल विक्री केल्यास सुमारे ८% कर द्यावा लागतो. या नवीन कायद्यामुळे बाजार समित्या बंद होणार नसून त्यांचा केवळ एकाधिकार समाप्त होईल व कृषिमालाच्या व्यापारात वाढ होईल, असा सरकारचा दावा आहे.

या नवीन कृषी कायद्याचे समर्थन करताना असे म्हटले जात आहे की एरवी सरकारी बाजार समितीद्वारे खरेदीचा फायदा देशभरातील केवळ ६% शेतकऱ्यांना होतो. परंतु हा आकडा जुना असून सध्या गव्हाच्या सरकारी खरेदीचा देशभरातील १६% तर तांदळाच्या सरकारी खरेदीचा देशभरातील १४% शेतकऱ्यांना फायदा होतो. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हमीभावाने धान्य खरेदीचा फायदा केवळ पंजाब, हरियाणा व पश्चिम उत्तर प्रदेशच्या शेतकऱ्यांनाच होतो असे वारंवार सांगितले जाते. परंतु वास्तविक पाहता २००५ सालापासून केंद्र सरकारच्या धोरणानुसार देशातील तब्बल १५ राज्यांमध्ये शासनाने हमीभावाने धान्याची खरेदी सुरू केलेली आहे. त्यामुळे सन २००० साली पंजाब, हरियाणा व पश्चिम उत्तरप्रदेश या पारंपारिक धान्य खरेदी होणाऱ्या राज्यांच्या बाहेर हमीभावाने होणारी धान्याची खरेदी देशातील एकूण धान्य खरेदीच्या केवळ १०% होती, ती २०१३

सालापर्यंत ३५% पर्यंत वाढली आहे. ओरिसा व छत्तीसगड या दोन राज्यांतून देशातील एकूण तांदूळ खरेदीच्या तब्बल २०% तांदळाची हमीभावाने खरेदी होते. मध्यप्रदेशातून तर पंजाबपेक्षाही गव्हाची खरेदी जास्त होते. देशातील एकूण गहू खरेदीच्या तब्बल २०% गहू एकट्या मध्यप्रदेशातून हमीभावाने खरेदी करण्यात येतो (पहा-मिलिंद मुरुगकर यांचा लेख 'धादांत असत्य पुन्हा पुन्हा' लोकसत्ता दि.२०/१२/२०२०). यावरून आपणास हे लक्षात येते की, या कायद्याचा परिणाम केवळ पंजाब, हरियाणा व पश्चिम उत्तरप्रदेशातील शेतकऱ्यांवरच होणार नसून कमी-अधिक प्रमाणात देशातील सर्वच शेतकऱ्यांवर होणार आहे.

**या कायद्याचे संभाव्य दुष्परिणाम**

१. सरकारी बाजार समित्यांचे अस्तित्व कालांतराने संपुष्टात येईल.
२. शेतमालाचा बाजार ठरावीक मोठ्या उद्योगपतींच्या हातात एकवटल्या जाईल.
३. शेतकऱ्यांना बेभरवशाच्या बाजार व्यवस्थेवर सोपविल्या जाईल.
४. सध्याची बाजार समितीमार्फत सुरू असलेली किमान हमीभावाने शेतमाल खरेदीची व्यवस्था कालांतरांनी बंद होईल.
५. शेतकऱ्यांना बाजारपेठेच्या हवाली करून हमीभावाने शेतमालाची खरेदी करण्याच्या संकटातून सरकार स्वतःची सुटका करून घेईल.
६. भविष्यात भारतीय खाद्य निगमद्वारे सार्वजनिक वितरण प्रणालीसाठी आवश्यक धान्यसाठा बाजार समितीच्या परिसरातून हमीभावाने खरेदी करणे कायमचे बंद होईल. परिणामी, गरिबांसाठी सुरू असलेली सार्वजनिक वितरण व्यवस्था कोलमडेल व गरिबांची खाद्य सुरक्षा धोक्यात येईल.

वरील दुष्परिणाम संभवत असल्यामुळेच शेतकऱ्यांचा या कायद्यास विरोध आहे. सरकार बाजार समिती व्यवस्था कायम राहील, असे वारंवार सांगत आहे. परंतु खाजगीकरणाला वाव दिल्यामुळे अनेक सरकारी उद्योगांची कशी हानी झाली याचा अनुभव देशवासियांकडे आहे. उदा. दूरसंचार क्षेत्रात खाजगीकरणाला वाव दिल्यामुळे सरकारची सर्वात मोठी दूरसंचार कंपनी भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) बंद पडण्यात जमा आहे. अशीच अवस्था सरकारी बाजार समित्यांचीही होईल अशी शेतकऱ्यांना भीती आहे. तसेच किमान हमीभावासंदर्भात सरकार एकीकडे नवीन कायद्यात किमान हमीभाव व्यवस्था कायम राहील, असे वारंवार म्हणत आहे. परंतु त्यावर कायद्याचे बंधन आणू इच्छित नाही. सरकार म्हणत आहे की आम्ही शेतकऱ्यांना बाजार समितीत बांधून न ठेवता त्यांना शेतमाल विक्रीचे स्वातंत्र्य देत आहोत. परंतु शेतकऱ्यांसाठी हे घातक ठरत असल्याचे बिहारच्या उदाहरणावरून शेतकऱ्यांच्या लक्षात आले आहे. बिहार राज्यात सन २००६ मध्ये बाजार समिती कायदा रद्द करण्यात आला व शेतकऱ्यांना मोकळीक दिली. परंतु त्याचा फायदा शेतकऱ्यांऐवजी व्यापाऱ्यांनाच झाल्याचे दिसून येते. आज संपूर्ण देशात कमी दराने धान्याची खरेदी बिहारमध्ये होत असल्याचे आढळून आले आहे. तेथे खाजगी व्यापारी स्वस्त दरात धान्य खरेदी करून पंजाब, हरियाणामध्ये हमीभावाने विकताना दिसत आहे. सरकार म्हणते की, बाजारात स्पर्धा वाढल्याने शेतकऱ्यांना अधिक किंमत मिळेल. परंतु अनुभव असा आहे की, खाजगी व्यापारी आपापसात स्पर्धा न करता आपले संघ (कार्टेल) बनवतात व भाव पाडून शेतमालाची खरेदी करतात. याच कारणामुळे बिहार हे देशातील एक कमी कृषी उत्पन्न असलेले राज्य ठरले आहे. सन

२००६ पासून बिहारमध्ये बाजार समित्या संपल्यानंतरही तिथल्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत वाढ न होता उलट त्यांची आर्थिक स्थिती खराब झाल्याचे दिसून येते.

या कायद्याच्या अनुषंगाने सरकार म्हणते की, शेतकरी आपला शेतमाल देशभरात कुठेही विकू शकेल. परंतु वास्तविकता ही आहे की आपल्या देशात सुमारे ८५% शेतकरी अल्पभूधारक आहेत. त्यांच्याकडे २ हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे. त्यापैकी ५०% शेतकरी तर असे आहेत की त्यांच्याकडे एक हेक्टरपेक्षाही कमी जमीन आहे. एवढ्या लहान शेतकरी देशभरात आपला माल कसा विकू शकेल? त्यांना दूरच्या ठिकाणी माल विक्रीचा वाहतूक खर्च परवडणार आहे का? त्यामुळे अशा लहान शेतकऱ्यांसाठी हा कायदा कुचकामी ठरतो.

दुसरे म्हणजे हा कायदा मंजूर करून केंद्र सरकारने राज्य सरकारांच्या अधिकारांचे हनन केले आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. कारण जुना बाजार समिती कायदा हा प्रत्येक राज्याच्या विधानसभेत ठराव करून मंजूर करण्यात आलेला आहे. नवीन कायद्यामुळे पूर्वीचा एपीएमसी कायदा रद्द केल्यासारखे आहे. केंद्र सरकारने मात्र जुना कायदा रद्द करून नवीन कायदा करताना राज्य सरकारांचे मतही विचारात घेतलेले नाही. त्यामुळे एक प्रकारे हा कायदा मंजूर करून केंद्र सरकारने राज्य सरकारांच्या अधिकारांवर अतिक्रमण केले आहे. नवीन कायदा आल्यामुळे राज्य सरकारांना बाजार समिती पासून मिळणाऱ्या सेस रूपी उत्पन्नावरही पाणी सोडावे लागणार आहे. याचा सर्वाधिक फटका पंजाब-हरियाणा राज्यांना बसणार आहे. कारण देशात सर्वाधिक बाजार समित्या या दोन राज्यांमध्ये आहेत. तसेच तुलनेने किमान हमीभावाने धान्य खरेदीचा फायदाही या दोन राज्यांनाच अधिक होतो. म्हणूनच या दोन राज्यांचा प्रखर विरोध या कायद्यास दिसून येत आहे. महत्त्वाचे म्हणजे शेतकऱ्यांचा शेतमाल कृषी उत्पन्न बाजार समितीद्वारे खरेदी केल्यास त्यांना आपल्या मालाचे पैसे मिळण्याची पूर्ण शाश्वती असते. नवीन कायद्यात मात्र शेतकऱ्याला खाजगी व्यापाऱ्यांकडून त्याच्या मालाचे पैसे मिळण्यासंबंधी कोणतीही हमी दिसत नाही. कारण त्या व्यापाऱ्यावर कोणतेही नियंत्रण या नवीन कायद्यानुसार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता अधिक वाटते.

**यावर उपाय काय?**

१. शेतकऱ्यांच्या माथी आणखी एक नवीन कायदा मारण्यापेक्षा पूर्वीच्या कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यातील कमतरता किंवा दोष दूर करणे आवश्यक आहे. उदा. बाजार समितीत अडते किंवा दलालांकडून शेतकऱ्यांचे जे शोषण होते त्यावर कडक नियंत्रण आणणे. तसेच आज देशभरात बाजार समित्यांची संख्या केवळ ७००० एवढी आहे जी आजच्या परिस्थितीचा विचार करता अत्यंत कमी आहे. ही संख्या वाढवून ती दर ५ कि.मी. त्रिज्येवर एक याप्रमाणे ४२००० एवढी करण्याची आवश्यकता या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. ही संख्या त्वरित वाढवावी म्हणजे शेतकऱ्यांवर आपला शेतमाल विकण्यासाठी बाजार समितीत २-३ दिवस थंडी पावसात ताटकळत बसण्याची वेळ येणार नाही.

२. सध्याच्या कायद्यानुसार केंद्र सरकारकडून एकूण २३ पिकांचे किमान हमीभाव जाहीर करण्यात येतात. ज्यात ७ प्रकारचे अन्नधान्य (धान, गहू, जऊ (बारली), ज्वारी, बाजरी, मका व नाचणी), ५ प्रकारच्या डाळी (चना, तूर, मूग, उडीद व मसूर), ७ प्रकारचे तेलवाण (भुईमूग, मोहरी, सोयाबीन, सूर्यफूल बी, तीळ, केशर बी व नायजर बी) व

४ प्रकारच्या नगदी पिकांचा (कच्चे कापूस, कच्चे ज्यूट, ऊस आणि सुके खोबरे) समावेश होतो. परंतु यापैकी साधारणपणे धान, गहू, ऊस, मका, सोयाबीन इत्यादी पिकांचीच हमीभावाने खरेदी सरकारकडून होते. अन्य पिकांची सरकारकडून सहसा खरेदी होत नाही. त्यासाठी शासनाने किमान हमीभावाचा कायदा करून त्यापेक्षा कमी भावाने शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या २३ शेतमालांची खरेदी होणार नाही यासंबंधी कडक नियंत्रण आणावे.

३. शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) किंमत हमी आणि कृषी सेवा करार अधिनियम २०२०: हा कायदा करार शेती (कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग) संबंधातला आहे. या कायद्यानुसार शेतकऱ्यांना आपली शेती दुसऱ्याला कराराने देता येणार आहे.

**करार शेती कायद्यामागची सरकारची भूमिका / उद्देश**

१. शेतकऱ्यांची शेती इतरांना कराराने करता यावी.
२. शेतीसोबत शेती पिकांवर आधारित उद्योग करता यावे.
३. शेतीपूरक उद्योगांबरोबर शेतकरी थेट जोडला जावा.
४. पीक तयार झाल्यावर येणारा तोटा / नुकसान कमी करता यावा.
५. शेतीमालावर प्रक्रिया करून तो परदेशी पाठविता यावा व त्याद्वारे परकीय चलन प्राप्त करता यावे.
६. शेतमाल खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या वाढत्या मागण्या व अपेक्षा पूर्ण करणे.
७. शेती क्षेत्रात मोठ्या उद्योजकांनी भांडवल गुंतवावे.
८. दर्जेदार शेतमाल तयार करून तो परदेशात विकता यावा.
९. लहान - लहान तुकड्यांच्या शेतीऐवजी सलग शेती करता यावी.
१०. नैसर्गिक संकट व लहरी हवामानाला शेतकऱ्यांना तोंड देता यावे.
११. किती पिकेल व काय भावाने विकेल या चिंतेतून शेतकऱ्यांची सुटका करणे.
१२. शेती क्षेत्रातून देशाची आर्थिक प्रगती व्हावी.
१३. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी.

**या कायद्याचे स्वरूप कसे आहे?**

शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) किंमत हमी आणि कृषी सेवा करार अधिनियम २०२० हा कायदा करार शेती संदर्भातील आहे. या कायद्यानुसार कंपनी, उद्योजक, व्यापारी व इतर कोणीही शेतकऱ्यांसोबत करार शेती संदर्भात करार करू शकतो. या कायद्यानुसार करार शेतकऱ्यांच्या शेतीचा नसून केवळ शेतकऱ्याच्या पिकाचा असणार आहे. करार शेती कायद्यानुसार कोणत्या पिकाचे कोणते वाण वापरावयाचे यासंबंधी शेतकऱ्याला आधीच कल्पना दिली जाणार आहे. करार करणारी कंपनी किंवा उद्योजक व शेतकरी या दोघांचे एकमत झाल्यासच करार अस्तित्वात येणार आहे. कॉन्ट्रॅक्टमध्ये शेती खर्चाचे विवरण व इतर खर्चाचे विवरण नमूद असेल. या कायद्यानुसार करार शेती करताना शेतकऱ्यांना अनेक सवलती देण्यात आलेल्या आहेत. उदा.शेतमाल विक्रीच्या वेळी आधी केलेल्या करारापेक्षा शेतमालाचा बाजारभाव जास्त असल्यास त्याचा वाढीव हिस्सा शेतकऱ्यांना मिळण्याची तरतूद या कायद्यात आहे. तसेच शेतकऱ्यांना करार केलेल्या कालावधीत या करारातून कधीही बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. महत्त्वाचे म्हणजे करार शेतीत कंपनी व शेतकरी यांच्यात काही वाद निर्माण झाल्यास हा वाद सर्वप्रथम मध्यस्थांच्या मार्फत सोडविता येणार आहे. त्यासाठी मध्यस्थांचे एक मंडळ असेल. या मंडळात शेतकरी व कंपनी दोघांचेही प्रतिनिधी असतील. तसेच शेती

उत्पादन संस्था (FPO-Farmers Producer Organization) व पुरवठादार मध्यस्थ म्हणून काम करू शकतील. या मध्यस्थ मंडळाने आपला निकाल ३० दिवसांच्या आत द्यावयाचा आहे. मध्यस्थ मंडळाद्वारे विवादाचे समाधान न झाल्यास उपविभागीय अधिकाऱ्यांकडे (प्रांत साहेब) तक्रार करता येईल. उपविभागीय अधिकाऱ्यांनी दोघांचेही म्हणणे ऐकून ३० दिवसांच्या आत निकाल द्यावयाचा आहे. जर उपविभागीय अधिकाऱ्यांचा निकाल मान्य नसल्यास मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील करण्याची सोय या कायद्यात आहे. मा. जिल्हाधिकाऱ्यांचा निकाल मान्य नसल्यास गावच्या किंवा जिल्हा पातळीवरील न्यायालयात न्याय मागण्याची सोय या कायद्यात नाही. सरळ मा. उच्च न्यायालय व त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयात जाता येईल. स्वाभाविकपणे शेतकरी वकिलाअभावी आपली बाजू न्यायालयात समर्थपणे मांडू शकतील असे वाटत नाही. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेतूनही शेतकऱ्यांना न्याय मिळण्याची शक्यता अत्यंत कमी आहे.

जगभरात कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगचे प्रयोग फसले असताना एकूण शेतकऱ्यांपैकी सुमारे ८५% अल्पभूधारक शेतकरी असलेल्या आपल्या भारतात करार शेतीचा प्रयोग यशस्वी होईल का हा प्रश्न आहे. कारण कागदोपत्री एका रात्रीत तयार होणाऱ्या बोगस कंपन्यांना करार शेतीपासून दूर ठेवण्याची तरतूद या कायद्यात आढळत नाही. दुसरे म्हणजे करार शेतीत शेतकऱ्यांचे पूर्णतः हित जपले जाईल व शेतकऱ्यांवर दबावतंत्राचा वापर होणार नाही याबाबत या कायद्यात स्पष्टता आढळत नाही. करार शेती कायद्यात शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेल्या किमान हमीभावाने माल खरेदीचे आश्वासन नसून आजूबाजूच्या सरकारी तसेच खाजगी बाजार समितीत जे भाव असतील त्याच्या समतुल्य भाव देण्याची तरतूद असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालासाठी शासकीय दराप्रमाणे किमान आम्ही भाव मिळेल याची तरतूद नाही. करार शेतीला कायद्याचे स्वरूप मिळाल्यानंतर केवळ करार शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचीच शेती नाही तर संपूर्ण शेतीक्षेत्र प्रभावित होणार आहे. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे गुजरातमध्ये पेप्सिको कंपनी सोबत काही शेतकऱ्यांनी करार शेतीच्या माध्यमाने बटाट्याचे उत्पादन घेतले. त्या बटाट्याद्वारे पेप्सिको कंपनी चिप्स बनविते. कंपनीने ज्या शेतकऱ्यांशी करार केला त्यांना बटाटे लागवडीसाठी बटाट्याचे विशिष्ट स्वरूपाचे वाण पुरविले होते. ज्या शेतकऱ्यांनी कंपनीसोबत करार केला नाही अशा शेतकऱ्यांनीसुद्धा त्याच वाणाची लागवड केली असता अशा शेतकऱ्यांवर नुकसानभरपाईचा दावा कंपनीने ठोकला. याचा अर्थ करार शेती करणाऱ्या कंपनीचा विशिष्ट बियाण्यावर सुद्धा मालकी हक्क प्रस्थापित होऊन त्याचा वापर कंपनीच्या परवानगीशिवाय इतर शेतकऱ्यांना करता येत नाही. म्हणजेच भविष्यात शेतकरी आपल्या शेतीत कोणते बियाणे वापरायचे याचेही स्वातंत्र्य गमावून बसणार आहे.

दुसरे म्हणजे करार शेतीच्या माध्यमातून वर्तमानकालीन संरचना धोक्यात येण्याची शक्यता जास्त आहे. ज्या वस्तूंची देशात व विदेशात मागणी जास्त आहे अशाच शेतीमालाचे उत्पादन करार शेतीद्वारे घेतले जाईल. कारण करार शेतीचे स्वरूप पूर्णतः व्यावसायिक असणार आहे. सध्या आपल्या देशातील शेतकरी आपली शेती व्यवसाय म्हणून न करता उदरनिर्वाहासाठीच करतात. त्यामुळे पीक घेण्याचे शेतकऱ्यांचे स्वातंत्र्यसुद्धा हिरावले जाण्याची दाट शक्यता आहे. ज्याप्रमाणे ब्रिटिश राजवटीत बिहारच्या शेतकऱ्यांना आपल्या इच्छेविरुद्ध नीळची शेती करावी

लागत होती त्याचप्रमाणे स्वतंत्र भारतातही कंपन्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या इच्छेविरुद्ध ज्या पिकांची जगभरात मागणी असेल अशाच पिकांची लागवड केली जाईल व वर्तमानकालीन पीक विविधता धोक्यात येईल, अशी भीती तज्ज्ञांना वाटते. ब्रिटिशांच्या धोरणाविरुद्ध नीळ शेतीच्या बाबतीत १९१७ मध्ये म. गांधींना बिहारमधील चंपारण येथे आंदोलन करावे लागले होते हे आपणास माहीत आहेच.

**शेतकऱ्यांना या करार शेतीच्या कायद्याबाबत भीती का आहे?**

या कायद्यानुसार शेतकऱ्यांशी कंपनी केवळ शेतमाल पिकविण्याचा करार करणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची जमीन कंपनी हडप करेल ही शेतकऱ्यांची भीती अनाठायी आहे असे सरकार वारंवार म्हणत आहे. परंतु पिकाचा जरी करार असला तरी कराराने केलेल्या शेतीवर कंपनी बँकेकडून कर्ज घेऊ शकणार असल्यामुळे बँकेचे कर्ज कंपनीने बुडविल्यास शेतकऱ्यांची शेती धोक्यात येऊ शकते. दुसरे म्हणजे कंपनी एका पिकासाठी किंवा जास्तीत जास्त ५ वर्षासाठी करार करू शकणार आहे. एक दिवसानंतर पुन्हा पाच वर्षांसाठी नव्याने करार करता येणार आहे. जरी कंपनीने पाच वर्षासाठी करार केला असेल परंतु या ५ वर्षात कंपनी नफा मिळविण्यासाठी रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके यांचा भरमसाठ वापर करेल. त्यामुळे शेतीची सुपीकता धोक्यात येऊन भविष्यात शेती नापीक बनण्याची शक्यता अधिक आहे. मग अशी नापीक जमीन शेतकऱ्यांकडे असून नसल्यासारखी असेल.

दुसरे म्हणजे कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगमध्ये तुकड्या तुकड्यांच्या शेतीऐवजी सलग शेती करणे अपेक्षित आहे. त्यामुळे ज्या लगतच्या शेतकऱ्यांची जमीन कंत्राटी शेतीसाठी घेतली जाईल त्या जमिनीवरील बांध संपुष्टात आणले जातील. कागदोपत्री शेतकऱ्यांची जमीन त्यांच्या नावानेच राहील मात्र प्रत्यक्षात त्याला आपले शेत ओळखता येणार नाही. कंपनीने करार संपल्यानंतर ही जमीन पूर्ववत न केल्यास व करार संपल्याबरोबर जमिनीतून काढता पाय घेतल्यास शेतकऱ्यांमध्ये जमिनीवरून वाद निर्माण होतील. विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतात कंपनीने बांधकाम केल्यास करार संपल्यावर ते बांधकाम पाडून जमीन पूर्ववत करून देण्याची जबाबदारी कंपनीची असणार आहे. परंतु कंपनीने जमिनीतून काढता पाय घेतल्यास त्या अनुपयुक्त बांधकामाचे शेतकरी काय करणार? तसेच असे बांधकाम पाडून जमीन पूर्ववत करण्याचा खर्च शेतकऱ्याला करावा लागेल.

**कसा असेल करार?**

सामान्यपणे या कायद्यानुसार तीन प्रकारे करार करता येऊ शकणार आहे. ते पुढीलप्रमाणे :

**१. पहिल्या प्रकारचा करार :** या करारानुसार शेतकरी आपले शेत स्वतः कसेल. शेतीसाठी आवश्यक असणारा खर्च उदा. बी -बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके, मजुरांची मजुरी इत्यादी खर्च शेतकरी स्वतः करेल व पीक आल्यावर करारात ठरल्याप्रमाणे मालाचा दर्जा असल्यास पूर्वी ठरल्याप्रमाणे विशिष्ट किंमतीला तो कंपनीला आपला शेतमाल विकेल. कंपनीने शेतकऱ्यांचा शेतमाल शेतकऱ्यांच्या शेतातून उचलायचा की शेतकऱ्याने कंपनीत नेऊन द्यायचा हे आधीच करारात ठरेल व त्याप्रमाणे व्यवहार होईल. या माल विक्रीच्या व्यवहारात कोणीही दलाल /अडते असणार नाही. त्यामुळे दलालास दलाली तसेच शासनाला कर द्यावा लागणार नाही. एका हाताने शेतकरी कंपनीला माल देईल व दुसऱ्या हाताने कंपनीकडून मालाचे पैसे घेईल असे या कराराचे स्वरूप आहे.

**२. दुसऱ्या प्रकारचा करार :** या करारानुसार

शेती शेतकऱ्याची राहील व पीक घेण्यासाठी लागणारा सर्व खर्च उदा बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके, पीक कापणी, पीक काढणी इत्यादी सर्व खर्च कंपनी करेल. शेतमजूरसुद्धा कंपनीच पुरवेल व त्यांची मजुरीही कंपनीच देईल. या करारानुसार पीक किती येईल याचा धोका कंपनी आपल्या अंगावर घेईल. शेतकऱ्याने जर आपल्या शेतात काही सेवा दिली असेल उदा. ट्रॅक्टरचा ड्रायव्हर म्हणून किंवा इतर कामासाठी मजूर म्हणून तर करारात ठरल्याप्रमाणे शेतकऱ्याला त्याचा मेहनताना वेगळा मिळेल. कंपनी शेतकऱ्याला पिकाची किंमत एकमुठी देईल किंवा काही रक्कम पीक निघण्यापूर्वी शेतकऱ्याला अंगावर देईल व शेवटी ती रक्कम कपात करून शेतकऱ्याला त्याच्या पिकाची उर्वरित रक्कम नगदी देईल. या करारानुसार शेतकरी आपल्या मर्जीने आपल्या शेतात पीक घेऊ शकणार नाही तर कंपनी ठरवेल त्या पिकाची लागवड होईल. म्हणजेच या करारात शेतकऱ्याचे पीक घेण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यात येणार आहे. कंपनी पीक लागवडीसाठी तिने पुरविलेल्या बी-बियाणे, खते, कीटकनाशके इत्यादींच्या भरमसाठ किंमती लावून उत्पादन खर्च वाढवून दाखविण्याची शक्यता आहे. त्यामुळे पीक लागवडीचा खर्च वजा जाता शेतकऱ्याच्या हातात पिकाची प्रत्यक्ष रक्कम अत्यंत कमी पडू शकते.

**३. तिसऱ्या प्रकारचा करार :** या करारात काही भाग पहिल्या कराराचा व काही भाग दुसऱ्या कराराचा असेल. कंपनी व शेतकरी या दोघांच्या संमतीने पहिल्या व दुसऱ्या प्रकारच्या करारातील बाबी तिसऱ्या करारात समाविष्ट करून हा करार केला जाईल.

वरील सर्व करार हे लेखी स्वरूपाचे असतील. तसेच या करारात शेतकरी व कंपनी या दोघांव्यतिरिक्त रासायनिक खते पुरविणारा, मजूर पुरविणारा, बियाणे पुरविणारा, बँक तसेच विमा कंपनी यांनाही या कराराशी जोडण्याची तरतूद या कायद्यात आहे. यासंदर्भात एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगमधून तयार होणाऱ्या शेतमालाला सरकार किमान हमीभावाने खरेदी करणार नाही. करारात ठरल्याप्रमाणे शेतमालाची खरेदी विशिष्ट किंमतीने कंपनीनेच करावयाची आहे. यात शासनाचा काहीच संबंध राहणार नाही.

**होणार काय?**

कंत्राटी शेतीचे प्रमाण वाढल्यास कंपनीसोबत माल विक्रीचा करार झाल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीत माल विक्रीचा मार्ग बंद होऊन हळूहळू कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्य कमी होत जाऊन ती कालांतराने बंद पडेल. परिणामी, सार्वजनिक वितरण प्रणालीसाठी आज ज्याप्रमाणे भारतीय खाद्य निगम (FCI- Food Corporation of India) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात धान्य खरेदी करते तशी शासकीय किमान हमीभावाने धान्य खरेदी होणार नाही. यापुढे रेशनद्वारे गरिबांना देण्यात येणारे धान्य वाटप करावयाचे नसून त्याचे पैसे त्यांच्या खात्यात जमा करावयाची सरकारची योजना आहे. त्यामुळे भारतीय खाद्य निगमला शासकीय किमान हमीभावाने धान्य खरेदी करण्याची आवश्यकताच पडणार नाही. परिणामी, शेतमाल किमान हमीभाव देऊन खरेदी करण्याच्या झंझटीतून सरकारची कायमस्वरूपी सुटका होईल. सरकारला हेच पाहिजे आहे. थोडक्यात, करार शेतीचा कायदा हा कृषी उत्पन्न बाजार समितीची व्यवस्था व किमान हमीभावाची व्यवस्था कायमस्वरूपी बंद करणारा कायदा आहे असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे.

**३. अत्यावश्यक वस्तू (संशोधन) कायदा २०२०:** हा कायदा कृषी मालाची साठवणूक करण्यासंदर्भातला आहे. या नवीन कायद्यानुसार

शेतमालाची साठवणूक करण्याच्या बाबतीत कोणतीही मर्यादा असणार नाही. त्यामुळे उद्योजकांना या कायद्याच्या आधाराने कृषी व्यवसायात थेट प्रवेश मिळेल. वास्तविक पाहता अत्यावश्यक वस्तू कायदा जेव्हा १९५५ मध्ये लागू करण्यात आला होता, त्यापाठीमागे उपभोक्त्यांना वाजवी किंमतीला आवश्यक वस्तूंची उपलब्धता करून देणे हा उद्देश होता. १९५५च्या अत्यावश्यक वस्तू कायद्यानुसार आवश्यक वस्तूंचे उत्पादन, किंमत व वितरणावर सरकारी नियंत्रण आणले गेले. नफेखोर व्यापाऱ्यांकडून उपभोक्त्याचे शोषण होऊ नये, असा त्यापाठीमागे उद्देश होता. आवश्यक वस्तूंच्या यादीत अन्नधान्य, खते, औषधी, पेट्रोलियम पदार्थ, ज्यूट, डाळी, खाद्यतेल, बटाटे, कांदे इत्यादी वस्तूंचा समावेश करण्यात आलेला होता. नवीन अत्यावश्यक वस्तू (संशोधन) कायदा दिनांक १५ सप्टेंबर २०२० रोजी लोकसभेत तर २० सप्टेंबर २०२० रोजी राज्यसभेत मंजूर होऊन २७ सप्टेंबर २०२० रोजी त्यावर महामहीम राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली व तो पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच ५ जून २०२० पासून संपूर्ण देशात लागू करण्यात आला आहे.

**हा कायदा मंजूर करण्यामागे सरकारची भूमिका /उद्देश**

१. शेतमाल साठविणे, एका ठिकाणाहून दुसरीकडे पाठविणे तसेच शेतमाल किमतीवरील जाचक बंधने हटविणे.
२. गोदामे, शीतगृहे, शेतमाल प्रक्रिया उद्योग, शेतमाल परदेशी निर्यात करणे यांत खाजगी गुंतवणूक आकर्षित करणे.
३. शेतमालाची नवीन पुरवठा साखळी तयार करणे.
४. नवीन रोजगार निर्माण करणे.
५. अधिक कालावधीसाठी शेतमाल साठवून त्यास जास्त किंमत मिळावी.

वरील उद्देश दृष्टीसमोर ठेवून प्रस्तुत कायदा मंजूर करण्यात आलेला आहे. ज्या वस्तू (उदा.अन्नधान्य, डाळी, खाद्यतेल, कांदे व बटाटे) अत्यावश्यक वस्तूंच्या यादीतून वगळण्यात आलेल्या आहेत म्हणजेच ज्या वस्तूंच्या साठवणुकीवरील मर्यादा संपुष्टात आणली गेली आहे त्या वस्तूंच्या साठवणुकीवर सरकार केवळ नैसर्गिक आपत्ती किंवा युद्धासारख्या अभूतपूर्व परिस्थितीतच पुन्हा बंदी लादू शकेल अशी या कायद्यात तरतूद करण्यात आली आहे. शेतकरी आपला शेतमाल देशभरात कुठेही विकून जास्त किंमत प्राप्त करू शकतो असे या कायद्याचे समर्थन करताना सरकार म्हणत आहे. तसेच या कायद्यानुसार वरील अत्यावश्यक वस्तूंच्या साठवणुकीवरील मर्यादा हटविल्यामुळे माल साठवणुकीची क्षमता वाढेल व या क्षेत्राकडे खासगी गुंतवणूकदार आकर्षित होतील असा सरकारचा दावा आहे.

**या कायद्याची भीती का?**

खाजगी उद्योजक व व्यापारी हे शेतमालाचा मोठा साठा करून नफेखोरीसाठी या कायद्याचा दुरुपयोग करू शकतात. तसेच कमी भावात शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करायचा व भरमसाठ साठेबाजी करून नफेखोरीसाठी बाजारात शेतमालाचा कृत्रिम तुटवडा निर्माण करायचा असे व्यापारी व उद्योजकांनी ठरविले तर यावर नियंत्रण कसे आणायचे याची स्पष्टता या नवीन अत्यावश्यक वस्तू (संशोधन) कायद्यात दिसत नाही. ही एक मोठी उणीव या कायद्यात दिसून येते. त्यामुळे अत्यावश्यक वस्तूंची साठेबाजी होऊन बाजारात अन्नधान्य, खाद्यतेल, डाळी, कांदे, बटाटे इत्यादी वस्तूंच्या किंमती भरमसाठ वाढतील अशी या कायद्यासंबंधी सर्वसामान्यांना भीती वाटत आहे.

थोडक्यात, या तीनही कायद्यांच्या विरोधात देशभरातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. या तीन नवीन कृषी कायद्यांमुळे भारतीय शेती क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून येणार आहे. भारतातील संपूर्ण शेती क्षेत्र महाकाय अशा कार्पोरेट कंपन्यांच्या ताब्यात जाईल अशी भीती शेतकरी संघटनांकडून या कायद्यांसंदर्भात वर्तविली जात आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांवर अन्याय करणारे हे तीनही कायदे विनाविलंब रद्द करावेत या मागणीसाठी दि.२६ नोव्हेंबर २०२० पासून दिल्लीच्या सिंघू बॉर्डरवर पंजाब व हरियाणाचे हजारो शेतकरी कडाक्याच्या थंडीतही आंदोलनासाठी बसले. त्यांना देशभरातील शेतकऱ्यांचा या आंदोलनासाठी पाठिंबा मिळत आहे. सरकार मात्र नवीन कृषी कायदे शेतकऱ्यांच्या हिताचे असून ते मागे घेतले जाणार नाही या भूमिकेवर ठाम असल्याने विविध शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी व सरकारचे प्रतिनिधी यांच्यात या आंदोलना बाबतीत दि.२० जानेवारी २०२१ पर्यंत तब्बल १० बैठका होऊनही तोडगा निघालेला नाही. या आंदोलनात देशभरातील छोट्या-मोठ्या सुमारे ५०० शेतकरी संघटना सहभागी आहेत. या आंदोलनात केवळ पंजाब व हरियाणा या दोनच राज्यांचे शेतकरी आहेत असे सरकारकडून भासविले जात आहे. यासंदर्भात वास्तविकता ही आहे की, या आंदोलनात केवळ या दोन राज्यांचेच शेतकरी सहभागी नसून संपूर्ण देशातून या आंदोलनास शेतकऱ्यांचा पाठिंबा मिळत आहे. पंजाब-हरियाणाच्या शेतकऱ्यांना केवळ दिल्लीचे अंतर जवळ पडत असल्याने त्यांची संख्या जास्त दिसून येते. अन्यथा, अन्य राज्यातूनही कमी-अधिक प्रमाणात शेतकरी या आंदोलनात सहभागी झालेले आहेत. दुसरे म्हणजे पंजाब-हरियाणा या दोनच राज्यांत देशात सर्वात जास्त बाजार समित्यांची संख्या असून या दोन राज्यांतून धान व गव्हाची शासकीय हमीभावाने मोठ्या प्रमाणात खरेदी होते. त्यामुळे त्या शेतकऱ्यांनी हे आंदोलन अतिशय गांभीर्याने चालविले आहे. कारण नवीन कृषी कायदे लागू झाल्यास सर्वाधिक फटका या दोन राज्यांतील शेतकऱ्यांनाच बसणार आहे. शेतकरी दि. २६ नोव्हेंबर २०२० पासून ६ अंश डिग्रीच्या तापमानात अतिशय थंडीत शांतीपूर्ण पद्धतीने आंदोलनाला बसले असता शासनाने या शेतकऱ्यांवर थंड पाण्याचे फवारे मारले. तसेच अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. तरीही शेतकरी मागे हटले नाहीत. या आंदोलनास दि.२६ जानेवारी २०२१ रोजी दोन महिन्यांचा कालावधी उलटला असून या काळात आंदोलनस्थळी तब्बल १५६ शेतकऱ्यांनी आपले प्राण गमावले आहे. मृत झालेल्या शेतकऱ्यांमध्ये अनेक वृद्ध शेतकऱ्यांचा समावेश आहे. तरीसुद्धा शासनाला हे आंदोलन थांबविता आलेले नाही. उलट सरकार हे तीनही कायदे लागू करण्यावर ठाम राहिले. त्यामुळे शेतकऱ्यांनी हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार केला असून त्याचाच एक भाग म्हणून दि.२६ जानेवारी २०२१ रोजी प्रजासत्ताक दिनी दिल्ली येथे ट्रॅक्टर रॅलीचे आयोजन शेतकऱ्यांनी केली आहे. या ट्रॅक्टर रॅलीत ३ लाख ट्रॅक्टर व प्रत्येक ट्रॅक्टरमध्ये ५ शेतकरी याप्रमाणे एकूण १५ लाख शेतकरी सहभागी होणार आहेत. सरकारी जरी वारंवार म्हणत असले की हे तीनही नवीन कृषी कायदे शेतकऱ्यांच्या हिताचेच आहेत तरी शेतकऱ्यांचा या कायद्यांना असलेला तीव्र विरोध व त्यासाठी त्यांनी दोन महिन्यांपासून सुरू केलेल्या आंदोलनाचा विचार करता शेतकऱ्यांना नको असलेले हे कायदे त्वरित रद्द करावेत अशी सर्वसामान्य भारतीयांची अपेक्षा असल्याचे दिसून येते.

**संदर्भ सूची**

१. ॲड. उल्हास देसाई, ॲड. मुकुंद ननवरे व ॲड.

विठ्ठल कुलकर्णी यांचा लेख- शेतीसाठी तीन नवे कायदे.

२. कृषी संवादिनी २००५- डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला.
३. जया मेहता, अर्थशास्त्री, इंदोर, मध्यप्रदेश - तीन नए कृषी कानूनों का एक विश्लेषण.
४. म. जोतिराव फुले - गुलामगिरी, सुधीर प्रकाशन, वर्धा, ऑक्टोबर २००३.
५. म. जोतिराव फुले- शेतकऱ्याचा असूड आणि इशारा, राजेश प्रकाशन, पुणे.
६. मिलिंद मुरुगकर यांचा लेख - धादांत असत्य पुन्हा पुन्हा, दै. लोकसत्ता, दि. २० डिसेंबर २०२०.
७. विक्रांत सिंह, संस्थापक एवम् अध्यक्ष, फायनान्स अँड इकॉनॉमिक्स थिंक कौन्सिल, काशी हिंदू विश्वविद्यालय - नए कृषि कानूनों का किसान क्यों कर रहे है विरोध? ३० नवंबर २०२०.
८. Crop Minimum Support Prices MSP List 2021-22.
९. Essential Commodities (Amendment) Act 2020.
१०. Farmers (Empowerment and Protection) Agreement of Price Assurance And Farm Services Act 2020.
११. Farmer's produce Trade and Commerce (Promotion and Facilitation) Act 2020.

◆

''प्रत्येक समाजाला दुर्मिळतेच्या प्रश्नाशी सामना द्यावा लागतो आणि हाच दुर्मिळतेचा प्रश्न समाजापुढे सर्व मूलभूत आर्थिक प्रश्न निर्माण करतो. त्यामुळे दुर्मिळतेचा प्रश्न हा समाजापुढे निर्माण होणाऱ्या सर्व मूलभूत आर्थिक प्रश्नांची जननी आहे.

**- मॅक्ना**

माझी सर्वाधिक प्राथमिकता म्हणजे महत्त्वाच्या सामाजिक आणि आर्थिक समस्या सोडविणे ज्यामुळे दीर्घकालीन गरिबी, अज्ञान आणि रोगराईवर फारच कमी कालावधीत मात करता येऊ शकेल.

**- मनमोहन सिंग**

# केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणाचे ‘चारित्र्य’

**मारोती तेगमपुरे** †

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा समाज परिवर्तन कोणत्या दिशेने हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या धोरणांच्या माध्यमातून एका बाजूस शिक्षण व्यवस्थेचे खाजगीकरण- जागतिकीकरण- उदारीकरण तर दुसऱ्या बाजूस यातील तरतुदीमुळे सांप्रदायिकीकरणाचा धोकाही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे नवीन शिक्षण धोरणाची मुळातूनच चिकित्सा होणे अगत्याचे आहे. मुळात शिक्षण हा विषय आपल्या समवर्ती सूचीचा भाग आहे, या व्यवस्थेचे सरळसरळ उल्लंघन करीत केंद्र सरकारने देशातील जाणकार नागरिकांनी, अभ्यासकांनी नोंदवलेल्या आक्षेपांना याबरोबरच राज्य सरकारने केलेल्या विरोधाला बाजूला सारून एकतर्फी नवीन शैक्षणिक धोरण देशातील वास्तव परिस्थितीचा कोणताही विचार न करता थोपवण्याचा प्रकार सुरू आहे.

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले, त्यामुळे जे सत्तांतर घडून आले. हे भारतातील मागास वर्गीयांच्या शिक्षणविषयक व एकूणच सामाजिक स्थित्यन्तरातील अतिशय महत्त्वाचा टप्पा होता. भारतीय राज्यघटनेतील कलम १७ द्वारे देशातील सर्व पातळीवरील अस्पृश्यता नष्ट केली गेली. ४६ द्वारे दुर्बल जनवर्ग आणि विशेषतरू अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन शासन करील. याबरोबरच सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण शासन करील असा विश्वास देण्यात आला. परिणामी, भारतीय स्वातंत्र्यानंतर शिक्षण, नोकऱ्या याबाबतीत संधीचे दरवाजे उघडले गेले. यामुळे दुर्बल घटकांतील जनतेच्या आशा-आकांक्षा पल्लवित होणे स्वाभाविकच होते. याचा एकूणच परिणाम असा झाला की, प्रस्थापित जात / वर्ग गटाला या दुर्बल घटकातील जनतेची आभासी भीती वाटायला सुरुवात झाली. या दुर्बल घटकांचा सामाजिक-आर्थिक कमकुवतपणा कायम ठेवायचा तर त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणे आवश्यक होते. परंतु राज्यघटनेतील कलमाप्रमाणे वंचित ठेवणे शक्य नव्हते. अशावेळी भारतीय स्वातंत्र्याची पंच्याहत्तरीकडे

† अर्थशास्त्र विभागप्रमुख, गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना.
आजीव सभासद क्र. १२९५, भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७, ई-मेल : maruti3137@gmail.com,

वाटचाल सुरू असताना यांच्या हाती अमोघ शास्त्र सापडले. ते म्हणजे दुहेरी हल्ला चढवायचा, एका बाजूला शिक्षण कुणालाही प्रत्यक्ष नाकारायचे नाही, तर दुसऱ्या बाजूस ते इतके महाग करायचे की, ते या प्रवाहात येणारच नाहीत. दुसरे असे की, दिल्या जाणाऱ्या शिक्षणातून मन आणि मस्तिष्क याची जडणघडण अशा पद्धतीने करायची की, त्यांना अक्षर ओळख होईल, परंतु त्यांच्यामध्ये कार्यमूलक साक्षरतेचा अभाव असेल. मुळात कोणत्याही प्रकारची साक्षरता हे शिक्षणाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल असते, यामध्ये काहीएक शंका नसली तरी साक्षरता आणि शिक्षण यामध्ये मूलभूत पातळीवर फरक आहे. यामुळे साक्षरता म्हणजे शिक्षण हे समीकरण फसवे / दिशाभूल करणारे आहे. शंभर टक्के साक्षरता निर्माण होणे आणि देशातील कार्यमूलक साक्षरतेचे प्रमाण किमान पहिल्या टप्प्यात ५०% पर्यंत तरी पोहचणे या दोहोंचा विचार केला तर संख्यात्मक वृद्धीबरोबर गुणात्मक वृद्धी होणे अभिप्रेत आहे. परंतु ध्येयविषयक स्पष्टता नसल्याने त्याचा म्हणावा तसा विकास झाला नाही, होत नाही. अगोदरच्या काळात 'मनुवादी' समाजव्यवस्थेने शिक्षण नाकारले आणि आता 'मनी'वादामुळे शिक्षण नाकारल्या जाण्याची भर पडणार आहे. म्हणून याविषयी समाज म्हणून सखोल चिंतन होणे गरजेचे आहे. खरे तर शिक्षण हे देशातील स्थानिक जनतेच्या (देश-राज्य-प्रदेश-जिल्हा) आशा-आकांक्षाशी निगडित असले पाहिजे. तर व्यक्तीस वैश्विक दृष्टीबरोबरच आजूबाजूला काय सुरू आहे. काय गौरवपूर्ण आहे, काय प्रेरणादायी आहे, आणि काय समस्यात्मक आहे. याविषयीची काहीएक जडणघडण होऊ शकते. अन्यथा एकरेषीय दृष्टी विकसित होण्याचा धोका अधिक संभवतो. म्हणून नवीन शैक्षणिक धोरणाचे चारित्र्य काय आहे याची शहानिशा केली पाहिजे. याबरोबरच भारतातील शिक्षण व्यवस्थेसमोरील दीर्घकालीन ध्येय (भारतीय राज्यघटनेस अभिप्रेत असलेले) म्हणजे वर्ग, जात, लिंग, धर्म, भाषा, वंश, प्रांत या आधारावर कोणताही भेदभाव न करणारा समानतावादावर आधारित समाज निर्माण करणे हे असायला पाहिजे. यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची वीण अधिक घट्टपणे विणली जाईल. खरंतर आपल्या शैक्षणिक धोरणाची दिशा Democratic, Secular, Scientific and Inclusive Education अशी असायला पाहिजे. परंतु दुर्दैवाने ती वेगळ्याच दिशेने जात आहे.

युनेस्कोने शिक्षणाची चार प्रमुख उद्दिष्टे सांगितली आहेत. यामध्ये व्यक्ती आणि समाजाचा एकत्रित विकास, शिक्षणातून जगण्यासाठीची कौशल्य आत्मसात करता आली पाहिजे. तिसरे म्हणजे सतत शिकत राहण्याची, कायम ज्ञान आत्मसात करण्याची ऊर्जा शिक्षणाच्या माध्यमातून विकसित होत गेली पाहिजे. आणि शेवटचे म्हणजे सर्व समूहांचा जात, धर्म, प्रांत या अभिनिवेशात न अडकता सहजीवनाची प्रेरणा विकसित होणे. या चार उद्दिष्टांची पूर्तता ज्या शैक्षणिक धोरणाच्या/ नीतीच्या माध्यमातून होते. व्यक्ती सर्वांगीणदृष्ट्या परिपूर्ण नागरिक म्हणून ज्ञानसंपन्न होते, त्या शिक्षणाला आपण परिपूर्ण शिक्षण असं म्हणत असतो. या चार उद्दिष्टांची पूर्तता नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून होते? हा खऱ्या अर्थाने गंभीर आणि कळीचा प्रश्न आहे. या उद्दिष्टांची पूर्तता नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून होत असेल तर हे धोरण दीर्घकाळासाठी फलदायी आहे. जर होत नसेल तर याचे नकारात्मक परिणाम अतिशय भयाण स्वरूपाचे असतील यावर सुद्धा समाज म्हणून विचार होणे गरजेचे आहे.

के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील नवीन

शैक्षणिक धोरणातील पाचवीपर्यंतचे मातृभाषेतून शिक्षण, तीन ते अठरा वयोगटाचा शिक्षण हक्क कायद्यांतर्गत करण्यात आलेला समावेश, शिक्षणावर सकल राष्ट्रांतर्गत उत्पन्नाच्या ६% खर्चाची भूमिका या खऱ्या अर्थाने नवीन शैक्षणिक धोरणातील जमेच्या बाजू म्हणाव्या लागतील. मुळात पाचवीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून देण्यात येईल, असे या शैक्षणिक धोरणात म्हटले आहे असे सर्वत्र मांडले जात आहे. परंतु नवीन शैक्षणिक धोरणातील मूळ प्रस्तावात वेगळेच काहीतरी म्हटले आहे. ते म्हणजे 'जेथे शक्य असेल तेथे मातृभाषेतून शिक्षण दिले जाईल', ही झाली एक बाजू. दुसरी बाजू अशी की, यापूर्वी १९६४-६६ मध्ये कोठारी शैक्षणिक आयोगाने याविषयीची स्पष्ट मांडणी केलेली असून त्यामध्ये म्हटले आहे की, ''त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी करून मातृभाषा, राष्ट्रभाषा आणि संपर्क भाषा (इंग्रजी) या भाषा मुलांना शिकवण्यात याव्यात. प्रथम पदवी पातळीपर्यंत मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असावे, याबरोबरच इंग्रजी ही संपर्क भाषा म्हणून शिकवावी.'' इतकी स्पष्ट भूमिका असतानाही आजपर्यंत आपण काय करत होतो. हा खरा प्रश्न आहे. याच आयोगाने शिक्षणावर जीडीपीच्या ६% इतका खर्च केला पाहिजे, असेही सांगितले आहे. म्हणजे सध्याच्या कस्तुरीरंगन यांच्या अहवालात काही वेगळं म्हटलं आहे काय? नवउदारवादी भांडवलशाही चौकटीअंतर्गत शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट असे निर्माण केले जात आहे की, कॉर्पोरेटला गरज असेल त्या प्रमाणात लोकांना शिक्षित करणे आणि सार्वत्रिक शिक्षणाच्या आश्वासनावर विविध उपक्रमांद्वारे पळवाट शोधणे एवढेच आहे. नवीन शैक्षणिक धोरण म्हणजे काय? हे समजून घ्यायचे असेल तर या पळवाटा कोणत्या आणि त्यांची अंलबजावणी कशी केली जाईल. अगोदर हे समजून घ्यावे लागेल.

नवीन शैक्षणिक धोरण लागू करताना किंवा त्यांची घोषणा करताना देशाच्या संसदेमध्ये त्याची चर्चाही होऊ नये हे खऱ्या अर्थाने दुर्दैवी आहे. आज रोजी मोडकळीस आलेली अर्थव्यवस्था सावरणे, कोरोना महामारीस पायबंद घालण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करणे. आणि बेरोजगारीच्या उग्र होत चाललेल्या जटील समस्येवर मार्ग शोधणे अत्यंत आवश्यक असताना आम्ही नवीन धोरणांची देशात लागू करण्याची तयारी करीत आहोत. शिक्षणासारख्या गंभीर मुद्द्यावर या संकटाच्या काळात आखणी करणे नक्कीच समर्थनीय नाही. मागील सहा वर्षापासून अडगळीत पडलेला नवीन शैक्षणिक धोरणाचा मुद्दा आत्ताच घिसाडघाई करून का चर्चेत आणला गेला, यावर समाज म्हणून चिंतन होणे खऱ्या अर्थाने गरजेचे आहे. अशा संकटाच्या काळातही केंद्रसरकारला आपल्या विचारांची पेरणी करण्याची घाई झालेली दिसते. या नवीन शैक्षणिक धोरणाचे काही स्पष्ट, ठळक पैलू आहेत. या धोरणामुळे शिक्षणाचे आणखी मोठ्या प्रमाणात बाजारीकरण, केंद्रीकरण होईल. एका बाजूस आत्मनिर्भर होण्याची 'भाषा' करायची व दुसऱ्या बाजूस नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून शंभर खाजगी विद्यापीठांना देशात येऊन शिक्षणाचा धंदा करण्यासाठी दारे खुले करायचे, असा हा एकूण विचार करायला भाग पाडणारा प्रकार आहे. दुसऱ्या बाजूस या अहवालात आरक्षण, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, समाजवाद याबरोबरच वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संविधान याचा ओझरता उल्लेख आहे. असं जर असेल तर या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून आपणास भारतीय राज्यघटनेस अभिप्रेत असलेली उद्दिष्ट्ये साध्य होणार आहेत काय? हा खरा कळीचा प्रश्न आहे.

स्किल इंडिया या नावाने २०१५-१६ आणि २०१७-१८ या वर्षाचे स्वतंत्र अहवाल आले आहेत.

यामध्ये नमूद केल्याप्रमाणे कुशल मनुष्यबळाच्या बाबतीत इतर अनेक राष्ट्रांशी तुलना केली तर आपण कुठे आहोत याविषयीचा काहीएक अंदाज येऊ शकतो. औपचारिक कौशल्य शिक्षण प्राप्त मनुष्यबळाचे शेकडा प्रमाण अमेरिकेत ५२%, ब्रिटन ५८%, जर्मनी ७५%, जपान ८०% आणि चीनमध्ये हे प्रमाण २४% इतके आहे. तर भारतात औपचारिक व अनौपचारिक कौशल्य आत्मसात केलेल्या मनुष्यबळाचे प्रमाण ५% पर्यंत जाते. अधिक ढोबळपणे तपासले तर हे प्रमाण १०% पर्यंत जाऊ शकेल. या अतिशय महत्त्वपूर्ण घटकांचा विचार करून काही ठोस तरतुदी नवीन शैक्षणिक धोरणात करण्यात आलेल्या आहेत काय? की, फक्त शब्दांची चलाखी पाहावयास मिळते यावर जिज्ञासूंनी लक्ष देणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१६ हे भारताला केंद्रस्थानी मानून आशा शिक्षणप्रणालीची कल्पना करते की, जी उच्च दर्जाचे शिक्षण प्रधान करून आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय व चैतन्यमय ज्ञानी समाजामध्ये परावर्तित करण्यात थेट योगदान देते. हे उद्गार आहेत आपल्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या मसुदातील उद्दिष्टांचे. सध्या अस्तित्वात असलेले देशातील सुमारे आठशे विद्यापीठे आणि १५ हजार महाविद्यालये, साधारणपणे नऊशे विद्यापीठे ४० हजार उत्कृष्ट संस्थांमध्ये संकलित (मर्ज) करण्यात येतील. असेही यामध्ये म्हटले आहे. वर्गातील शिक्षण प्रक्रिया सुधारण्यासाठी, शिक्षकांच्या व्यावसायिक विकासास साह्य करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याची भाषा करण्यात आलेली असून, ३४ वर्षांपूर्वीच्या शैक्षणिक धोरणानेसुद्धा तेच सांगितलेले होते. शिक्षण मंत्रालयाचे नामकरण करून राजीव गांधी यांनी मानव संसाधन विकास मंत्रालय असे केले होते. सध्याच्या सरकारच्या मातृसंस्थेची अशी धारणा आहे की, मानवास संसाधन कसे म्हणता येईल. म्हणून पुन्हा शिक्षण मंत्रालय असा प्रवास सुरू झाला असावा?

भारतातील दलित आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणातून गळतीचा दर ५१% आणि ५८% असा अनुक्रमे आहे. याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी हा दर ३७% एवढा आहे. अन्य एका अभ्यासानुसार पहिलीत प्रवेश घेतलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ८२ ते ८५% विद्यार्थी गळतात. तर दलित (९२%), आदिवासी (९४%), इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत हा दर ९०% एवढा असून मुस्लीम विद्यार्थी गळतीचा हा दर ९२% इतका आहे. यावरून शिक्षणात समता केंद्रित दृष्टिकोन बाळगून किती काम करणे आपणास गरजेचे आहे याविषयीचा अंदाज येऊ शकतो.

मला वाटतं आणखी एका गंभीर मुद्यांवर आपण बोललं पाहिजे. ते म्हणजे नवीन शैक्षणिक धोरण मोठ्या प्रमाणात होत असलेल्या विद्यार्थ्यांच्या गळतीस कायदेशीर बनवत आहे. जे विद्यार्थी आपले शिक्षण अर्धवट थांबवतात, त्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र (प्रथम वर्षानंतर शिक्षण थांबले तर), पदविका (द्वितीय वर्षानंतर) देऊन सांत्वन केले जाणार आहे. त्यांना दिले जाणारे कागदाचे तुकडे आणि हे तुकडेधारक कोणत्याही नोकऱ्यावर आपला दावा सांगण्यास सक्षम होणार नाहीत. याबरोबरच महाविद्यालयात एक किंवा दोन वर्षे विद्यार्थी म्हणून जो खर्च केला जाईल त्यातून त्यांना कोणताही चांगला शिक्षणरूपी परतावा प्राप्त होणार नाही. या काळात अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनाचा सार्थक अनुभवही मिळणार नाही. परिणामी, नवीन शैक्षणिक धोरणातील कल्पना या केवळ सुशिक्षित व्यक्तींची एक संपूर्ण फौज तयार करण्याच्या आहेत. ज्यांना केवळ शिक्षित असल्याचा आभास दिला जाईल; परंतु कार्यमूलक साक्षरतेचा सर्वार्थाने अभाव असेल. कस्तुरीरंगन यांच्या अहवालात

वापरण्यात आलेले अनेक शब्द/वाक्य अतिशय प्रभावी आहेत म्हणून त्याच्या मोहात न पडता ठोस परिस्थितीचा ठोस अर्थ लावून त्यावर आपली मतं बनवली पाहिजेत, त्यासाठी प्रथम काळ समजून घेऊन मांडत असलेल्या शब्दयोजनेचे आजच्या परिस्थितीतील काय प्रयोजन आहे. याविषयीची काहीएक चिकित्सा होणे गरजेचे आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात बहु विद्याशाखीय शैक्षणिक संकुल निर्माण केली जातील असे म्हटले आहे. त्यासाठी एक विद्याशाखीय महाविद्यालये (ज्या ठिकाणी ३००० पेक्षा कमी विद्यार्थी प्रवेशित असतील अशी बहु विद्याशाखीय महाविद्यालयेसुद्धा) यामध्ये संकलित केली जातील. या संकुलात विद्यार्थी अभियांत्रिकीपासून कला,वाणिज्य, विज्ञान, व्होकेशनल कोर्स (त्याने इच्छा व्यक्त केली ते?) चालतील असं म्हटलं आहे. देशातील सर्वांगीण पातळीवरील वास्तवाचे भान बाळगून धोरण आखणी झाली नाही याचा हा सर्वोत्कृष्ट पुरावा आहे. दुसरे असे की, जागतिक पातळीवर शिक्षक-विद्यार्थी प्रमाणाशी आपले प्रमाण दूरदूरवर मेळ खात नाही. अमेरिका, चीन, क्युबा या राष्ट्रातील हे प्रमाण (साधारणपणे प्रति १६ ते २० विद्यार्थी एक शिक्षक) आणि आपले (४६ विद्यार्थी एक शिक्षक) अगदी दुपट्टीपेक्षाही अधिक (यामधील पूर्णवेळ, अर्धवेळ, कंत्राटी, तासिका तत्त्वावरील या सर्वांचा अंतर्भाव) आहे.

'ए पॉलिसी फ्रेमवर्क फॉर रिफॉर्म इन एज्युकेशन' असा कुमारमंगलम बिर्ला-अंबानी यांचा अहवाल २० एप्रिल २००० मध्ये तत्कालीन पंतप्रधान मा. अटलबिहारी वाजपेयी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला होता. त्या अहवालात ज्या शिफारशी करण्यात आल्या होत्या, त्या म्हणजे भारतीय शिक्षण व्यवस्था बाजाराभिमुख नसून यास बाजारप्रणित बनवले पाहिजे. विद्यापीठे व महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या अनुदानात कपात करण्यात यावी. या विद्यापीठांना व महाविद्यालयांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी भाग पाडावे. अशा प्रकारच्या तरतुदी करण्यात आलेल्या होत्या. या अहवालाचा आधार घेत, जानेवारी २००१ मध्ये भारतीय विज्ञान काँग्रेसमध्ये दिलेल्या भाषणात तत्कालीन पंतप्रधान वाजपेयी यांनी उच्च शिक्षणावरील वाढत्या खर्चाविषयी चिंता व्यक्त केली. त्यांच्या भाषणाचा स्वर शिक्षणाचे बाजारीकरण करणे किती आवश्यक आहे, याकडे अधिक होता. हा संदर्भ याचसाठी की, नुकतेच जाहीर झालेले नवीन शैक्षणिक धोरण या बिर्ला-अंबानी अहवालावरच आधारित असल्याचे व त्याचे प्रतिबिंब महाविद्यालयांना दिली जात असलेली मान्यता २०३० पर्यंत हळूहळू बंद करण्यात येईल या मसुद्यातील तत्त्वात पडल्याचे पाहावयास मिळते. म्हणजे असे की, 'सर्व उच्च शिक्षण संस्था स्वायत्त स्वयंशासित संस्था असतील आणि संलग्नीकरण पद्धत बंद करण्यात येईल. मान्यताप्राप्त महाविद्यालयांना 'स्वायत्तता' पदवी प्रदान करणारी महाविद्यालय याअर्थी विकसित करण्यासाठी आवश्यक साहाय्य केले जाईल, आणि मान्यताप्राप्त विद्यापीठे 'चैतन्यमय' बहुशाखीय संस्थांमध्ये विकसित करण्यात येतील.' नवीन शैक्षणिक धोरणातील या तरतुदींवर गांभीर्याने विचार केला पाहिजे.

**स्वायत्तता म्हणजे काय?**

स्वायत्तता म्हणजे महाविद्यालयाने आपले कार्यक्रम स्वत: तयार करून स्वत: राबवणे. यामध्ये दोन प्रकार करण्यात आलेले आहेत. (यापूर्वीच) आणि आतातर श्रेणीबद्ध स्वायत्ततेचा पुरस्कार करण्याची भाषा नवीन शैक्षणिक धोरणाने स्पष्ट केली असून या धोरणास केंद्रीय मंत्रीमंडळाने मान्यता दिल्यानंतर देशाच्या शिक्षण मंत्री महोदयांनी श्री. पोखरियाल

यांनी याविषयीचा उल्लेख वारंवार करण्याचा सपाटा लावला असून पहिल्या टप्प्यात देशातील तीनशे महाविद्यालये स्वायत्त करण्याच्या संदर्भातील भाष्य त्यांनी नुकतेच केले आहे.

**अ) शैक्षणिक स्वायत्तता :** यामध्ये महाविद्यालये व सरकारी शिक्षण संस्थांना अभ्यासक्रम तयार करणे, शिकविणे, परीक्षा घेणे, निकाल घोषित करणे आणि पदवी प्रदान करणे इत्यादी शैक्षणिक बाबीमध्ये त्यांची भूमिका अंतिम ठरते. या प्रकारच्या स्वायत्तेस कुणाचाही विरोध असण्याचे काहीएक कारण नाही /असू नये .

**ब) अंगभूत स्वायत्तता :** उल्लेखित उपक्रमासाठी येणारा सर्व खर्च यामध्ये वेतन खर्च आणि वेतनेत्तर खर्च यासाठी लागणारे आर्थिक पाठबळ त्या-त्या महाविद्यालयाने निर्माण केले पाहिजे. यास शासकीय अनुदान प्राप्त होणार नाही. या धोरणातील स्वायत्तेपैकी शैक्षणिक स्वायत्तता ही पहिली पायरी होय आणि तिच्या पोटी आर्थिक स्वायत्ततेचा उगम होणार असून शिक्षण क्षेत्रासाठी हे अतिशय हानिकारक असणार आहे. सरकारने उच्च शिक्षणातून अंग काढून घेण्याचा हा प्रकार असून शिक्षण आणि शिक्षकांना बाजाराच्या स्वाधीन करण्याचा हा छुपा 'डाव' होय. काही वर्ष शैक्षणिक स्वायत्तता व मग अंगभूत स्वायत्तता हा क्रम असून हे धोरण शिक्षणावरच 'टाच' आणणारे आहे. अंगभूत स्वायत्तेच्या माध्यमातून विविध उपक्रमांना लागणारा खर्च, वेतन व वेतनेत्तर खर्चाचा भार सोसण्यासाठी आर्थिक स्त्रोत म्हणून शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांकडून वारेमाप फीस उकळणार. ज्यामुळे 'ज्याचा खिसा भरलेला, त्याचा प्रवेश ठरलेला' या तत्त्वाचा उगम होऊन शिक्षण बाजारू वस्तू होण्यास विलंब लागणार नाही. यामुळे या धोरणातील ही बाब अत्यंत घातक आहे. त्यामुळे संलग्निकीकरणाची प्रक्रिया असणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे आणखी एका गंभीर धोक्याची शक्यता अधिक जाणवते. विशेष तत्त्वाने महाराष्ट्राच्या बाबतीत अधिक दूरगामी गंभीर परिणाम करणारी आहे. जर आपण ही संलग्निकीकरणाची पद्धती बंद केली तर 'टपरीछाप' कायम विनाअनुदानित महाविद्यालये कोणत्याही उत्तरदायित्वाची गरज नसल्यामुळे अधिक 'मुजोर' होऊन शिक्षणाचा 'खेळखंडोबा' करतील. शैक्षणिक धोरणातील या बाबींचा साकल्याने विचार होणे आवश्यक आहे. 'भविष्यकाळात भारताचे भवितव्य वर्गखोल्यातूंन घडणार आहे.' असे कोठारी आयोगाने म्हटले होते. सामान्य जनासाठी या वर्गखोल्या भविष्यात उपलब्ध असणार आहेत का? हा खरा प्रश्न आहे. याबरोबरच या धोरणात समानता आणि समावेशनाचा अभाव जाणवतो. सध्याच्या शैक्षणिक पद्धतीतून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांचा आणि नवीन शैक्षणिक धोरणातील लाभार्थी(?) विद्यार्थ्यांचा मेळ कसा घातला जाईल. याविषयीची काहीएक स्पष्टता या नवीन शैक्षणिक धोरणात दिसत नाही. या धोरणात अनेक ठिकाणी पसंती प्रधान शिक्षण पद्धतीचा उल्लेख होत असला तरी या धोरणात खरंच विद्यार्थी म्हणून काहीएक पसंती असणार आहे का? दुर्दैवाने याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल.

या धोरणामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, ऑनलाईन, डिजिटल आणि डिस्टन्स (दूरस्थ) शिक्षणास प्राधान्य देण्यात येईल. येत्या काळात डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर तयार करून शिक्षक / प्राध्यापकांचे ओरिएंटेशन केले जाईल. विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेऊन मूल्यांकनसुद्धा ऑनलाईन पद्धतीनेच केले जाईल, असे स्पष्टपणे हा अहवाल सांगतो.

आजही आपण सर्वाधिक निरक्षरांचा देश म्हणून ओळखला जातो. पहिल्या शंभर विद्यापीठात आपल्या

देशातील एकही विद्यापीठ असू नये, तीनशे विद्यापीठात फक्त सहा भारतीय विद्यापीठांचा समावेश व्हावा हे निश्चितच आपल्यासाठी भूषणावह बाब नाही. इन्फोसिसच्या संचालकांनी नोंदवलेल्या मतानुसार ४ हजार जागतिक पातळीवरील वैज्ञानिकांमध्ये फक्त दहा भारतीय वैज्ञानिक असावेत हे कशाचे लक्षण आहे. गुणवत्तेच्या बाबतीत आपण नेमकेपणाने कुठे आहोत हे 'असर' संस्थेच्या अहवालाने दाखवून दिले आहे. म्हणून धोरणात्मक बदल करताना या बाबींचा विचार करणे आवश्यक होते, परंतु तसे काही झाल्याचे सध्यातरी म्हणता येणार नाही. या समग्र धोरणाची चिकित्सा करून या धोरणाचा प्रतिकार करण्यासाठी जनतेची एकजूट निर्माण करणे आज काळाची गरज निर्माण झालेली आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राध्यापक आणि विवेकी समाज घडवण्याची जबाबदारी म्हणून आपणास सर्वांनाच गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कारण शिक्षण ही तुमच्या-आमच्या अस्तित्वाची लढाई आहे. हे विसरून चालणार नाही.

**संदर्भ सूची :**


१. चव्हाण दिलीप, समकालीन भारतः जातींअंताची दिशा, क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी आणि हरिती पब्लिकेशन, पुणे, २०१६.

२. कोरडे विवेक, नवभांडवलशाही व्यवस्थेतील शिक्षण आणि बेरोजगारीचा प्रश्न, नवभांडवलशाही, (संपा.) मेधा पानसरे, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, २०१९.

३. रणसुभे विलास (संपा.), शिक्षण, लोकवाङ्मय गृह, मुंबई २०१०.

४. राष्ट्रीय शिक्षा नीती २०२०, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, दिल्ली.

५. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- सारांश २०१९.

६. तेगमपुरे मारोती, 'आत्मनिर्भर' होताना शंभर खाजगी विद्यापीठे कशाला? दैनिक लोकमत, (०१-०८-२०२०) मुंबई.

७. तेगमपुरे मारोती, भारतीय उच्च शिक्षण कशासाठी -कुणासाठी, भाषा, विकास आणि राजकारण (संपा), डॉ. मारोती तेगमपुरे आणि इतर, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०११.

८. तेगमपुरे मारोती, शिक्षण क्षेत्राकडे अक्षम्य दुर्लक्ष, दैनिक महाराष्ट्र टाइम्स, नागपूर (१६-०९-२०१८).

९. Educational Statistics at A Glance, Government of India, Ministry of Human Resource Development, Department of School Education & Literacy, Statistics Division 2018.

१०. Report of The Education Commission 1964 & 1966, on Education and National Development, National council of educational research and training, Ministry of Education (1966) New Delhi.


◆

## निवेदन : अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणावरील सार्वजनिक खर्च व शालेय शिक्षण प्रगती विश्लेषण

**सुभाष कोंबडे** †

**प्रस्तावना :**

भारतामध्ये शिक्षण हे प्रामुख्याने सरकारद्वारे दिले जाते. हे केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थांच्याद्वारे पुरविले जाते. यासोबतच काही खाजगी शाळामधूनही शिक्षण दिले जाते. वय वर्षे ६ ते १४ या वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षण हे पूर्णत: मोफत दिले जाते व ते अनिवार्य आहे. २००९च्या शिक्षण हक्क कायद्याने याची तरतूद केली आहे. भारतीय राज्यघटनेच्या ४२व्या घटनादुरुस्तीने शिक्षण हे समवर्ती सूचीमध्ये समाविष्ट करण्यात आले. यानंतर केंद्र सरकार व विविध राज्य सरकारे हे शिक्षण खर्चाबाबत सामूहिक जबाबदारी स्वीकारून कार्य करत आहे. भारतामधील घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशामध्ये शिक्षणविषयक धोरणे, नियोजन व कार्यक्रम यामध्ये भिन्नता दिसून येते. यामुळे केंद्र शासनाद्वारे राष्ट्रीय धोरण आराखडा (National Policy Framework) निश्चित केला जातो व घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांना मार्गदर्शक तत्त्वे ठरवून दिली जातात. याचा फायदा घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांना त्याचे शिक्षणविषयक कार्यक्रम व धोरणे ठरविताना होतो. राज्य सरकारे व स्थानिक स्वराज्य संस्था याच्याद्वारे बहुसंख्य प्राथमिक शाळा चालविल्या जातात. अलीकडील काळात खाजगी शाळाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. सन २००५-०६ मध्ये एकूण प्राथमिक (१ ते ८ वी) शाळापैकी ८३.१३ टक्के शाळा ह्या सरकारी व्यवस्थापन शाळा होत्या. उरलेल्या १६.८७ टक्के शाळा या खाजगी व्यवस्थापन शाळा होत्या. यापैकी १/३ शाळा ह्या अनुदानित तर २/३ शाळा विनाअनुदानित होत्या. पहिली ते आठवी या शाळामधील नोंदणी विचारात घेता हे प्रमाण ७३.२७ असे होते. ग्रामीण भागामध्ये ८०.२० तर शहरी भागामध्ये ३६.६४ असे होते. सार्वजनिक शाळांमधील संसाधनाच्या कमतरतेमुळे या शाळामध्ये शिक्षकांची अनुपस्थिती मोठ्या प्रमाणात असल्याचे आढळून आले आहे. याचाच परिणाम म्हणून खासगी शाळा मोठ्या प्रमाणात उघडत असल्याचे दिसते.

सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तनासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे. २१ व्या शतकातील अर्थव्यवस्था या ज्ञानावर चालणाऱ्या अर्थव्यवस्था म्हणून ओळखल्या जातात. उत्पादन व्यवस्थेमध्ये

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. १८११, भ्रमणध्वनी : ९८२२८८१५६५, ई-मेल : skombde@gmail.com

ज्ञानाची भूमिका महत्त्वाची आहे. कौशल्य व क्षमता विकासावर जास्त भर देणाऱ्या शिक्षण व्यवस्थेकडे आपण पाहतो आहोत. भारत सरकारच्या बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये दर्जेदार शिक्षण पुरविण्यावर भर देण्यात आलेला आहे. वय वर्षे १४ पर्यंतचे शिक्षण मोफत पुरविण्याचे निश्चित करण्यात आले. शिक्षणाची उपलब्धता (Access) मात्र महत्त्वाची नसून गुणवत्ताही अत्यंत महत्त्वाची असल्याचे मान्य करण्यात आले. अलीकडील शिक्षणविषयक धोरणामध्ये गुणवत्ता व कौशल्यपूर्ण शिक्षण महत्त्वाचे असल्याचे मान्य करण्यात आले आहे.

भारत सरकारने इ. स. २०००-२००१ मध्ये सर्व शिक्षा अभियान व केंद्र सरकार पुरस्कृत योजना राज्य सरकारच्या भागीदारीमध्ये भारतामध्ये लागू केली. प्राथमिक क्षेत्राच्या वैश्विकरणामध्ये ही योजना अत्यंत महत्त्वाची समजली जाते. सर्व शिक्षा अभियान (SSA) चा मुख्य उद्देश हा शिक्षण सुविधा, उपस्थिती व शिक्षणामधील लिंग भेद व जातीय भेद अंतर कमी करणे हा होता. सर्व शिक्षा अभियानांतर्गत उद्देश व पायाभूत सुविधा निर्माण करणे, शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम सुरुवात करणे. 'मोफत' पुस्तके उपलब्ध करणे व अभ्यास साहित्य (Stationary) उपलब्ध करणे हे उद्देश होते. यामध्ये दिव्यांग मुलांसाठी विशेष सुविधा निर्माण करण्यात आल्या. या योजनेतंर्गत नवीन शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली.

**मुख्य शब्द (Key Words)** : प्राथमिक शिक्षण, शिक्षणावरील महसुली खर्च, भांडवली खर्च, शिक्षण माध्यम.

**शिक्षण हक्क कायदा २००९ :**

२००९ मध्ये मोफत व अनिवार्य शिक्षण कायदा संसदेमध्ये पास करण्यात आला. ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व अनिवार्य शिक्षण देण्याचे कायद्याद्वारे तरतूद करण्यात आली. कोणतेही बालक मूलभूत शिक्षणापासून वंचित राहू नये हा यामागील प्रमुख उद्देश होता. मूलभूत शिक्षण पूर्ण करणे हे कायद्याने अनिवार्य करण्यात आले. उत्पन्न, लिंग व जात विचारात न घेता सर्वांना मोफत शिक्षण उपलब्ध करणे हा यामागील महत्त्वाचा भाग आहे. शिक्षणामधील प्रवेश(Access), गुणवत्ता (Quality), समानता (Equity) समावेशकता (Inclusion) व रोजगाराभिमुखता (Employbility) या सर्व बाजूने विचार करण्यात आलेला आहे. भारतीय संविधानाच्या कलम ४५ मध्ये मोफत व अनिवार्य शिक्षण देण्याचा विचार मांडण्यात आलेला आहे. मुलांचे हक्क संरक्षण करण्याबाबतही अनेक बाबींचे विश्लेषण दिलेले आहे. मुलाचे हित संरक्षित करण्यासाठी संविधानामध्ये तीन अनुच्छेद (Article) समाविष्ट करण्यात आली. अनुच्छेद २४ प्रमाणे वय वर्षे १४ खालील कोणत्याही बालकास खाणी व कारखाण्यामध्ये कामास लावता येणार नाही. अनुच्छेद ३९ मध्ये घटकराज्यांनी त्याची धोरणे बालकांना शैक्षणिक सुरक्षा देण्यायोग्य करावीत व त्यांना शोषणापासून संरक्षण द्यावे व अनुच्छेद ४५ प्रमाणे राज्यांनी संविधान अंमलात आल्यापासून १० वर्षामध्ये मोफत व अनिवार्य शिक्षण द्यावे असे निर्देशित करण्यात आले. अनुच्छेद ४५ हा राज्य सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये समाविष्ट करण्यात आला. इ. स. २००२ मध्ये ९३व्या घटनादुरुस्ती विधेयकाद्वारे प्राथमिक शिक्षण हे भारतातील सर्वच बालकांचा मूलभूत हक्क असल्याचे मांडण्यात आले. हे विधेयक पुढे ८३वी घटनादुरुस्ती कायद्यामध्ये रूपांतर केले गेले व शिक्षण हे मूलभूत हक्कांमध्ये समाविष्ट केले गेले. पुढे अनुच्छेद २१ A हा संविधानामध्ये जोडण्यात आला. १९७६ पूर्वी शिक्षण हे राज्यसूचीमध्ये होते.

मात्र १९७६ नंतर ते समवृत्ती सूचीमध्ये घेण्यात आले व प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारची निश्चित करण्यात आली.

स्वातंत्र्यापूर्वी भारतामध्ये २२ अनिवार्य शिक्षण कायदे अस्तित्वात होते. स्वातंत्र्यानंतर हे सर्व कायदे अंमलबजावणीत आणले गेले. भारतामध्ये कायद्याची उणीव नव्हती. मात्र स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतरही शैक्षणिक प्रगती अपेक्षित प्रमाणात घडून आलेली नाही, असे आपणास खेदाने म्हणावे लागेल.

स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये शिक्षणविषयक धोरणे व नियोजन करण्यासाठी एकूण ८ अखिल भारतीय शैक्षणिक सर्वेक्षण (All India Education Survey) करण्यात आली. प्रत्येक सर्वेक्षणामध्ये प्राथमिक शिक्षणविषयक आकडेवारीवर दृष्टीक्षेप टाकून धोरण व नियोजन आखण्यात आले. सहाव्या सर्वेक्षणामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात आला. सातव्या सर्वेक्षणामध्ये मध्यान्ह भोजन (Mid Day Mill) सारख्या नवोपक्रमाची सुरुवात करण्यात आली. १९६४ मध्ये भारतातील शिक्षणविषयक त्रुटी दूर करण्यासाठी डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली 'कोठारी आयोगाची' स्थापना करण्यात आली. भारतीय शिक्षण पद्धतीत कोठारी आयोगांनी अनेक शिफारसी सुचविल्या. त्यांनी समान शाळा पद्धती (Common School System) सुचविली. १९६५ मध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च हा स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या २.९% इतका होत असल्याचे दर्शवून शाळांचे जाळे निर्माण करण्यासाठी तो जीडीपीच्या ६% एवढा असणे आवश्यक आहे, असे नमूद केले. स्वातंत्र्यानंतरच्या ७० वर्षांमध्ये तो एकदाही त्या पातळीवर पोहचला नाही, असे आपणास दिसून येते. यामधून सरकारचे शिक्षणाकडे असणारे दुर्लक्ष अधोरेखित होते. त्या वेळी शिक्षण हा विषय राज्यसूचीमध्ये असल्यामुळेदेखील याकडे लक्ष दिले गेले नाही, असे आपणास म्हणता येईल. कोठारी आयोगाच्या २० वर्षांनंतर म्हणजे १९८६ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले. या धोरणामध्ये शिक्षणाच्या बाहेर असलेले शैक्षणिकदृष्ट्या मागास, उदा. अनुसूचित जाती, जमाती, आदिवासी, महिला, इतर मागास प्रवर्ग व अल्पसंख्यांक यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यात आले. ग्रामीण, डोंगराळ व दुष्काळी जिल्ह्याकडे जास्त लक्ष देण्याचे ठरविण्यात आले. या धोरणानंतर ऑपरेशन ब्लॅकबोर्ड (Operation Blackboard) व जिल्हा शैक्षणिक प्रशिक्षण संस्था (DIET) यासारखे महत्त्वाचे कार्यक्रम हाती घेण्यात आले. १९८६-८७ या दरम्यान जवळपास १० लक्ष-शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन लेख हा द्वितीय आकडेवारीवर आधारलेला असून यामध्ये शिक्षणविषयक धोरणामधला क्रम व शिक्षणावरील सार्वजनिक खर्चविषयक आकडेवारीचा उपयोग केला गेला आहे. द्वितीय आकडेवारीसाठी सरकारची वार्षिक लेख, जिल्हा पषिदेचे अहवाल, जनगणना माहिती, महाराष्ट्र शासनाची अंदाजपत्रकीय दस्तावेज, महाराष्ट्र मानव विकास अहवाल इ. आकडेवारीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**शिक्षण व सार्वजनिक खर्च**

शिक्षणावरील सार्वजनिक खर्चाचे दोन बाजूने विश्लेषण केले जाते. पहिले म्हणजे आर्थिक की जे अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षणाचा थेट फायदा व्यक्ती आणि देशास होतो. शिक्षणावरील खर्चाने मानवी भांडवल समृद्ध होते. मानवी संसाधनावरील गुंतवणुकीमुळे उत्पादकता व उत्पादनात वाढ होते व

याचाच परिणाम म्हणून स्थूल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ होते. उत्पादनाचा परतावा दरही वाढतो. परतावा हा दोन्ही स्वरूपाचा असतो तो म्हणजे खाजगी व सामाजिक. खाजगी परतावा म्हणजे व्यक्तीला मिळालेले लाभ होय. यामुळे व्यक्तीचे उत्पन्न वाढते व पर्यायाने त्याचा उपभोग वाढून जीवनमान सुधारते. सामाजिक परतावा म्हणजे समाजास मिळालेले लाभ होत. ते अनेक प्रकारचे असतात व दीर्घकालीन फायदा देणारे असतात. बऱ्याच वेळा सामाजिक लाभ हे पिढ्यान्‌पिढ्या उपभोगता येणारे असतात. उदा. एखाद्या व्यक्तीने केलेले संशोधन सबंध समाजास उपयुक्त असते व ते दीर्घकाळपर्यंत मिळत असते. उदा. विजेचा शोध, इंजिनचा शोध इ. सामाजिक लाभासाठी जगातील अनेक मोठ्या संस्था, सरकारी शिक्षण व संशोधनावर मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक करताना दिसून येतात. आर्थिकेतर बाजूने विश्लेषणही महत्त्वाचे आहे. शिक्षणामुळे सामाजिक स्थैर्यास वातावरण व पार्श्वबाजू तयार होते. शिक्षण हे लोकशाही मजबुतीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. लोकशाही व्यवस्थेत शिक्षण जितके समृद्ध व विस्तृत असते लोकशाही तितकी मजबूत असते. राजकीय स्थैर्यासाठीही शिक्षण महत्त्वाचे असते. चांगल्या प्रकारच्या शिक्षणामुळे श्रमशक्ती नियोजन उत्कृष्ट प्रकारे करता येते. आर्थिक वृद्धी साध्य करण्यासाठी श्रमशक्ती नियोजन महत्त्वाचे ठरते. एकंदरित आर्थिक विकास साध्य करण्यासाठी शिक्षण व प्रशिक्षण महत्त्वाची भूमिका बजावतात व यावरील सार्वजनिक खर्च हे शिक्षण कौशल्यपूर्ण बनविण्यास कारणीभूत ठरतात. भारतामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुरुवातीस शिक्षणावरील सार्वजनिक खर्चाचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी प्रमाण हे ०.६४% एवढे होते. हे प्रमाण नाममात्र होते. १९६४ मध्ये ते १.९०% एवढे झाले. १९६४ मध्ये कोठारी आयोगाने हे प्रमाण ६% पर्यंत वाढविण्याबद्दल शिफारस केली होती. मात्र स्वातंत्र्यानंतरच्या ७३ वर्षामध्ये हे प्रमाण ६% पर्यंत वाढले गेले नाही. कोठारी आयोगाच्या शिफारशीनंतर यामध्ये वाढ होऊन ते १९८६ मध्ये ३.४९% पर्यंत वाढल्याचे दिसते.

भारत हा देश जगातील सर्वात मोठा शालेय विद्यार्थी असलेला देश आहे. भारतामध्ये जवळपास १३ कोटी विद्यार्थी हे प्राथमिक (१ली ते ८वी) शाळेत जाणारे आहेत. शिक्षण हक्क कायद्यानुसार यांना मोफत व अनिवार्य शिक्षण देणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

**महाराष्ट्राची शालेय शिक्षण प्रगती**

महाराष्ट्र हे भारतातील एक प्रगत घटकराज्य आहे. लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. २०११च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ही ११.२४ कोटी इतकी आहे. एकूण देशाच्या लोकसंख्येशी हे प्रमाण ९.३% इतके आहे. महाराष्ट्र हे राज्य नागरी राज्य म्हणूनही ओळखले जाते. महाराष्ट्रात ४५% लोकसंख्या ही नागरी भागात राहते. महाराष्ट्र हे देशामध्ये सर्वात जास्त औद्योगिक उत्पादन देणारे राज्य आहे. औद्योगिकदृष्ट्या प्रगत असल्यामुळे कौशल्यपूर्ण श्रमदलाची सारखी गरज भासते. मानव विकास निर्देशांकामध्ये महाराष्ट्र हे राज्य देशाच्या मानव विकास निर्देशांकाच्यापेक्षा वरच्या स्थानावर आहे. महाराष्ट्रामध्ये शिक्षणास जास्त महत्त्व दिले जाते. महाराष्ट्रात शिक्षणविषयक धोरणासाठी महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषाचा वारसा लाभलेला आहे. छत्रपती शाहू महाराज हे कोल्हापूरच्या वसाहतीय राज्याचे १८९४ मध्ये राजे बनले. १७५७ पासून ब्रिटिशाचे येथील शिक्षणावर नियंत्रण होते. मात्र १८९० मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणाचे दरवाजे सर्वांसाठी खुले

केले. त्यांनी शिक्षणास शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आणले. शिक्षण हे प्रत्येक जात व धर्माच्या मुलांसाठी खुले केले. त्यांनी प्राथमिक शिक्षणावर मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला. त्यांनी शाळा, हॉटेल्स व मंदिरे यांना बांधकामासाठी निधी दिला. ते मानव विकास हा व्यावहारिक पातळीवर झाला पाहिजे, या आग्रहाचे होते. त्यांनी शिक्षणासाठी आपल्या अंदाजपत्रकातून रक्कम बाजूस काढून ठेवली होती.

महाराष्ट्रामध्ये इ. स. १९४७ मध्ये मुंबई प्राथमिक शिक्षण कायदा (Bombay Primary Education Act) हा पास केला गेला व प्राथमिक शिक्षण हे अनिवार्य केले गेले. त्याअगोदर १९२२ मध्ये छत्रपती शाहू महाराज यांनी मोफत व सक्तीचे शिक्षण कायदा पास करून तो अंमलात आणला होता.

महाराष्ट्रामध्ये मुलीच्या शिक्षणासाठी ३ महत्त्वाच्या योजना राबविल्या जातात व यातून मुलीचे शिक्षणाचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढल्याचे दिसते. उपस्थिती भत्ता योजना (Attendance Allowance Scheme) अहिल्याबाई होळकर योजना, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना, इ. होय.

तक्ता क्र. १ वरून आपणास असे दिसून येते की, सार्वजनिक खर्च व शिक्षणाचा प्रवेश (Access) यामध्ये मजबूत सहसंबंध असल्याचे दिसते. २००२-०३ मध्ये प्राथमिक शिक्षणावरील खर्च हा मात्र ४०३९ कोटी रु. एवढा होता व शाळांची संख्या ही ३२३३७ इतकी होती. सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्राथमिक शिक्षणावरील सार्वजनिक खर्चामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसून येते. सार्वजनिक खर्च हा ४०३९

**तक्ता क्र. १ : महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणावरील सार्वजनिक खर्च व शाळाची संख्या यामधील संबंध**

(खर्च कोटी रुपयांमध्ये)

| वर्षे | प्राथमिक शिक्षणावरील सार्वजनिक खर्च | शाळांची संख्या |
|---|---|---|
| २००२-०३ | ४०३९ | ३२३३७ |
| २००३-०४ | ४१२१ | ४२०५८ |
| २००४-०५ | ४४७४ | ३९६३२ |
| २००५-०६ | ४७०१ | ४१६२८ |
| २००६-०७ | ५५०८ | ३९७५६ |
| २००७-०८ | ५९१२ | ४०९६० |
| २००८-०९ | ६५४६ | ४४८३५ |
| २००९-१० | १००९५ | ४७०५७ |
| २०१०-११ | १२४५१ | ४९०७२ |
| २०११-१२ | १२९९३ | ४९६६५ |
| २०१२-१३ | १५२८८ | ४९६६३ |
| २०१३-१४ | १४५५२ | ५२४४९ |

Source : Compiled from various Survey of Maharashtra and DISE

कोटी रु. वरून १४५५२ कोटी रु. इतका वाढला असल्याचे कारण म्हणजे सरकारचा सकारात्मक दृष्टिकोन व योजनेतर खर्चात झालेली वाढ होय. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे प्राथमिक शिक्षणाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली. शासनाद्वारे विविध शैक्षणिक योजना सुरू करण्यात आल्या. सर्व शिक्षा अभियानांतर्गत राज्याचा हिस्सा वाढला. पोषण आहाराद्वारे, पोषणमूल्ये वाढविण्यास प्राधान्य देण्यात आले. ग्रामीण व दुर्गम भागात शिक्षण सुविधा निर्माण करण्यासाठी, वस्ती शाळाची स्थापना केली. २००७-०८ मध्ये ८६६५ वस्ती शाळा कार्यरत करण्यात आल्या ग्रामीण व शहरी भागातील बालकामगारांसाठी महात्मा फुले शिक्षण हमी योजना सुरुवात केली गेली. या योजनेअंतर्गत ५.२४ लक्ष मुलांनी शिक्षण घेतले. अहिल्याबाई होळकर योजना सुरू केली गेली. उपस्थिती भत्ता योजना सुरू करून शाळेतील उपस्थिती वाढविण्यासाठी प्रयत्न केले गेले. या योजनेअंतर्गत ९.३६ लक्ष मुलांना फायदा झाला. प्राथमिक शाळेमध्ये मोफत पाठ्यक्रमाची पुस्तके दिली गेली. बुक बँक योजना सुरू केली. वरीलप्रमाणे अनेक योजना सुरू करून प्रवेश वाढविण्यावर भर देण्यात आला.

तक्ता क्र. २ मध्ये महाराष्ट्राच्या महसुली खात्यावरील खर्चाचे विश्लेषण आहे. शिक्षणावर केला जाणारा खर्च हा महसुली खात्यावर केला जातो.

**तक्ता क्र. २ : महाराष्ट्रातील महसुली खात्यावरील (Revenve Account) प्रत्यक्ष खर्च**

(आकडे रु. कोटी मध्ये )

| वर्षे | एकूण खर्च | नियोजित खर्च | नियोजित खर्चाचे प्रमाण (%) | अनियोजित खर्च | अनियोजित खर्चाचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|---|
| २००४-०५ | ९८६९.५३ | १८६.७५ | १.८९ | ९६८२.७७ | ९८.११ |
| २००५-०६ | १०५६५.०२ | ४६७.८८ | ४.४३ | १००९७.१३ | ९५.५७ |
| २००६-०७ | ११८४२.६३ | ४४१.९८ | ३.७३ | ११४००.६४ | ९६.२७ |
| २००७-०८ | १३३९९.४७ | ५५९.२६ | ४.१७ | १२८४०.२१ | ९५.८३ |
| २००८-०९ | १६१५१.९८ | ७५८.६० | ४.७० | १५३९३.३८ | ९५.३० |
| २००९-१० | २१५१४.५८ | ४८९.९५ | २.२८ | २१०२४.६३ | ९७.७२ |
| २०१०-११ | २५८६२.८६ | ६२६.८३ | २.४२ | २५२३६.०३ | ९७.५८ |
| २०११-१२ | २७५८३.७३ | ८४०.८६ | ३.०५ | २६७४२.८६ | ९६.९५ |
| २०१२-१३ | ३१६५९.२१ | ९७४.४६ | ३.०८ | ३०६८४.७५ | ९६.९२ |
| २०१३-१४ | ३६०१४.३९ | ९५९.५८ | २.६६ | ३५०५४.८१ | ९७.३४ |
| २०१४-१५ | ३८२१२.१७ | १३३३.१६ | ३.४९ | ३६८७९.०१ | ९६.५१ |
| Average | | | ३.२६ | | ९६.७४ |
| CAGR | | | ०.११६ | | ०.१२९ |

Source : Compiled from Various reports on Analysis of the budgetary expenditure on Education MHRD - GOI

त्यापैकी सरासरी ९६.७४% इतका खर्च व योजनेतर खर्च हा मात्र ३.२६% एवढा योजना खर्च आहे. योजना खर्चास विकासात्मक खर्च म्हणूनही ओळखले जाते. योजनेतर खर्चापैकी ९०% पेक्षा जास्त खर्च हा वेतनावर होणारा खर्च आहे व त्यामध्ये शिक्षक प्रशिक्षण इ. चा समावेश होतो. प्राथमिक शिक्षणावर केल्या जाणाऱ्या एकूण खर्चापैकी जवळपास ९९.००% इतका खर्च हा योजनेतर खर्च आहे. महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणावर केला जाणारा एकूण महसुली खर्चापैकी सरासरी ९६ टक्के इतका खर्च हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळावर होतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा या महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सर्वदूर पसरलेल्या असून त्या ग्रामीण भागातील हा तसेच दुर्गम भागातील मुलांना शिक्षण देण्याचे काम करतात. प्राथमिक शिक्षणावर येणाऱ्या एकूण खर्चापैकी १% इतका महसूल खर्च व प्रशासकीय व परीक्षण इ. वर होतो. नियोजित खर्च कमी असल्यामुळे मत्ता निर्माण होत नाहीत.

तक्ता क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे भांडवली खर्च हा कोणत्याही क्षेत्राचा पाया निर्धारित करणारा असतो. शिक्षण क्षेत्रामध्ये भांडवली खर्चास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भांडवली खर्च व मत्ता निर्माण करतो. शिक्षण क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करणे अत्यंत आवश्यक असून तंत्रज्ञानात्मक बदलामुळे भांडवली खर्चात वाढ होणे अत्यंत गरजेचे आहे. भांडवली खर्चाचे प्रमाण हे ०.०१ ते ०.८२ या प्रमाणातच बदलत असताना दिसते. महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था शाळाचे प्रमाण फार मोठे असल्यामुळे भविष्यात या शाळा पुन्हा नव्याने उभारणी करण्यासाठी भांडवली खर्च करणे आवश्यक आहे.

तक्ता क्र. ४ मध्ये महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाची प्रगती योग्य प्रकारे दर्शविण्यात आलेली आहे. २००२-०३ मध्ये २९६२८ एवढी सरकारी शाळेची असलेली संस्था ५१.२४% इतकी वाढ होऊन २०१५-१६ मध्ये ती ४४८१० इतकी झाली. सर्व शिक्षा अभियानांर्तगत अनेक नवीन सरकारी शाळा

**तक्ता क्र. ३ : प्राथमिक व शिक्षणावरील भांडवली खर्चाचे प्रमाण**

| वर्षे | प्रमाण |
|---|---|
| २००४-०५ | ०.०१ |
| २००५-०६ | ०.०१ |
| २००६-०७ | ०.२६ |
| २००७-०८ | ०.२९ |
| २००८-०९ | ०.३९ |
| २००९-१० | ०.७५ |
| २०१०-११ | ०.३५ |
| २०११-१२ | ०.८२ |
| २०१२-१३ | ०.७४ |
| २०१३-१४ | ०.४७ |

Source : Compiled from Various reports on Analysis of the Budgeted Expenditure on Education MHRD - GOI

निर्माण झाल्या. इ. स. २००२-०३ नंतरच्या काळात खाजगी शाळांची संख्या मात्र १९५%नी वाढ झाली याचे कारण म्हणजे दरडोई उत्पन्नातील वाढ व दळणवळण व संदेशवहनाच्या क्षेत्रात झालेली प्रगती होय. याच कालावधीमध्ये नागरीकरणाचे प्रमाणही वाढले व शिक्षणास महत्त्व जास्त प्रमाणात दिले गेले. याचाच परिणाम म्हणून खाजगी शाळांची संख्या वाढली. अलीकडील काळात इंग्रजी माध्यमांच्या शाळांची मागणीही मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसते. बहुसंख्या म्हणजे ९०% पेक्षा जास्त खाजगी शाळा या स्वयंवित्त (Selt Finance) या तत्त्वावर चालविल्या जातात व ट्यूशन फी, विकास फी, खेळ फी इ. च्या माध्यमातून अनेक प्रकारच्या फी आकारतात व मध्यमवर्गीय पालक अशा शाळांकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होताना दिसून येतात. ग्रामीण भागामध्ये शासकीय शाळा या महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे दिसते. ग्रामीण भागातील उत्पन्न पातळी कमी असल्याने तेथील लोक हे आपल्या मुलांना सरकारी शाळेमध्ये प्राधान्य देत असल्याचे दिसते. एकूण ५२८१० शाळांपैकी ४६४७२ इतक्या शाळा या ग्रामीण भागामध्ये शिक्षण देतात. एकूण शाळांपैकी ८७% शाळा या ग्रामीण भागात आहेत. ग्रामीण शिक्षणाचा पाया मजबूत करण्याचे कार्य सरकारी शाळामार्फत केले जात असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात खाजगी शाळाची वृद्धी ही २८७% नी झाल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील पालकही जास्त प्रमाणात

**तक्ता क्र. ४ : महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाची प्रगती**

| अ.क्र. | वर्षे | एकूण शाळा | | | एकूण ग्रामीण शाळा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरकारी | खाजगी | एकूण | सरकारी | खाजगी | एकूण |
| १. | २००२-०३ | २९६२८ | २७०९ | ३२३३७ | २७७५२ | ९१२ | २८६६४ |
| २. | २००३-०४ | ३७४९५ | ४५६३ | ४२०५८ | ३४८४१ | ११२४ | ३५९६५ |
| ३. | २००४-०५ | ३५३४३ | ४२८९ | ३९६३२ | ३२७११ | १११० | ३३८२१ |
| ४. | २००५-०६ | ३७११२ | ४५१६ | ४१६२८ | ३४६५० | १२८८ | ३५९३८ |
| ५. | २००६-०७ | ३५०८३ | ४६७३ | ३९७५६ | ३२६७१ | १२६८ | ३३९३९ |
| ६. | २००७-०८ | ३६२३६ | ४७२४ | ४०९६० | ३३९६१ | १२४६ | ३५२०७ |
| ७. | २००८-०९ | ४०३३० | ४५०५ | ४४८३५ | ३८२१५ | १२२३ | ३९४३८ |
| ८. | २००९-१० | ४२१७६ | ४८८१ | ४७०५७ | ४००२२ | १३०९ | ४१३३१ |
| ९. | २०१०-११ | ४३७८१ | ५२९१ | ४९०७२ | ४१६४८ | १६६४ | ४३३१२ |
| १०. | २०११-१२ | ४३७३७ | ५९२८ | ४९६६५ | ४१५८१ | २०१४ | ४३५९५ |
| ११. | २०१२-१३ | ४३४३६ | ६२२७ | ४९६६३ | ४१३८८ | २१३७ | ४३५२५ |
| १२. | २०१३-१४ | ४४८६७ | ७५८२ | ५२४४९ | ४२०३८ | ३०६३ | ४५१०१ |
| १३. | २०१४-१५ | ४५००७ | ७८४८ | ५२८५५ | ४३०९१ | ३३७३ | ४६४६४ |
| १४. | २०१५-१६ | ४४८१० | ८००० | ५२८१० | ४२९३६ | ३५३६ | ४६४७२ |

Source : Compiled from Various District Report Card from 2002-03 to 2015-16.

खाजगी शाळाकडे आकर्षित होताना दिसून येतात. एकूण सरकारी शाळापैकी ९५.८२% शाळा या ग्रामीण भागात असून सामवेशक शिक्षणामध्ये त्यांचे योगदान मोलाचे आहे. सर्वच सरकारी शाळामध्ये मोफत शिक्षण दिले जाते व त्यासोबत इतर सुविधा उदा. गणवेश, पुस्तके, स्टेशनरी इ. ही मिळतात. त्याचबरोबर मध्यान्ह भोजनही पुरविले जाते.

खाजगी शाळांचे वाढते प्रमाण लक्षात घेता शिक्षण हक्क कायद्यान्वये मोफत व सक्तीचे शिक्षण हे साध्य करणे शक्य नसल्याचे दिसते. अलीकडील काळात खाजगी शाळा मोठ्या प्रमाणात सुविधा देताना दिसून येतात. त्याच्याकडील चांगल्या पायाभूत सुविधा या पालकांना आकर्षित करतात. तर दुसरीकडे सरकारी शाळांची दुरावस्था, पडझड झाल्यामुळे पालक हे खाजगी शाळेचा पर्याय निवडताना दिसतात.

सर्वच शाळामध्ये प्राथमिक शिक्षण हे मोफत असणे आवश्यक आहे. मात्र तसे होताना दिसून येत नाही.

तक्ता क्र. ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्राथमिक शिक्षण घेत असलेल्या बालकांची सरकारी व खाजगी शाळातील नोंदणी विचारात घेता असे लक्षात येते की, खाजगी शाळेमधून शिक्षण घेण्यास अलीकडील काळात जास्त पसंती दिली जात असल्याचे दिसून येते. २००५ पासून ते २०१८ पर्यंतचे खाजगी शाळेतील प्रमाण दुप्पट झाल्याचे दिसून येते व सरकारी शाळेतील नोंदणी कमी झाल्याचे स्पष्टपणे जाणवते. अनेक सरकारी शाळांमध्ये पट हा १० च्या खाली आल्याचे दिसते. यात शिक्षणातील नुकसान (Wastage in Education) असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील अनेक

**तक्ता क्र. ५ : ग्रामीण महाराष्ट्रातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांचे सरकारी व खाजगी शाळेतील प्रमाण**

(आकडे टक्केवारीमध्ये)

| वर्षे | सरकारी शाळा | खाजगी शाळा |
|---|---|---|
| २००५ | ७८.१ | १८.२ |
| २००६ | ७७.७ | १८.३ |
| २००७ | ७१.७ | २५.८ |
| २००८ | ७२.१ | २५.९ |
| २००९ | ७०.६ | २८.२ |
| २०१० | ७२.२ | २६.४ |
| २०११ | ६८.२ | ३०.३ |
| २०१२ | ६२.९ | ३५.४ |
| २०१३ | ६०.७ | ३७.५ |
| २०१४ | ६१.५ | ३६.९ |
| २०१६ | ६०.६ | ३८.३ |
| २०१८ | ६१.६ | ३७.६ |

Source : Compiled from Various Annul Status of Education Reports (ASER).

सरकारी शाळा विद्यार्थ्यांअभावी बंद पडत असताना दिसतात. या बंद करणे म्हणजे शिक्षण हक्क नाकारणे असेही होऊ शकते. सरकारपुढे ही एक मोठी समस्या अलीकडील काळात निर्माण झाली आहे. खाजगी शाळांमध्ये फी देऊन पालक आपल्या पाल्यास शिक्षण देताना दिसून येतात. अनेक सरकारी शाळांमध्ये शाळाचे अद्ययावतीकरण होताना दिसून येत नाही. त्या मोडकळीस आलेल्या दिसतात. अनेक शिक्षकांकडून शाळा दुरुस्ती अनुदान हे अपूर्ण असल्याचे अभिप्राय मिळतात. अनेक सरकारी शाळा या ५० वर्षांपूर्वी बांधकाम केलेल्या आहेत. त्या पुनर्बांधकाम करणे आवश्यक आहे. मात्र सरकारकडून शाळावर भांडवली खर्च केला जात नाही व यामुळे त्यामधील नावनोंदणी कमी होत जाताना दिसून येते. आज पालकाकडून चांगल्या दर्जेदार शिक्षणाची मागणी वाढत असून त्यासाठी पर्यायाने फी स्वरूपात रक्कम मोजण्यासही पालक तयार आहेत.

तक्ता क्र. ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे खाजगी शाळा सुरू करण्यास परवानगी मिळाल्यानंतर महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू होण्यास सुरुवात झाली. पालकांमधील शिक्षणाबद्दल जागरुकता झाली. आपल्या मुलांना शाळेत प्रवेश घेताना तो मागे राहू नये म्हणून इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याचा विचार पुढे आला, यास पालकांकडून पसंती मिळू लागली. २००२-०३ यावर्षी मात्र २.२६% बालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेशित होते. या शाळा मोठ्या महानगरामध्येच होत्या. कालांतराने इंग्रजी माध्यमाच्या शाळा या ग्रामीण भागामध्येही सुरू करण्यात आल्या.

**तक्ता क्र. ६ : महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणातील माध्यमानुसार नोंदणी**

| वर्षे | एकूण नोंदणी | मराठी | टक्केवारी | इंग्रजी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| २००२-०३ | २९७५६९९ | २६७७५६७ | ८९.९८ | ६७१३० | २.२६ |
| २००३-०४ | ४३९७४७१ | ३५५९१३९ | ८०.९४ | ४००९७० | ९.१२ |
| २००४-०५ | ३७५६४४० | ३११४३७० | ८२.९१ | २७७९०२ | ७.४० |
| २००५-०६ | ४०४८९०२ | ३३९६८८६ | ८३.९० | ३०२६७६ | ७.४८ |
| २००६-०७ | ४०५२६९१ | ३२३६३६७ | ७९.८६ | ४५२३०२ | ११.१६ |
| २००७-०८ | ३७३९१०३ | २९६९८५४ | ७९.४३ | ४४७३८० | ११.९६ |
| २००८-०९ | ३९३९६७२ | ३१८४९६९ | ८०.८४ | ४४४४१७ | ११.२८ |
| २००९-१० | ३६१२२१३ | २८५७२८१ | ७९.१० | ४६७०८६ | १२.९३ |
| २०१०-११ | ४००४५०१ | ३१५३९६५ | ७८.७६ | ५३७५४५ | १३.४२ |
| २०११-१२ | ३९०७३१४ | २९९२५४८ | ७६.५९ | ६१२६४४ | १५.६८ |
| २०१२-१३ | ३६३९४९४ | २६८५१८३ | ७३.७८ | ६८०६७१ | १८.७० |
| २०१३-१४ | ३९४५९४६ | २८४७७१३ | ७२.१७ | ८००८४२ | २०.३० |
| २०१४-१५ | ३८८७३२२ | २८१८९५६ | ७२.५२ | ७९५६३१ | २०.४७ |
| २०१५-१६ | ३७७८७८७ | २७२२३३७ | ७२.०४ | ७९६७७५ | २१.०९ |

Source : Compiled from District Report Card, Elemetery Education in India by NUEPA .

इंग्रजी माध्यमाच्या बहुसंख्य शाळा या खाजगी शाळा असून त्या स्वयं अर्थसाहाय्यीत (Self Finance) आहेत. त्यांना शासनाचे कोणतेही वेतन अनुदान मिळत नाही. बहुसंख्य इंग्रजी माध्यमाच्या शाळामध्ये इंग्रजीतून अध्यापनाचा प्रयत्न केला जातो. मात्र ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजीची कौटुंबिक पार्श्वभूमी नसल्यामुळे त्यांना अनेक अडचणी येतात. इंग्रजी माध्यमांच्या शाळामध्ये शिकवणी फी (Tution Fee) मोठ्या प्रमाणावर नावारूपास आल्या व आपले मूल शैक्षणिक स्पर्धेत मागे राहू नये म्हणून या शाळांना पालकांनीही पसंती दिल्याचे दिसून येते. इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील नोंदणी सातत्याने वाढताना दिसते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (Local Body Schools) शाळांमध्ये ही इंग्रजी माध्यमांची तुकडी सुरू करावी, अशी मागणी पालक करत असताना दिसून येतात. काही जिल्हा परिषद शाळामध्येही इंग्रजी माध्यमांची तुकडी सुरू केल्याचे आढळून येते. महाराष्ट्रात हिंदी माध्यमांच्या शाळा जास्त प्रमाणात आढळून येत नाहीत. तसेच काही मोजक्या शाळा उर्दू माध्यमातून शिक्षण देत असल्याचे दिसून येते. शिक्षण तज्ज्ञांच्या मते, प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून दिल्यास ते जास्त आकलन होते. मात्र अलीकडील काळात याकडे फारसे लक्ष दिले जात नाही व बालकांची क्षमताही विचारात घेतली जात नाही.

तक्ता क्र. ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र समग्र नोंदणी दर १०० टक्के इतका साध्य करण्यात आल्याचे दिसून येते. इ.स. २००० मधील सर्व शिक्षा अभियान या कार्यक्रमाद्वारे शिक्षणावरील खर्च तरतुदीत वाढ करून शाळाबाह्य मुलांना शालेय प्रवाहात आणण्याचे महत्त्वाचे काम करण्यात आले. त्यामुळे तो १०५ इतक्या प्रमाणात साध्य करण्यात आला. निव्वळ नोंदणी दरास मात्र खरे मापन संबोधले जाते. कारण तो वयसापेक्ष असतो. यामध्ये ६ वर्षे वयोगटातील बालकाचे मोजमाप केले जाते. यामध्ये शाळेत जाण्यास पात्र असलेली बालके व शाळेत प्रवेशित बालके यांचेच मोजमाप केले जाते. निव्वळ नोंदणी दरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे तक्ता क्र. ७ वरून लक्षात येते. २००४-०५ मध्ये हे प्रमाण ६९.४४ एवढे होते. त्यात सातत्याने वाढ घेऊन ते २०१५-१६ मध्ये ८५.७९% पर्यंत वाढले. समग्र नोंदणी दरामध्ये वय बंधन नसते. एखादे ८ वर्षाचे बालकही यामध्ये नोंद केलेले असते. सार्वजनिक खर्च वाढविल्यामुळे शैक्षणिक पायाभूत सुविधा, नवीन शाळा, शिक्षक नियुक्ती, महिला शिक्षक नियुक्ती, मध्यान्ह भोजन इ. मुळे समग्र नोंदणी दर व निव्वळ नोंदणी दरामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. वरीलप्रमाणे महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रगतीचा आढावा घेतला गेला आहे. यामध्ये शिक्षण प्रगती ही सार्वजनिक खर्चाशी अधिक जवळून संबंधित असल्याचे दिसते.

**निष्कर्ष**

१) महाराष्ट्र हे राज्य देशामध्ये लोकसंख्येमध्ये दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून औद्योगिकदृष्ट्या प्रगत आहे. महाराष्ट्रास अनेक महापुरुषांकडून शैक्षणिक वारसा लाभलेला असून १९४७ मध्येच मोफत व सक्तीचे शिक्षणविषयक कायद्याची अंमलबजावणी केल्याचे दिसते. स्वातंत्र्यानंतरही महाराष्ट्रातील शिक्षणास प्राधान्य दिल्याचे दिसून येत.

२) शिक्षणावरील सार्वजनिक खर्चाचा विचार केला असता महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणावर सार्वजनिक खर्च सातत्याने वाढत असताना दिसून येते. सार्वजनिक खर्चाची तरतूद करून वस्ती शाळा, आश्रम शाळा इ. च्या माध्यमातून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बालकांना प्राथमिक शिक्षण देण्याचे महत्त्वाचे कार्य झाल्याचे दिसून येते. यामुळे आज महाराष्ट्रात मुलीचे शिक्षणाचे प्रमाण समाधानकारक असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ७ : महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणातील समग्र व निव्वळ नावनोंदणी प्रमाण**

| वर्षे | समग्र नोंदणी दर | निव्वळ नोंदणी दर |
|---|---|---|
| २००४-०५ | ८४.३१ | ६९.४४ |
| २००५-०६ | ९६.८२ | ७९.३२ |
| २००६-०७ | १००.७ | ८४.०० |
| २००७-०८ | १०२.२ | ८४.९० |
| २००८-०९ | १०३.८ | ८८.०० |
| २००९-१० | १०४.२ | ८८.०० |
| २०१०-११ | १०५.३ | ८८.३० |
| २०११-१२ | १०५.३ | ८८.३० |
| २०१२-१३ | १०५.६ | ९०.१० |
| २०१३-१४ | ९९.८१ | ८६.४२ |
| २०१४-१५ | ९८.९५ | ८५.७० |
| २०१५-१६ | ९७.७४ | ८५.७९ |

Source : Compiled from District Report Card Elemetery Education in India by NUEPA .

३) प्राथमिक शिक्षणावरील खर्च हा प्रामुख्याने महसूल खात्यावर केला जात असल्याचे दिसून येते. यामध्ये नियोजित खर्चाचे प्रमाण हे मागील ११ वर्षाच्या कालावधीसाठी सरासरी ३.२६% इतके मर्यादित राहिल्याचे दिसते व अनियोजित खर्चाचे प्रमाण हे ९६% पर्यंत आहे. शिक्षणातील भांडवली खर्च हा जास्त करून मत्ता निर्माण केल्या जातात. महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चापैकी ९४% इतका खर्च हा वेतनावर होताना दिसतो. शालेय विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त असल्यामुळे हा खर्च वाढतो व वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर तो पुन्हा वाढत असल्याचे निदर्शनास येते. शिक्षणावरील भांडवली खर्चाचे प्रमाण १ टक्के पेक्षाही कमी आहे.

४) महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती विचारात घेतली असता जिल्हा परिषद शाळाचे योगदान ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसते. जिल्हा परिषद शाळा या ग्रामीण शिक्षणाचा कणा आहेत व त्या आजही तशाच आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातही खाजगी शाळांचे प्रमाण अलीकडे वाढत असताना दिसते. खाजगी शाळांचे वाढते प्रमाण हे शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये अडथळा ठरू शकते. कारण खाजगी शाळा या मोफत शिक्षण देत नसतात ते विविध फी व शुल्क आकारत असतात. अलीकडील काळात खाजगी शाळांना पालकांची पसंती दिसून येते.

५) खाजगी शाळातील मुलांचे नोंदणी प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसते. वाढत्या खाजगीकरणाबरोबर लोकसंख्येचे ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतर होते व यातून शहरामध्ये गेल्यानंतर तेथील खाजगी शाळा चांगले कौशल्यपूर्ण शिक्षण देतात या धारणेपोटी पालक आपल्या मुलांना खाजगी शाळामध्ये प्रवेश देताना दिसून येतात. ASER

अहवालावरून हे स्पष्ट दिसून येते.

६) अलीकडील काळात खाजगी शिक्षणाद्वारे इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना पालकांची पसंती दिसून येते. इंग्रजी माध्यमाच्या शाळा यापूर्वी शहरी भागामध्येच असल्याचे दिसून येते. मात्र अलीकडील काळात या शाळा ग्रामीण भागासाठी सुरू होत असल्याचे प्रत्ययास येते. ग्रामीण भागातील कुटुंबाना इंग्रजी भाषेची पार्श्वभूमी नसतानाही पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश देताना दिसून येतात. ASERच्या अहवालामधून मात्र मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेबाबत फारसा फरक दिसून येत नाही ही बाब विचार करण्यासारखी आहे.

७) महाराष्ट्रात समग्र नोंदणी दर व निव्वळ नोंदणी दर हा इ. स. २००० नंतर वाढल्याचे दिसते. यामध्ये निव्वळ नोंदणी दर हा अत्यंत महत्त्वाचे मापन आहे.

अलीकडील स्थिती विचारात घेता जिल्हा परिषद शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीयरित्या कमी होत असून मोफत शिक्षण व अनिवार्य शिक्षण साध्य करण्यामध्ये भविष्यकाळात अडचणी निर्माण होण्याचे संकेत स्पष्टपणे जाणवत आहेत. जिल्हा परिषद शाळांमध्ये पायाभूत सुविधांकडे अलीकडील काळात दुर्लक्ष होताना दिसते. याचाच परिणाम म्हणून खाजगी शाळांकडे पालक वळत असल्याचे दिसते. शिक्षणातून प्रगत समाज निर्माण होणे अनेक्षित असते. चांगले शिक्षण ही आर्थिक प्रगतीची पूर्व अट असल्यामुळे शिक्षणावरील सार्वजनिक खर्चाकडे गंभीरपणे पाहणे आवश्यक असून शिक्षणविषयक हक्कांची पायमल्ली होणार नसल्याची काळजी घेणे सर्वच सरकारांचे कर्तव्य आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये आपण गुणवत्तापूर्ण व समावेशक शिक्षण शास्वसत्ता मिळेल, अशी अपेक्षा करू या.

**संदर्भ सूची:**


१) District Report Card, Elementery Education in India, 2002-2007 NUEPA, New Delhi.

२) District Socio Economic Review (2015-2016), Goverment of Maharashtra.

३) Education Statistics of Glance Ministry of Human Resource Development, Govement of India, New Delhi, 2016

४) Expenditure statement, Department of School Eduction (UDISE) Zilla Parishad, Kolhapur.

५) Ghosh Suresh Chandra, The History of Education in Modern India 1957-2012 (2013 Fourth Edition) Orient Black Swan, Hydrabad.

६) Govinda R. and Madnumia (2008) Accese to Elementary Education in India.

७) Jandhyala B. G. Tilak (2007), The Kothari Commission and Financing of Education. Economic and Political Weekly March 10, 2007.

८) Pandit (1972) Einancing of School Education Progress and Problemes, Economic and Political Weekly, Aug. 1972

९) Report on Annual Stotus of Education Reports, 2002-2017, ASER.

१०) Report on Educationoy Statistics, 2015 MHRD, Goverment of India.

११) Report on Elemetary Education in India, Trend, DISE 2016.

१२) Santosh Mehetra (1998) Education for all : Policy lessons from High Achieving countries, International Review of Education, Springer Publication.


◆

पुस्तक परिचय

# India's External Commercial Borrowing - Features, Trends, Policy Issues

**संतोष दास्ताने** †

By Ashutosh Raravikar
Ultimate Associates,
Nashik (India), 2020, Pp. 56,
ISBN : 978-81-948184-0-3
Price Rs. 100/-

अर्थशास्त्राचे अभ्यासक, संशोधक आणि लेखक म्हणून डॉ. आशुतोष रारावीकर विख्यात आहेत. सध्या ते भारतीय रिझर्व्ह बँकेतील आर्थिक धोरण व संशोधन विभागात संचालक पदावर कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी ठेव विमा महामंडळ तसेच केंद्रीय वित्त मंत्रालय, नवी दिल्ली  येथेही उच्च पदावर काम केले आहे. भारतातील बाह्य व्यापारी कर्जव्यवहार या विषयावर त्यांनी लिहिलेल्या प्रस्तुत पुस्तकाची आवर्जून दखल घेतली पाहिजे. या संकल्पनेचा उगम, तिचा तपशील, त्या कर्ज उभारणीतील कल, त्या संबंधीचे धोरण अशा मुद्यांच्या अनुषंगाने त्यांनी विवेचन केले आहे.

देशातील खासगी क्षेत्रातील औद्योगिक आस्थापनांना देशाबाहेरून भांडवल उभारण्याचे दोन प्रमुख मार्ग असतात. एक म्हणजे मसाला बाँड. म्हणजे कंपन्या परदेशातून रुपया चलनामध्ये ऋणपत्रे विकून कर्जे उभारतात. तर दुसरा मार्ग म्हणजे परदेशातून विदेशी चलनातील व्यापारी कर्जांची उभारणी. गेल्या काही वर्षात या दुसऱ्या प्रकाराला कमालीचे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामार्गे प्रचंड रकमांची दीर्घ मुदती कर्जे उभारली जात आहेत. देशाच्या एकूण विदेशी देणे रकमांमध्ये या मार्गाचा सर्वात मोठा हिस्सा झाला आहे. देशाच्या स्थूल आर्थिक विश्लेषणाच्या दृष्टीनेही त्यांना महत्त्व आहे, कारण देशाच्या एकूण बाह्य कर्ज मोजणीत त्यांचा समावेश होतो. अशी कर्जे म्हणजे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाचा भाग बनतो. त्यामुळे त्यांचा सविस्तर व वस्तुनिष्ठ विचार - विश्लेषण हे आवश्यक ठरते.

सन १९७०च्या दशकामध्ये अशा कर्ज उभारणीस हळूहळू सुरुवात झालेली दिसते. पण याला १९९० नंतरच्या उदारीकरणाच्या धोरणानंतर खरा वेग आला. सुमारे वीस वर्षांपूर्वी अशी एकूण कर्जे अंदाजे २ बि. डॉलर इतकी होती, ती आता अंदाजे ५३ बि. डॉलर या पातळीपर्यंत पोचली आहेत. म्हणजे वार्षिक सरासरी सुमारे १५% इतकी वाढ झालेली दिसते. देशाची जागतिकीकरणाच्या दिशेने होत असलेली वाटचाल,

† माजी अध्यक्ष, माजी विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र.६३, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४, ई-मेल : santosh.dastane@gmail.com

तांत्रिक सुधारणा, आधुनिकीकरण आणि विदेशी सहकार्य यांना दिलेले प्राधान्य, सेवा क्षेत्राची घोडदौड, खासगी क्षेत्राला मिळत असलेला अग्रक्रम अशी अनेक कारणे यामागे आहेत. देशातील खासगी क्षेत्राला हा मार्ग सोपा वाटला याचे प्रमुख कारण म्हणजे त्यासाठी अतिशय कमी व्याज दर द्यावा लागतो. भारतातील बँका व वित्तीय संस्था यांच्या व्याजदराच्या तुलनेने हा विदेशातील व्याज दर अगदी अल्प असतो. कर्ज उभारण्याचे, त्याच्या हमीचे आणि तेथील इतर प्रशासकीय खर्च हे सर्व विचारात घेतले तरी एकूण खर्चामध्ये बचतच होते. त्यामुळे कंपनीच्या नफ्यावर त्याचा अनुकूल परिणाम होतो. मुख्य म्हणजे ते शेवटी कर्जच असल्याने कंपनीची मालकी आणि नियंत्रण याच्या कोणत्याच समस्या उभ्या राहात नाहीत. (समभाग भांडवलाचे तसे नाही.) विविधीकरण, आधुनिकीकरण अशा गोष्टींना यामुळे चालना मिळते. कंपनीच्या आणि पर्यायाने देशाच्या प्रगतीस येथे हातभारच लागतो. सध्या जगातल्या आघाडीच्या बहुतेक सर्व मध्यवर्ती बँकांनी व्याजदर वेगाने उतरवले आहेत व ते शून्याच्या जवळ आणले आहेत. जागतिक भांडवल बाजारात विपुल रोखता आहे. त्यामुळे विदेशी भांडवल बाजारातून अशी कर्जे उभारणे फारसे अवघड राहिले नाही. देशातील खासगी क्षेत्रातील कंपन्या याचा फायदा घेत आहेत. अनेक तक्ते, आकृत्या, आलेख यांचा वापर करून गेल्या काही वर्षातील भारतातील कंपन्यांची अशी वाढती कर्ज उभारणी, सतत उतरत जाणारा सरासरी व्याज दर, वाढती कर्ज मुदत हे सगळे लेखकाने सोप्या रीतीने मांडले आहे.

परंतु येथे नाण्याची दुसरी बाजूही विचारात घेणे तितकेच महत्त्वाचे आहे आणि लेखकाने ते मुद्दे व्यवस्थित मांडले आहेत. स्वस्त आणि सोपा वित्तपुरवठा हाती येत असल्याने कित्येक वेळेस अतिभांडवलीकरण होणे, कंपनीची देणी विनाकारण वाढत जाणे अशा गोष्टी होऊ शकतात. त्यामुळे कंपनीचा ताळेबंद बिघडू शकतो, कंपनीचा नफा घटू शकतो. कंपनीच्या समभागांच्या किंमती शेअर बाजारात उतरू शकतात. पत बाजारातील कंपनीच्या दर्जांकनावर त्याचा परिणाम होतो. शिवाय हे कर्ज विदेशी चलनात परत करायचे असल्याने विदेशी चलन बाजारातील तरलता, रोखता, विनिमय दर हे प्रतिकूल असल्यास कंपनीला चांगलाच तोटा होऊ शकतो. उदा.रुपयाचे विदेशी चलनातील मूल्य घसरल्यास व्याज फेड, मुद्दल फेड करताना कंपनीला जादा पैसे खर्च करावे लागतील. उदा. डॉलरचा विनिमय दर ७२ रुपयांऐवजी ७५ रुपये झाल्यास १ लाख डॉलरची रक्कम परत करताना ७२ लाख रुपयांऐवजी ७५ लाख रुपये कंपनीला खर्च करावे लागतील. हेज प्रक्रियेतून ही समस्या काहीशी सुटू शकते, पण तो मार्ग खर्चाचा आहे आणि तितका भरवश्याचा नाही. अशा परिस्थितीमुळे या सर्व व्यवहारात विविध प्रकारची जोखीम कशी वाढत जाते ते लेखकाने चांगले विशद केले आहे.

या कर्ज उभारणीची दुसरी समस्या अशी की व्याज - मुद्दल फेड करताना ती देशाच्या विदेशी चलन साठ्यातूनच् करावी लागते. थेट विदेशी गुंतवणुकीबाबत अशी बांधिलकी नसते, पण व्यापारी कर्जाची वेळोवेळी नियमित फेड करीत राहाणे बंधनकारक असते. त्यात चूक झाल्यास तो करारभंगाचा गुन्हा ठरतो. त्यामुळे कंपनीच्या / देशाच्या दर्जांकनात घसरण होऊ शकते. कर्ज घेणे एक वेळ सोपे पण ते शेवटपर्यंत निभावणे कठीण अशी ही परिस्थिती आहे.

या कर्ज व्यवहाराबाबत धोरण ठरवणे आणि ते राबवणे याची कशी अवघड कसरत सरकारला करावी लागते तेही लेखकाने स्पष्ट केले आहे. देशातील

आर्थिक उदारीकरण धोरण अमलात आणणे व नियम - बंधने शिथिल करणे हे एकीकडे सरकार करीत आहे. तर दुसरीकडे विदेशी चलनाच्या माध्यमातून कर्ज - व्याज फेडीचे वेळापत्रक शिस्तीने सांभाळणे हे करावे लागत आहे. शिवाय या कर्ज उभारणीचा फायदा देशातील काही ठरावीक उद्योगांनाच झालेला आहे, देशातील औद्योगिक क्षेत्राचा समतोल विकास यामुळे होत गेला आहे असे घडले नाही. यामुळे कंपन्यांचा भर अशा वित्त उभारणीवर असला तरी सरकार / रिझर्व्ह बँक मात्र थेट विदेशी गुंतवणुकीस प्राधान्य देते. हा सूक्ष्म संघर्ष चालू राहताना दिसतो. देशात व्यापारी रोखे बाजार -अद्याप पुरेसा विकसित न झाल्याने अशा स्रोतांवर अवलंबून राहणे भाग आहे हे लेखक दाखवून देतात. सरकारने अशा वित्त उभारणीस प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष मदतच केली आहे. विशेषकरून १९९९च्या विदेशी चलन व्यवस्थापन कायद्यानंतर (फेमा) या मार्गाने झालेल्या वित्त उभारणीचे नियमन सरकारने केले आहे, वेळोवेळी त्यासंबंधीचे नियम सोपे आणि शिथिल केले आहेत. याचा परिणाम म्हणून देशाची विदेशी कर्जे - खासकरून दीर्घकालीन कर्जे सतत वाढली आहेत; तरीही विदेशी कर्जाचे देशाच्या एकूण उत्पन्नाशी असलेले गुणोत्तर सुरक्षित मर्यादेमध्ये आहे असे लेखक विस्तृत सांख्यिकी माहितीच्या आधारे दाखवून देतात. एका गुंतागुंतीच्या पण महत्त्वाच्या विषयावर रारावीकर यांनी अतिशय सुगम असे विवेचन केले आहे व त्याचे स्वागत करायला हवे. अर्थशास्त्र, बँकिंग, वित्तशास्त्र, वित्त व्यवस्थापन, विदेशी व्यापार या विषयात रुची असणाऱ्या अभ्यासकांना / संशोधकांना या पुस्तकाचा नक्कीच फायदा होईल. डॉ. रारावीकर यांचे अभिनंदन!

◆

## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ग्रंथालये यांच्यासाठी **त्रैवार्षिक वर्गणी रु. २०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. ३०००/-** आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**

'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर - ४१६ ००४ भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# डी.एन.ए. - DNA (Deoxyribonucleic Acid)

शि. ना. माने †

कोणताही आर्थिक निर्णय घेणारी व्यक्ती स्वयं किंवा एकटी नसते. उलट सजीवाच्या अंतस्थ (Organism) प्रयोगशाळेतील संघर्षाचा तो परिणाम असतो. 'मर्सिडीस' ऐवजी 'टोयोटा' खरेदी करण्याचा निर्णय कोण करतो? या प्रश्नाचा निर्णयकर्ता 'मी' किंवा 'स्वयं' नसतो. वस्तुत: तथाकथित निर्धारक सजीवात दडलेला अंतस्थ व दूरस्थ नियंत्रक (Remote Controller) असतो. परंतु ती स्मिथ यांची 'अदृश्य शक्ति' (Invisible hand) नसते. १९०७ पर्यंत बेकारी ही संज्ञा अभिमत संप्रदायाला परिचित नव्हती. अल्फ्रेड मार्शल यांनी त्यांच्या 'प्रिंसिपल्स' च्या १९०७ मधील आवृत्तीत 'रोजगाराची अस्थिरता' (Inconstancy of employment) हा शब्दप्रयोग वापरून रोजगाराच्या घरट्यातील गांधीलमाशांना प्रथम डिवचले. अभिमत संप्रदायाला असलेला हा पहिला धक्का होता. त्यानंतर २००२ मध्ये नोबेलविजेते अर्थशास्त्रज्ञ डॅनिअल काह्नेमन यांनी 'अर्थपरायण पुरुषाला' नाकारून त्या संप्रदायाला दुसरा आणि जास्त जबर धक्का दिला. त्यांना आर्थिक निर्णयाच्या संबंधातील सजीवाच्या अंतस्थ सुरू असलेल्या रस्सीखेचीची (Tug of war) चाहुल लागली होती.

स्पष्टीकरणासाठी नेहमी पुढील उदाहरणाचा दाखला दिला जातो. एके दिवशी 'मी माझा चाकू बाहेर काढला. आणि जवळच्या दुसऱ्या व्यक्तीचा भोसकून खून केला.' मला तिसऱ्या व्यक्तीने प्रश्न केला : 'तू त्या व्यक्तीचा खून का केला?' मी उत्तर दिले : 'कारण तो माझा स्वत:चा निर्णय होता. त्यासाठी मी स्वतंत्र आहे.' गुन्ह्याची कबुली म्हणून हे उत्तर बरोबर असेलही. परंतु ते संपूर्ण व सम्यक असू शकत नाही. कारण ते अंतस्थ व दूरस्थ जैव-रसायनशास्त्रीय व प्रजननशास्त्रीय (DNA) पुराव्यापर्यंत पोहोचू शकत नाही. ते नफा व नफ्याचे महत्तमीकरणया बहिस्थ कार्यप्रेरणेच्या हेतुपुरते मर्यादित आहे.

आता त्या DNA या इंग्रजी अद्याक्षरासाधित शब्दाचा अर्थ पाहू. प्रामुख्याने ती एक जैव-रसायनशास्त्रीय संज्ञा आहे. Deoxyribonucleic acid हा मूळ इंग्रजी जोडशब्द आहे. सृष्टीतील प्रत्येक सजीवात केंद्रस्थ सारभूत पेशी असतात. त्याच्या अस्तित्वासाठी त्या सजीवात जीवात्मक (Genetic)

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा. आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

माहिती (Information), पारेषक किंवा वाहक (Transmission) प्रक्रिया अखंडितपणे चालू असते. मधुमेहीच्या रक्तातील साखरेची पातळी कमी-जास्त होण्याची पारेषण प्रक्रिया प्रजननशील किंवा आनुवंशिक असते. ती मधुमेहीची अपवर्जक (Exclusive) मालमत्ता नसते. जी गोष्ट मधुमेहीची तीच गोष्ट कर्करोगग्रस्त व्यक्तीची. अंतस्थ पेशींच्या प्रत्यक्ष प्रमाणाच्या प्रयोगाशिवाय त्यांचे वर्तन कळू शकत नाही. म्हणजेच सजीव, अंतस्थ पेशी, त्यांचे पारेषण आणि अखेरीस रोगनिदान (की जे वैद्याच्या रोगनिदानापेक्षा जास्त अचुक असते) या आंतरक्रीयांचे आकलन अनिवार्य आहे. म्हणून 'कारण तो माझा स्वत:चा निर्णय आहे' हे उत्तर पुरेसे नाही. ते कालसापेक्ष अर्थशास्त्रीय सिद्धांतनाशी सुसंवादी नाही. अशाप्रकारे, आपण सुरूवातीला सूतोवाच केल्याप्रमाणे भविष्यात प्रत्येक आर्थिक प्रश्नाच्या जास्तीत जास्त अचुक समाधानासाठी कृत्रिम बुद्‌धिमत्ता प्राज्ञावलीचा (Artificial Intelligence Software) वाढता उपयोग अनिवार्य आहे. म्हणून DNA संज्ञेचे आकलन महत्त्वाचे आहे. असो.

एवढ्या प्रास्ताविकानंतर DNA संज्ञेसाठी पुढील मराठी पर्याय सुचवीत आहे. प्रत्येक सजीवातील 'जीवात्मक-माहिती पारेषक सारणी'. आणि त्याचे अद्याक्षरसाधित रूप असेल जीपासा. सुचविलेले पर्याय प्राथमिक स्वरूपाचे आहेत. ते पर्याप्त आहेत असा दावा करता येत नाही. म्हणूनच त्यांच्या संबंधी अधिक चर्चा अपेक्षित आहे.

◆

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# नवीन आजीव सभासद यादी

(दि. १ एप्रिल २०२० ते दि. ३१ मार्च २०२१ पर्यंत)

| अ.नं. | सभासदाचे नाव | आजीव सभासद क्र. | पावती क्र. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १. | शेवलीकर रामराव गणपतराव | १८३२ | ०१८ | ५१००/- |
| २. | भुयारे सदाशिव राजाराम | १८३३ | ०१९ | ५१००/- |
| ३. | फडणीस प्रशांत यशवंत | १८३४ | ०२० | ५१००/- |
| ४. | तळेकर जयश्री आसाराम | १८.५ | ०२१ | ३१००/- |
| ५. | प्रोफेसर डॉ. आढाव विलास | १८३६ | ०२२ | ५१००/- |
| ६. | मोरे अरुणा शरद | १८३७ | ०२३ | ३१००/- |
| ७. | कदम/नारायणे अंजली रामचंद्र | १८३८ | ०२४ | ५१००/- |
| ८. | पवार निर्मला नामदेव | १८३९ | ०२५ | ५१००/- |
| ९. | शिंदे भागवत रावसाहेब | १८४० | ०२६ | ५१००/- |

**अर्थ शब्दांची वाट पाहे...**

# क्रौडिंग औट (Crowding out) - असेट मॉनेटिझेशन (Asset Monitization) - बॅड बँक (Bad Bank)

**जे. एफ. पाटील** †

**क्रौडिंग औट (Crowding Out) - गर्दी विस्थापन :**

एखाद्या वस्तूच्या वा सेवेच्या (उत्पादन घटकाच्या) बाजारात घडणारा हा प्रकार आहे. नमुन्यासाठी -

१. भांडवल बाजारात खाजगी गुंतवणूकदारांबरोबरच सरकारी संस्था एखाद्या प्रकल्पाच्या समभागाच्या खरेदीसाठी उतरतात, तेव्हा सरकारी खरेदीदारांच्या तुलनेत खाजगी गुंतवणूकदार दुर्बल ठरतात व त्या बाजारातून, खाजगी गुंतवणूकदार बाहेर फेकले / ढकलले जातात. धान्य बाजारात अन्न महामंडळ जेव्हा खरेदीदार होते, तेव्हा इतर खाजगी धान्य व्यापारी अडचणीत येतात व ते बाहेर पडतात. अशी अनेक उदाहरणे देता येतील. स्पर्धात्मक बाजारात, मर्यादित बाजारात लहान क्षमतेचे ग्राहक, अधिक क्षमतेच्या ग्राहकांच्या प्रवेशानंतर, बाहेर ढकलले जातात. या प्रक्रियेला इंग्रजीमध्ये (Crowding Out) असे म्हटले जाते. प्रस्तुत लेखकाच्या मते, या घटिताला ''गर्दी विस्थापन'' असा शब्दप्रयोग वापरता येईल.

**असेट मॉनेटिझेशन (Asset Monitization)**

सध्या भारतात आर्थिक धोरणाचा एक महत्त्वाचा घटक सरकारचा महसूल वाढविणे - कर व्यवस्थेचा भार न वाढविता, सरकारी प्रकल्पांचे खाजगीकरण (पूर्ण विक्री, समभाग विक्री इ.) करणे हा जसा एक महत्त्वाचा मार्ग आहे, तसाच असेट मॉनेटिझेशन (Asset Monitization) हाही आता महत्त्वाचा मार्ग मानला जात आहे.

सरकारच्या विविध खात्यांकडे (रेल्वे, पोस्ट, दूर संचार, बंदरे, विमानतळ इ.) बरीच मोकळी जागा, इमारती, साधनसामग्री इ. मत्ता असतात. खाजगीकरणाच्या वाढत्या वातावरणात अशा मत्तांची विक्री करून सरकारी महसूल वाढविण्यावर सध्या भर दिला जात आहे. त्यातही सरकारी जमिनींची / इमारतींची विक्री हा प्रधान घटक होत आहे. अशा मत्ता महानगरात असल्यास भरपूर किंमती मिळतात.

या सर्व प्रक्रियेला ''मत्ता चलनीकरण'' असा प्रतिशब्द वापरणे योग्य ठरेल, असे प्रस्तुत लेखकाचे मत आहे.

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

**बॅड बँक (**Bad Bank**)**

**भंगार बँक -** भारतीय बँकिंग व्यवस्थेत गेल्या २५-३० वर्षात अलाभदायी मत्तांचा प्रश्न वाढत्या स्वरूपात गंभीर झाला. लाखो कोटी रुपयांची कर्जे ''विषारी'' होत आहेत. बिघडत आहेत. त्यांच्या - व्याज व मुद्दलाची वसुली होण्याची शक्यता अधिकाधिक धूसर होत आहे. अलाभदायी मत्तांच्या संकटातून, किमान नुकसानीने बाहेर कसे पडायचे हा बँकिंग व्यवस्थेचा प्रत्यक्ष व सरकारचा धोरणात्मक संकटाचा प्रश्न आहे. १९९० च्या दशकानंतर मत्ता पुनर्रचना संस्था निर्माण झाल्या. कांही बऱ्या चालल्या. पण बहुतेक अडखळतच होत्या - आहेत.

या पार्श्वभूमीवर २०१८ मध्ये सुनील मेहता समितीने प्रथम बॅड बँक (Bad Bank) ही संकल्पना मांडली. आता सध्या रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. शक्तीकांत दास ''आम्ही बँड बँक संकल्पनेचा विचार करू'', अशी भूमिका घेत आहेत. बँड बँकेला - विशेषतः ''बॅड'' या विशेषणास योग्य पर्याय देऊन मराठी प्रतिशब्द तयार करणे गरजेचे आहे.

यातील दुसरा अर्थ बॅड बँकेला लागू होतो.

| | |
|---|---|
| बॅड = वाईट<br>= अयोग्य<br>= निकृष्ट<br>= रद्दी<br>= कचरा<br>= अभद्र | असे अनेक शब्द - अर्थाच्या अनुषंगाने येतात. पण प्रस्तुत लेखकांच्या मते बँकेला बॅड विशेषण वापरणे संयुक्तिक वाटत नाही. एखादी बँकिंग संस्था बॅड होण्याच्या दोन शक्यता १. मंदीच्या पलीकडे अलाभदायी मत्ता वाढणे, २. अलाभदायी मत्तांच्या माध्यमातून वित्तीय व्यवहार करणारी बँक. |

कारण घरातील रद्दी, जुने कपडे, जुने फर्निचर, वाहने, भांडी, साधने, विद्युत साहित्य इ. यांना आपण स्क्रॅप म्हणता. कचरा म्हणतो. पण या सर्वांना व्यापक अर्थाने मराठी ''भंगार'' असा शब्द आहे. संतोष दास्ताने यांनी ''डब्बा बँक'' असा शब्द दिला. प्रस्तुत लेखकाच्या मते बॅड बँकेला पर्यायी शब्द ''भंगार बँक' असा वापरावा.

ही बँक
- अलाभदायी मत्तांचा व्यापार करते.
- अलाभदायी मत्ता एका अर्थाने ''भंगार'' असतात.
- पण त्यांनाही मूल्य/ मोल असते.
- अशा मत्ता- भंगार - आपल्याकडे घेऊन त्याचा वापर / विक्रेय वस्तू म्हणून करणे. त्यातून खरेदी किंमतीपेक्षा जास्त मिळविणे. मूळ बँकेचा ताळेबंद सुधारणे इ. किफायतशीर गोष्टी बॅड बँक करते. विशेष म्हणजे ''भंगार'' या कानडी शब्दाचा अर्थ ''सोने'' असा आहे. उपरोक्त सर्व गोष्टी लक्षात घेता बॅड बँकेला मराठी प्रतिशब्द - ''भंगार बँक'' असा वापरणे योग्य ठरेल.

◆

# अर्थसंवाद
## (खंड ४४, २०२०-२१)

### अ) लेख सूची


| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | कोविड-१९ची आर्थिक मंदी | ३ |
| २. | भारतातील स्थलांतराचे मापन: विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य | २६ |
| ३. | १४ व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे अर्धशतक आणि सद्यस्थिती | ३६ |
| ४. | विदर्भ आणि मराठवाड्यातील कुपोषण निर्मूलन कार्यक्रमाचा मागोवा | ४६ |
| ५. | आरोग्यसेवेचे स्वरूप आणि उत्पादन | ५७ |
| ६. | केंद्र सरकारचे कोरोना पॅकेज : काही अनुत्तरित प्रश्न | ६३ |
| ७. | आर्थिक पाहणी अहवाल २०१९-२० : चिकित्सक आढावा | ६८ |
| ८. | चौकटीपल्याडचा नागरी सेवक | ७४ |
| ९. | पुस्तक परिचय : आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ | ७७ |
| १०. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : महाराष्ट्राचा रोटी रिपब्लिक अर्थसंकल्प : भाष्य | ८० |
| ११. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : कोविड - १९ : नवीन शब्द संग्रह | ८४ |
| १२. | शोधनिबंध विषय रूपरेषा : नोबेल पारितोषिकप्राप्त अभिजित बॅनर्जी यांचे योगदान | ८६ |
| १३. | शोधनिबंध विषय रुपरेषा : भारतातील वर्तमान दशकातील आर्थिक स्थित्यंतरे - एक टिप्पण | ९१ |
| १४. | शोधनिबंध विषय रुपरेषा : अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार | ९६ |
| १५. | भूमिअधिग्रहणाची राजकीय अर्थव्यवस्था: एक संक्षिप्त टिपण | १०३ |
| १६. | कोविड -१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम : एक समग्र दृष्टिकोण | ११६ |
| १७. | प्राध्यापक बोरकर : राजस्व या क्षेत्रातील एक निष्णात सैद्धान्तिक अर्थशास्त्रज्ञ | १२९ |
| १८. | जागतिकीकरणाचा बदलता प्रवाह | १४४ |
| १९. | भारतातील सहकारी संस्थांचा विकास | १५४ |
| २०. | केंद्र व राज्य शासनाच्या जलधोरणाची मीमांसा | १६३ |
| २१. | चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकास : | |

| | | |
|---|---|---|
| | पाहणी अभ्यास | १७० |
| २२. | भारतातील उद्योजकता विकास : सामाजिक संदर्भ | १७९ |
| २३. | पुस्तक परिचय : ‘करोना बंध’ उलगडताना...! | १९१ |
| २४. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : ‘Shell Company' | १९७ |
| २५. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : अरिष्ट गृहीतक, राजस्व दुरांतरण | १९९ |
| २६. | भांडवलशाही उत्पादन प्रणालीत शेतीचा प्रश्न | २०३ |
| २७. | अतिवृद्धी-अभिवृद्धी सहसंबंधातील पेचप्रसंग | २१३ |
| २८. | अर्थशास्त्राचे २०20 चे नोबेल स्मृती पारितोषिक :<br>लिलाव सिद्धांत व संबंधित प्रारूपांना | २३३ |
| २९. | महिला आणि स्थलांतर | २४६ |
| ३०. | महाराष्ट्रातील शेती उत्पन्नातील प्रादेशिक तफावती | २५४ |
| ३१. | भारतातील शेती आधारित उद्योगांतील संधी आणि समस्या | २६६ |
| ३२. | आर्थिक जाणीव समृद्ध करणारे अर्थजागर | २७३ |
| ३३. | पुस्तक परिचय : आर्थिक जगत | २७७ |
| ३४. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : विकास (Telescopic Development) | २७९ |
| ३५. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : बॅड बँक BAD BANK | २८१ |
| ३६. | राष्ट्रीय वेबसंवाद अहवाल | २८३ |
| ३७. | कोरोनाचे सावट आणि २०२१चा केंद्रीय अर्थसंकल्प | २८९ |
| ३८. | महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यातील अरोली गावात<br>सामूहिक पशुधन चारा विपणन मॉडेलचा अभ्यास | २९९ |
| ३९. | जागतिक व्यापार संघटनेची २५ वर्षे : साध्य आणि असाध्य | ३०९ |
| ४०. | भारतीय कृषिक्षेत्र आणि तीन नवीन कृषिकायदे | ३२३ |
| ४१. | केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणाचे ‘चारित्र्य’ | ३३८ |
| ४२. | महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणावरील सार्वजनिक खर्च<br>व शालेय शिक्षण प्रगती विश्लेषण | ३४५ |
| ४३. | पुस्तक परिचय - इंडियाज एक्सटर्नल कमर्शिअल बोरोविंग फीचर,<br>ट्रेन्डस्, पॉलीसी इश्यूज् | ३५८ |
| ४४. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : डी. एन. ए. | ३६१ |
| ४५. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : क्रौडिंग औट - असेट मॉनेटिझेशन - बॅड बँक | ३६३ |

# अर्थसंवाद
# (खंड ४४, २०२०-२०२१)

**ब) लेखक सूची**



| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | भरतकुमार सोलापुरे | ३ |
| २. | प्रमोद पांडुरंगराव लोणारकर | २६ |
| ३. | एम. एन. शिंदे | ३६ |
| ४. | प्रशांत एन. देशमुख, आर. एस. सोळुंके | ४६ |
| ५. | सतीश श्रीवास्तव | ५७ |
| ६. | विकास विनायकराव सुकाळे | ६३ |
| ७. | राहुल शं. म्होपरे | ६८ |
| ८. | मंजुषा मुसमाडे : पुस्तक परिचय | ७४ |
| ९. | सुभाष कोंबडे : पुस्तक परिचय | ७७ |
| १०. | शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे | ८० |
| ११. | जे. एफ. पाटील : अर्थ शब्दांची वाट पाहे | ८४ |
| १२. | मंजुषा मुसमाडे : शोधनिबंध विषय रूपरेषा | ८६ |
| १३. | विनोद म. गावंडे : शोधनिबंध विषय रुपरेषा | ९१ |
| १४. | मारोती तेगमपुरे : शोधनिबंध विषय रुपरेषा | ९६ |
| १५. | ज्ञानदेव तळुले | १०३ |
| १६. | पी. एस. कांबळे | ११६ |
| १७. | आर.एस.देशपांडे | १२९ |
| १८. | अविनाश कुलकर्णी | १४४ |
| १९. | रसूल कोरबू | १५४ |
| २०. | गजानन गं. भारती | १६३ |
| २१. | रवींद्र बा. शेंडे | १७० |
| २२. | संतोष दास्ताने | १७९ |
| २३. | अनिलकुमार वावरे : पुस्तक परिचय | १९१ |
| २४. | शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे | १९७ |
| २५. | श्रीनिवास खांदेवाले | २०३ |
| २६. | वसंतराव जुगळे, योजना जुगळे | २१३ |
| २७. | प्रशांत हरमकर | २३३ |
| २८. | वंदना उत्तम कटारे | २४६ |
| २९. | एम. एच. शिंदे | २५४ |

| | | |
|---|---|---|
| ३०. | आर.जे. इंगोले | २६६ |
| ३१. | मंजूषा मुसमाडे : पुस्तक परिचय | २७३ |
| ३२. | जे. एफ. पाटील : पुस्तक परिचय | २७७ |
| ३३. | शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे | २७९ |
| ३४. | संतोष दास्ताने : अर्थ शब्दांची वाट पाहे | २८१ |
| ३५. | मारोती वि. तेगमपुरे - कार्यवाह-खजिनदार, म.अ.प. | २८३ |
| ३६. | विनायक श्रीधर देशपांडे | २८९ |
| ३७. | एस. एस. कळमकर, व्ही. जी. अतकरे | २९९ |
| ३८. | प्रशांत हरमकर | ३०९ |
| ३९. | करमसिंग राजपूत | ३३२ |
| ४०. | मारोती तेगमपुरे | ३३८ |
| ४१. | सुभाष कोंबडे | ३४५ |
| ४२. | संतोष दास्ताने : पुस्तक परिचय | ३५८ |
| ४३. | शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे... | ३६१ |
| ४४. | जे. एफ. पाटील : अर्थ शब्दांची वाट पाहे... | ३६३ |


# अर्थसंवाद


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **४४वे राष्ट्रीय अधिवेशन निबंधलेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयाची रुपरेषा** | |
| १. | नोबेल पारितोषिकप्राप्त अभिजित बॅनर्जी यांचे योगदान | ८६-९० |
| २. | भारतातील वर्तमान दशकातील आर्थिक स्थित्यंतरे - एक टिप्पण | ९१-९५ |
| ३. | अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार | ९६-१०० |
| | **४४वे राष्ट्रीय अधिवेशन निबंधलेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयाची रुपरेषा** | |
| १. | मंजुषा मुसमाडे | ८६-९० |
| २. | विनोद म. गावंडे | ९१-९५ |
| ३. | मारोती तेगमपुरे | ९६-१०० |
| | **पुस्तक परिचय** | |
| १. | चौकटीपल्याडचा नागरी सेवक | ७४-७६ |
| २. | आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ | ७७-७९ |
| ३. | ‘करोना बंध’ उलगडताना...! | १९१-१९६ |
| ४. | आर्थिक जाणीव समृद्ध करणारे अर्थजागर | २७३-२७६ |
| ५. | आर्थिक जगत | २७७-२७८ |

| | | |
|---|---|---|
| ६. | इंडियाज एक्सटर्नल कमर्शिअल बोरोविंग फीचर, ट्रेन्डस्, पॉलीसी इश्यूज् | ३५८-३६० |
| | **पुस्तक परिचय** | |
| १. | मंजुषा मुसमाडे | ७४-७६ |
| २. | सुभाष कोंबडे | ७७-७९ |
| ३. | अनिलकुमार वावरे | १९१-१९६ |
| ४. | मंजूषा मुसमाडे | २७३-२७६ |
| ५. | जे. एफ. पाटील | २७७-२७८ |
| ६. | संतोष दास्ताने | ३५८-३६० |


**अर्थसंवाद अंकाचा तपशील : खंड - ४१**

| क्र. | अंक | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १. | एप्रिल-जून २०२० | १०० |
| २. | जुलै-सप्टेंबर २०२० | १०० |
| ३. | ऑक्टोबर-डिसेंबर २०२० | ८६ |
| ४. | जानेवारी-मार्च २०२१ | ८४ |

मी बाँड नाही तर मी एक चालता बँकर आहे.

**- रघुराम राजन**

समस्या अशी आहे की उत्सर्जन उत्पादीत करणारे लोक त्या विशेषाधिकारांसाठी पैसे देत नाहीत आणि ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना मोबदला मिळत नाही.

**- विल्यम डी. बॉर्डहॉस**

# अर्थसंवाद - तज्ञ परीक्षक सूची

अर्थसंवादच्या खंड ४४ मधील अंक १ ते अंक ४ मधील लेखांचे परिक्षण खालील तज्ञांनी केलेले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. श्रीनिवास खांदेवाले | - | नागपूर |
| २. | डॉ. जे. एफ. पाटील | - | कोल्हापूर |
| ३. | डॉ. दि. व्य. जहागीरदार | - | अमरावती |
| ४. | डॉ. संतोष दास्ताने | - | पुणे |
| ५. | डॉ. विनायक देशपांडे | - | नागपूर |
| ६. | डॉ. राजस परचुरे | - | पुणे |
| ७. | डॉ. अनिल सुर्यवंशी | - | बार्शी |
| ८. | डॉ. आर. जी. रसाळ | - | लोणी |
| ९. | डॉ. जे. एस. पाटील | - | नागठाणे |
| १०. | डॉ. एस. एम. भोसले | - | सातारा |
| ११. | डॉ. पी. एस. कांबळे | - | कोल्हापूर |
| १२. | डॉ. आर. बी. भांडवलकर | - | यवतमाळ |
| १३. | डॉ. अनिल वावरे | - | सातारा |
| १४. | डॉ. सौ. मंजुषा मुसमाडे | - | पुणे |
| १५. | डॉ. सुरेश ढाके | - | भुसावळ |
| १६. | डॉ. संतोष कदम | - | सोलापूर |
| १७. | डॉ. मारोती तेगमपुरे | - | अंबड |
| १८. | डॉ. संजय तुपे | - | नाशिक |
| १९. | डॉ. राहुल शं. म्होपरे | - | अर्जुननगर |

## निवेदन - अर्थसंवाद

अर्थसंवादच्या सर्व वर्गणीदार शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालयांना कळविण्यात येते की, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणी व सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार १ एप्रिल, २०२० पासून अर्थसंवादची त्रैवार्षिक वर्गणी २००० रु. व पंचवार्षिक वर्गणी ३००० रु. करण्यात आलेली आहे. ज्या वर्गणीदार सदस्यांनी यापूर्वीच जुन्या दराने रक्कम पाठवली आहे त्यांनी फरकाची रक्कम त्वरित पाठवून देवून सहकार्य करावे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in

**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व - डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश - संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला- के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज - श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३९१०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# अर्थसंवादसाठी
## हार्दिक शुभेच्छा

श्रीनिवास खांदेवाले
नागपूर

डॉ. राजू शिंदे
धुळे

डॉ. रामकृष्ण टाले
नागपूर

डॉ. विद्या आर. पाटील
धुळे

डॉ. वैशाली ल. देशमुख (नाईक)
औरंगाबाद

डॉ. मोहन सदामते
कुंडल

डॉ. युगंधर शै. टोपरे (देशपांडे)
औरंगाबाद

डॉ. सुभाष पाटील
पुणे

डॉ. प्रशांत हरमकर
अमरावती

डॉ. मनीषकुमार कायरकर
बल्लारपूर

डॉ. चंद्रकांत रा. जाधव
वारणानगर

डॉ. श्रीमती निजवंती आर. टेंभुरणे
मोर्शी

डॉ. सुमित्रा विजय पवार
जळगाव

डॉ. अजय दरेकर
बारामती

डॉ. भाऊसाहेब देशमुख
राजूर

डॉ. आर. बी. भांडवलकर
यवतमाळ

डॉ.जी.के.सानप
संगमनेर

डॉ. गणेश मांगडे
दापोली

डॉ. जयवंत इंगळे
विटा